पुणे, शनिवार, २६ एप्रिल २०२५ • RASHTRA SANCHAR-Vol-4-issue 148 • वर्ष ४ थे, अंक १४८ • किंमत ₹ ६ • पाने : १२



पाट्या टाकाल तर याद राखा

P३

# राष्ट्रसंचार

@rashtrasanchar.com Beyond The News



१२

अर्जुन तेंडुलकर पुढचा ख्रिस गेल होऊ शकतो!

## At a Glance

### पिरंगुट येथील पूल मे अखेर होणार सुरू

**पुणे :** पुणे कोलाड महामार्गावरील पिरंगुट (ता. मुळशी) येथील पुलाचे काम प्रगतिपथावर असून, मे महिन्याच्या अखेरपर्यंत हे काम पूर्ण होऊन पुलावरील रस्ता वाहतुकीसाठी खुला होणार आहे. बीएमसी कंपनीच्या माध्यमातून या पुलाचे बांधकाम सुरू आहे. सध्या या पुलाच्या पायाचे, स्लॅब साठीच्या भिंतीचे तसेच, पायाच्या पीसीसीचे काम पूर्ण झाले आहे. स्लॅबसाठी लागणाऱ्या लोखंडी सांगाडा

» पान ७ वर

### अवैध बांगलादेशी प्रकरणी कारवाई

**नाशिक :** नाशिकमधील मालेगावात ईडीने मोठी कारवाई केली आहे. अंमलबजावणी संचालनालय म्हणजे ईडीने मालेगावात एकाच वेळी ९ वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले आहे. अवैध बांगलादेशी प्रकरणी ही कारवाई केली जात असल्याचे म्हटले आहे. नाशिकच्या मालेगावमध्ये कथित बांगलादेशी आणि रोहिंग्यांना मोठ्या संख्येने चुकीच्या पद्धतीने जन्म प्रमाणपत्र दिले जात

» पान ७ वर

# हाफिज सईदचा हात


## पहलगाम हल्लाप्रकरणी तपास यंत्रणांच्या हाती लागली मोठी माहिती

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगामजवळच्या बैसरन खोऱ्यात झालेला दहशतवादी हल्ला लश्कर-ए-तोयबा (एलईटी) या दहशतवादी संघटनेशी संबंधित दहशतवादी गटाने घडवला होता. या हल्ल्यात सहभागी असलेल्या दहशतवाद्यांमध्ये बहुतेक परदेशी नागरिक होते आणि त्यांना स्थानिक दहशतवाद्यांनी तसेच कश्मीरमधील त्यांच्या सक्रिय स्लीपर सेलने मदत केली, अशी माहिती समोर आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे हे सर्व दहशतवादी २६/११ च्या मुंबई हल्ल्याचा मास्टरमाइंड आणि लश्करचा प्रमुख हाफिज सईद याच्या थेट संपर्कात होते, अशी माहिती तपास यंत्रणांना मिळाली आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार , दहशतवाद्यांचे हे विशिष्ट मॉड्यूल कश्मीर खोऱ्यात अनेक दिवसांपासून सक्रिय होते. सोनमर्ग, बूटा पथरी आणि गांदरबल इथे झालेल्या मोठ्या दहशतवादी हल्ल्यांमागे याच गटाचा हात असल्याचाही दाट संशय आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये बूटा पथरी येथे झालेल्या एका दहशतवादी हल्ल्यात भारतीय लश्कराच्या दोन जवानांसह चार लोकांचा बळी गेला होता. त्याच महिन्यात सोनमर्ग येथे बोगदा बांधणाऱ्या मजुरांवर झालेल्या जीवघेण्या हल्ल्यात सहा मजूर आणि एका डॉक्टरांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. पहलगाम





हत्याकांडातील मुख्य आरोपींपैकी एक असलेल्या हाशिम मूसाचा पहलगाम हल्ल्याचाही संशयित आहे..

लश्कर ए तोयबाचा कुख्यात दहशतवादी आणि कुलगामचा रहिवासी जुनैद अहमद भट्ट याची सुरक्षा दलाच्या जवानांसोबत चकमक झाली होती. डिसेंबर २०२४ मध्ये दाचीगाम येथे झालेल्या चकमकीत त्याचा खात्मा करण्यात आला होता. त्याच्यासोबत असलेले दहशतवादी तेव्हा पळून जाण्यात यशस्वी झाले होते. हे दहशतवादी जवळच्या जंगलाचा फायदा घेत फरार झाले होते. आतापर्यंतच्या हल्ल्यांमध्ये दिसून आलं आहे की कोणताही मोठा हल्ला झाल्यानंतर दहशतवादी जंगलात लपून बसतात आणि त्यांच्या म्होरक्यांकडून पुढचा आदेश मिळेपर्यंत शांत राहतात.

पहलगाममध्ये निष्पाप पर्यटकांवर करण्यात आलेल्या हल्ल्यामध्ये दहशतवाद्यांच्या संपर्कात लश्करचा प्रमुख हाफिज सईद आणि त्याचा साथीदार सैफुल्लाह हे दोघे सातत्याने होते असा दाट संशय आहे. हे दोघे पाकिस्तानात बसून या दहशतवाद्यांना कया करायचे ते सांगत होते असे मानले जाते. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार

» पान ७ वर

### सुरक्षा व्यवस्थेत वाढ

● सुरक्षा दलाच्या जवानांनी गुरुवारी बैसरन जवळच्या जंगलात, दहशतवाद्यांच्या गटाने वापरलेले ठिकाण शोधून काढले आहे. या ठिकाणाचा शोध लागल्याने हे दहशतवादी काय करत होते याची माहिती मिळण्यास मदत होईल. भारतीय जवानांनी या भागात शोध मोहीम सुरू केली असून ती तीव्र केली जाणार आहे. या हल्ल्यात सहभागी असलेल्या इतर दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी तपास यंत्रणा कसून प्रयत्न करत आहेत. स्थानिक नागरिकांकडूनही माहिती मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, जेणेकरून या दहशतवादी गटाचे नेटवर्क उद्ध्वस्त करता येईल. या हल्ल्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे.

# १११ पाकिस्तानी नागरिकांचे सध्या पुण्यामध्ये वास्तव्य

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** भारतात व्हिसावर आलेल्या नागरिकांमध्ये मुस्लिम, सिंधी आणि हिंदू समाजाच्या व्यक्तींचा समावेश आहे. पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २७ निरपराध भारतीय नागरिकांचा मृत्यू झाल्यानंतर देशभरामध्ये संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेत भारतामध्ये वास्तव्यास असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना ४८ तासांच्या आत देश सोडण्याचा आदेश दिला आहे. पुणे पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सध्या एकूण १११ पाकिस्तानी नागरिक वास्तव्यास आहेत. ५६ महिला आणि ३५ पुरुष दीर्घकालीन व्हिसावर भारतात आले आहेत, अशी माहिती विशेष पोलीस शाखेकडून देण्यात आली.

व्हिसावर भारतामध्ये आलेल्या १११ पाकिस्तानी नागरिकांचे सध्या पुण्यामध्ये वास्तव्य आहे. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्र सरकारने घेतलेल्या कठोर निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पुण्यातील या नागरिकांची माहिती संकलित करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. भारतात व्हिसावर आलेल्या या नागरिकांमध्ये

» पान ७ वर

### जळगावात ७०० पेक्षा जास्त पाकी नागरिक

● काश्मीरमधील पहलगाममधील निष्पाप पर्यटकांवर दहशतवाद्यांनी बेछूट गोळीबार केला. या घटनेनंतर भारत सरकारने पाकिस्तानच्या मुसक्या आवळण्यास सुरुवात केली आहे. भारतातील पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडण्याचा अल्टिमेटम आज संपत आहे. दरम्यान महाराष्ट्रातील जळगावमधून अत्यंत धक्कादायक बातमी समोर आली आहे. जळगावमध्ये पाकिस्तानी नागरिकांचं वास्तव्य असल्याचं उघड झालं आहे. जळगावात ७०० पेक्षा जास्त पाकिस्तानी नागरिक राहत असून त्यांनी भारतीय नागरिकत्व स्वीकारल्याचं सांगितलं जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे भारतात राहणाऱ्या या पाकिस्तानी नागरिकांकडून नियम आणि अटींचं पालन होत नसल्याची माहिती आहे.

# नियंत्रण रेषेवर तणाव वाढला!

## पाकिस्तानकडून गोळीबार, भारताकडून चोख प्रत्युत्तर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**श्रीनगर :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर सीमेवर तणाव वाढला आहे. पहलगाम हल्ल्याच्या तीन दिवसांनंतर पाकिस्तानी सैन्याने रात्रभर नियंत्रण रेषेवरील अनेक पाकिस्तानी चौक्यांवरून गोळीबार केला. पण या गोळीबाराला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले. या घटनेत भारताच्या बाजूने कोणीही जखमी अथवा जीवितहानी झाल्याचे वृत्त नाही.

पाकिस्तानी सैन्याने सीमेवर रात्रभर गोळीबार केला. भारतीय जवानांनीही त्याला चोख प्रत्युत्तर दिले. यात कोणतीही जीवितहानी झालेली नाही, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली आहे. फेब्रुवारी महिन्यातदेखील पाकिस्तानी सैन्याने



पूंछ जिल्ह्यातील एलओसीवर भारतीय चौकीवर छोट्या शस्त्रांनी गोळीबार केला होता. त्याला भारताकडून चोख प्रत्युत्तर देण्यात आले होते.

गुरुवारी उधमपूर जिल्ह्यात संयुक्त सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांत चकमक झाली होती. यात विशेष दलाचा एक सैनिक शहीद झाला. पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पकडण्यासाठी सुरक्षा दलाने मोठ्या प्रमाणात शोधमोहीम सुरू केली आहे.

दरम्यान, बांदीपोरा जिल्ह्यात आज शुक्रवारी सकाळी भारतीय सुरक्षा जवान आणि दहशतवाद्यांत चकमक सुरु झाली. दहशतवाद्यांच्या हालचालीबाबत मिळालेल्या गुप्तचर माहितीच्या आधारे, भारतीय लष्कर आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी संयुक्तरित्या बांदीपोरा येथील कुलनार अजस परिसरात शोध मोहीम सुरू केली. यादरम्यान लपून बसलेल्या दहशतवाद्यांनी सुरक्षा दलांवर गोळीबार केला. त्याला सुरक्षा जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. येथे चकमक सुरु आहे, अशी माहिती भारतीय सैन्याच्या चिनार कॉर्प्सने दिली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, सध्याच्या घडीला जम्मू आणि काश्मीरमध्ये तब्बल ५८ दहशतवादी सक्रिय आहेत. यातील बहुतांश दहशतवादी 'लष्कर-ए-तोयबा'चे आहेत, अशी माहिती गृह मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत देण्यात आली. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला. यात २६ जणांचा मृत्यू झाला. तर १७ जण जखमी झाले होते. या घटनेनंतर भारत आणि पाकिस्तान हाय अलर्टवर आहेत.

### देशातील २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** देशात पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल झाला आहे. एकीकडे देशातील अनेक भागांना उष्णतेच्या लाटेचा तडाखा बसत आहे, तर दुसरीकडे २३ राज्यांना अतिवृष्टी आणि वादळाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाकडून हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. उत्तर आणि पश्चिम भारतामध्ये जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. वेस्टर्न डिस्टबन्समुळे जम्मू-कश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड या राज्यांमध्ये २५ आणि २६ एप्रिल रोजी वादळी वा-यासह अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बांगलादेश आणि आसामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, त्यामुळे पूर्व भारतात वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह अतिमुसळधार

» पान ७ वर

# पाकड्यांना हद्दपार करा

## अमित शाह यांचे राज्यांना कारवाईचे निर्देश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी वैयक्तिकरित्या संपर्क साधला असून, त्यांना त्यांच्या संबंधित अधिकारक्षेत्रातील पाकिस्तानी नागरिकांना ओळखून त्यांचे त्वरित हद्दपार करण्याचे निर्देश दिले आहेत. शाह यांनी जलद कारवाई करण्याचे आणि सध्या भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना विलंब न करता त्यांच्या मायदेशी परतण्याची खात्री करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

परराष्ट्र मंत्रालयाने जाहीर केले आहे की पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले सर्व वैध व्हिसा २७ एप्रिल पासून रद्द केले जातील. तथापि, वैद्यकीय व्हिसाला मुदतवाढ देण्यात आली आहे आणि ती २९ एप्रिल पर्यंत वैध राहील. भारतातील सर्व पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या व्हिसाची वैधता संपण्यापूर्वीच देश सोडावा लागेल.

२२ एप्रिल रोजी पहलगामच्या बैसरन कुरणात झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर या घडामोडी घडल्या आहेत. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. भारत सरकारने या हल्ल्याचे वर्णन पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचे कृत्य म्हणून केले असून, सीमेपलीकडून येणाऱ्या धोक्यांना तोंड देण्यासाठी निर्णायक पावले उचलण्याचे आश्वासन दिले आहे.

### सरकारने अधिक गांभीर्याने घेतले पाहिजे : शरद पवार

● काश्मीरमध्ये जे झालं, त्या घटनेच्या पार्श्वभूमीवर सर्व देशवासियांनी एका विचाराने सरकार बरोबर राहिलं पाहिजे. त्यात राजकारण आणायचं नाही. अतिरेक्यांनी भारताविरोधात कारवाई केली, देशविरोधात जेव्हा कारवाई होते, तेव्हा तिथे राजकीय मतभेद ठेवायचे नसतात. सर्व पक्षीय बैठकीत सर्व राजकीय पक्षांनी या प्रश्नावर केंद्र सरकारला सहकार्य करण्याची भूमिका घेतली याचा आनंद आहे. माझी विनंती आहे की, जे काही निर्णय घेतले जातील त्यात आम्ही सरकार सोबत आहोत, पण सरकारने देखील हे अधिक गांभीर्याने घेतले पाहिजे.शरद पवार म्हणाले की, इंटेलिजन्स फेल्युअर आहे हे सरळ दिसत आहे.

» पान ७ वर

# विमान कंपन्यांवर नियंत्रणासाठी लवकरच कार्यप्रणाली- मंत्री मोहोळ

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** काश्मीरमध्ये पर्यटकांवरील हल्ल्यानंतर काही विमान कंपन्यांनी प्रवासी शुल्कात वाढ केल्याच्या प्रकाराची केंद्र सरकारने गंभीर दखल घेतली आहे. भविष्यात आपत्ती काळामध्ये विमान कंपन्यांच्या प्रवासी शुल्कावर नियंत्रण ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून कार्यप्रणाली (मेकॅनिझम पॉलिसी) तयार केली जाणार आहे. नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून (डीसीजीआय) ही कार्यप्रणाली बनविण्यात येणार असल्याचे केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.



नैसर्गिक आपत्ती आणि मानवनिर्मित संकटाच्या काळात प्रवासी शुल्क वाढविल्यास विमान कंपन्यांवर कारवाई करण्याचा इशारा मोहोळ यांनी दिला आहे.

पहलगाममध्ये पर्यटकांवर दहशतवाद्यांच्या हल्ल्यानंतर भयभीत प्रवाशांनी माघारी जाण्यासाठी धडपड सुरू केली असताना हवाई कंपन्यांकडून प्रवासी शुल्क वाढविल्याचे समोर आले. त्यानंतर सर्व स्तरावरून केंद्र सरकार आणि हवाई कंपन्यांना लक्ष्य करण्यात आले. अखेर केंद्र सरकारला मध्यस्थी करावी लागली. हवाई कंपन्यांना प्रवासी शुल्क कमी करण्याबाबत आदेश द्यावा लागला. तसेच निरनिराळ्या राज्यांतून काश्मीरला गेलेल्या पर्यटकांना विशेष विमानाद्वारे माघारी आणावे लागले. मात्र, आपत्तीच्या काळात विमान कंपन्यांकडून असे वर्तन घडू नये, हे केंद्र सरकारला सांगण्याची वेळ येऊ नये म्हणून कार्यप्रणाली तयार करण्याबाबत हवाई वाहतूक तज्ज्ञांकडून मागणी करण्यात आली होती.

### शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत दिनांक ०९ फेब्रुवारी, २०२५ रोजी घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी), शासकीय विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, आदिवासी विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा, विमुक्त जाती व भटक्या जमाती विद्यानिकेतन प्रवेश परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) चा अंतरिम (तात्पुरता) निकाल शुक्रवार, दि. २५ एप्रिल, २०२५ रोजी जाहीर झाला.

हा निकाल www.mscepune.in व https://puppssmsce.in या परिषदेच्या संकेतस्थळावर घोषित करण्यात आला आहे. शाळांना आपल्या विद्यार्थ्यांचा निकाल त्यांच्या लॉगीनमधून तसेच पालकांना आपल्या पाल्यांचा निकाल संकेतस्थळावर

» पान ७ वर

# वक्फ विधेयकाला स्थगिती देता येणार नाही

## केंद्र सरकारचे सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेने बनवलेल्या कायद्यांना घटनात्मकता ही संकल्पना लागू होत असल्याने या कायद्याला पूर्णपणे स्थगिती देता येणार नाही, असे सांगत वक्फ (दुरुस्ती) कायदा २०२५ च्या वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिका फेटाळण्यात याव्यात, अशी मागणी केंद्र सरकारने शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाला केली. १,३३२ पानांच्या प्राथमिक प्रतिज्ञापत्रात सरकारने वादग्रस्त कायद्याचा बचाव करताना म्हटले आहे की, धक्कादायक बाब म्हणजे २०१३ पासून वक्फच्या जमिनीत २० लाख हेक्टरने (बरोबर




२०,९२,०७२.५३६) वाढ झाली आहे.

मुघल काळाच्या आधी, स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्योत्तर काळात भारतातील एकूण जमिनीचे क्षेत्रफळ १८,२९,१६३.८९६ एकर होते. पूर्वीच्या तरतुदींचा गैरवापर करून खासगी आणि सरकारी मालमत्तांवर अतिक्रमण केल्याचा दावा करण्यात आला आहे. अल्पसंख्याक मंत्रालयाच्या संयुक्त सचिव शेरशा सी शेख मोहिदीन यांनी हे प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे.

घटनात्मक न्यायालये कोणत्याही वैधानिक तरतुदीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्थगिती देणार नाहीत आणि या प्रकरणात अंतिम निर्णय घेतील, अशी कायद्यात निश्चित भूमिका आहे. संविधानवादाची संकल्पना संसदेने बनवलेल्या कायद्यांना लागू पडते. वक्फसारख्या धार्मिक व्यवस्थेचे व्यवस्थापन व्हावे आणि त्यावर दाखवलेला विश्वास कायम राहावा, यासाठी संसदेने आपल्या अखत्यारीत काम

» पान ७ वर




## वनीता' : भारतीय स्त्री गुणवैशिष्ट्यांचा नृत्यसंवाद !

**पुणे :** कलावर्धिनी डान्स कंपनी आणि डॉ. उषा आर.के. यांच्या संयुक्त विद्यमाने वनीता हे आगळंवेगळं शास्त्रीय नृत्य सादरीकरण द बॉक्स, एरंडवणे येथे दि.२५ एप्रिल रोजी सायंकाळी साडे सहा वाजता सादर केले जाणार आहे.विवेक, विनय, वीरता आणि विचारक या भारतीय परंपरेतील आदर्श स्त्रियांच्या गुणवैशिष्ट्यांवर आधारित हा अनोखा नृत्य संवाद प्रेक्षकांसमोर येणार आहे. ज्येष्ठ नृत्य गुरू डॉ. सुचेता भिडे चापेकर, शमा भाटे, डॉ. उषा आर.के. आणि अरुंधती पटवर्धन यांची प्रमुख उपस्थिती या कार्यक्रमाला असणार आहे. श्रेयसी गोपीनाथ (महा सरस्वती), नंदिनी गणेशन (राधा), नविया नटराजन (द्रौपदी), आणि कीर्तना रवि (गार्गी) सहभागी होतील. कार्यक्रमाची सुरुवात सायली काणे यांच्या श्रद्धा अर्पण ने होणार आहे. या सर्व नृत्यांगना दिल्ली, मुंबई आणि बेंगळुरू येथून सहभागी होत आहेत. विद्या हरिकृष्णा (स्वर), कलिश्वरन पिल्लै (नत्तुवांगम), दक्षिणामूर्ती पिल्लै (मृदंगम) आणि रवि ए (व्हायोलिन) हे साथ संगीत करतील.

## युवा साहित्यिक विक्रम शिंदे यांना पुरस्कार जाहीर

**पुणे :** अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्ष सेना, महाराष्ट्र राज्य या संस्थेचे २०२५ चे राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



झाले असून या वर्षीचा "साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे साहित्य भूषण पुरस्कार" युवा साहित्यिक विक्रम शिंदे यांना जाहीर झाला आहे. मराठी साहित्य विश्वात अत्यंत कमी वयात भरीव योगदानासाठी हा पुरस्कार त्यांना दिला जाणार आहे. अखिल भारतीय स्वाभिमानी संघर्ष सेना आणि पी. थो. सामाजिक संस्थेच्या माध्यमातून कराड येथे १ जुलै रोजी या पुरस्काराने विक्रम शिंदे यांना गौरवण्यात येणार आहे. विक्रम शिंदे यांचे साहित्य क्षेत्रातील कार्य वाखाणण्याजोगे असून त्यांच्या माध्यमातून संविधानिक मूल्यांवर आधारीत आजवर शेकडो दर्जेदार ग्रंथांची निर्मिती झाली आहे. साहित्य चळवळीतील त्यांच्या व्यापक योगदानाबद्दल हा पुरस्कार विक्रम शिंदे यांना जाहीर झाला असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी स्वाभिमानी संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष पिराजी थोरवडे आणि संयोजक लेखक सत्यवान मंडलिक यांनी दिली.



## 'जिओ टॅगिंग'चे काम शिक्षकांच्या माथी कशासाठी?

**पुणे :** जिओ टॅगिंग'साठी तयार केलेल्या 'महास्कूल' ॲपमध्ये माहिती भरण्याचा नवा ताप शिक्षकांना सहन करावा लागत असून, परीक्षा आणि मूल्यमापन प्रक्रिया पूर्ण करताना 'जिओ टॅगिंग'चे काम शिक्षकांच्या माथी कशासाठी, असा सवाल शिक्षण क्षेत्रातून उपस्थित करण्यात येत आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, तसेच खासगी अनुदानित शाळांच्या परीक्षा सुरू असताना शिक्षण विभागाने शाळांच्या 'जिओ टॅगिंग'चे काम सुरू केले आहे. राज्यातील सर्व शाळांबाबतची माहिती केंद्र शासनाच्या 'यूडायस प्लस' या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यात शाळा, विद्यार्थिसंख्या, शिक्षकसंख्या, शाळांमध्ये उपलब्ध भौतिक सुविधा, संगणकीय सुविधा यांबाबत माहितीचा समावेश आहे. या माहितीचा उपयोग आणि वापर शासनस्तरावर विविध धोरणे, कार्यक्रमांची आखणी, तसेच अंमलबजावणी आराखडा तयार करताना होतो. मात्र गाव, चावड्या, वस्ती यांचे ठिकाण, लोकसंख्येची घनता, तसेच उपलब्ध जिल्हा, राज्यमार्ग, महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, दोन शाळांमधील अंतर, शाळांच्या नजीक शासनाच्या इतर विभागांद्वारे उपलब्ध सोयीसुविधा याबाबतची माहिती शालेय शिक्षण विभागाकडे सद्यःस्थितीत उपलब्ध नाही. त्यामुळे राज्यातील शाळांचे जिओ टॅगिंग करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## 'विविधतेतील एकता हीच ताकद' या विषयावर सर्वधर्मीय परिसंवाद

**पुणे:** समाजात सौहार्द, समजूतदारपणा आणि शांतता यांना चालना देण्याच्या उद्देशाने जमात-ए-इस्लामी हिंद (कॅम्प, पुणे) यांच्या वतीने एक विशेष सर्वधर्मीय परिसंवादाचे आयोजन रविवार,दि.२७ एप्रिल रोजी करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पुण्यातील ऑर्बिट हॉटेल, आपटे रस्ता, येथे सायंकाळी ६:३० वाजता होणार आहे. 'जमात-ए-इस्लामी हिंद ' चे उपाध्यक्ष सलीम इंजिनिअर, (नवी दिल्ली),बुद्धिस्ट कल्चर स्टडी सेंटर(पुणे) येथील झेन मास्टर भंते सुदस्सन, संचालक, व्हीआयटी कॉलेज (पुणे) चे संचालक तसेच इस्कॉन,पुणे चे उपाध्यक्ष एच.जी. रसविग्रह प्रभु आणि इग्नाशियस चर्च(खडकी)चे सहायक पाद्री फादर डेनिस जोसेफ,(पुणे डायसिस) हे या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून सहभागी होणार आहेत.

## लढा मागण्यांसाठी...!




**पुणे** रास्ता पेठेतील महावितरणच्या पुणे परिमंडळ कार्यालयासमोर दोन दिवसांपासून तांत्रिक कामगारांचे विविध प्रश्नांसाठी आमरण उपोषण सुरु आहे. पुणे विभागअंतर्गत कार्यरत तांत्रिक कामगारांनी प्रशासनाकडून ३ ते ४ वर्षापासून प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याचे कारण देत उपोषण सुरु केले आहे.

## विविध मागण्यांसाठी तांत्रिक कामगारांचे आमरण उपोषण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** रास्ता पेठेतील महावितरणच्या पुणे परिमंडळ कार्यालयासमोर दोन दिवसांपासून तांत्रिक कामगारांचे विविध प्रश्नांसाठी आमरण उपोषण सुरु आहे. पुणे विभागअंतर्गत कार्यरत तांत्रिक कामगारांनी प्रशासनाकडून ३ ते ४ वर्षापासून प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक होत नसल्याचे कारण देत उपोषण सुरु केले आहे.

तांत्रिक कामगार युनियनचे केंद्रीय अध्यक्ष दिलीप कोरडे, उपसरचिटणीस शिवाजी शिवनेचारी यांच्यासह शरद डगळे, महेश पाटील, विलास निमसटकर, अजित दजगुडे, धनेश तोडकर, संतोष खताळ, चंद्रशेखर बधे या पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

तांत्रिक कर्मचाऱ्यांचे डीम डेट प्रमोशन २०२१पासून प्रलंबित आहे. यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या निर्णयाचे व महावितरण परिपत्रक १८०चे उल्लंघन करण्यात आले आहे. मयत कर्मचारी हणमंत भिसे हे महावितरण सेवेत सरळसेवा भरतीत कंपनी पे-रोलवर रुजू झाल्याने व सेवेची सलग ५ वर्ष अधिक सेवा पूर्ण केल्याने त्यांच्या मृत्यूपश्चात कुटुंबियांना डेथ ग्रॅज्युएटी रक्कम देण्यात यावी.

# ‘ दादागिरी’ फळाला...!

### शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी प्रशासन ‘अलर्ट मोडवर’: झोननिहाय अधिकारी नेमणार

धरण क्षेत्रात पुरेसा पाणीसाठा असतानाही शहराच्या जवळपास सर्वच भागात आणि उपनगरांमध्येही कृत्रिम पाणीटंचाई निर्माण झाली आहे; त्यामुळे ऐन उन्हाळयात नागरिकांना हंडाभर पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. विशेष म्हणजे शहराची महत्त्वाची उपनगरे समजली जात असलेल्या खराडी, वडगांवशेरी आणि चंदननगर भागात गेल्या काही महिन्यांपासून ही भीषण परिस्थिती उदभवली आहे, त्यासाठी खुद्द विधानसभेचे सभापती ॲड. राहूल नार्वेकर आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिष्टाई करुनही त्यामध्ये फारसा बदल झालेला नाही. त्यातूनच नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे, त्यासाठी आता झोन निहाय कनिष्ठ आणि उप अभियंता नेमण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे अजित पवारांची ही ‘दादागिरी’ चांगलीच फळाला आली असून त्याचा लाभ लाखो नागरिकांना होण्याची शक्यता आहे.

**हा पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी**



**प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता, तरीही प्रशासनाकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याने प्रशासनाला निर्वाणीचा इशारा दिला होता. त्यामुळे प्रशासन उशीरा का होइना पण ताळयावर आले आहे, त्याचा निश्चितच लाभ सर्व नागरिकांना होणार आहे.**

**-डॉ. सिद्धार्थ धेंडे,** माजी उपमहापौर, पुणे मनपा

**समान पाणीपुरवठा प्रकल्प योजनेनुसार प्रत्येक पाणीपुरवठा झोनचे झोन आयसोलेशन करणे, पाणी वापरावर नियंत्रण आणण्यासाठी १३५ लिटर प्रति दिन प्रती माणसी नुसार पाणीपुरवठा करणे, पाण्याची गळती कमी करणे, टाकीचे इनलेटनुसार पाणी वितरण नियंत्रित करणे, इत्यादी कामे संबंधित अभियंत्यांनी संबंधित प्रकल्प विभागाच्या अभियंत्यांशी समन्वय देऊन करणे आवश्यक आहे.**

**-नंदकिशोर जगताप,** पाणीपुरवठा प्रमुख, पुणे मनपा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पाणीपुरवठ्या विषयी सातत्याने तक्रारींत वाढ होत आहे. या तक्रारींचे निवारण करण्यासाठी आता महापालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने झोन निहाय कनिष्ठ अभियंता आणी उप अभियंता यांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे.

समान पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत पुणे शहराचे १४३झोन करून, त्यानुसार हायड्रोलिक डिझाईन तयार करुन कामे सुरु आहेत. या झोनमध्ये पाणी पुरवठ्याकरीता अभियंत्यांची नेमणुक केली असली तरी कनिष्ठ अभियंता आणि उप अभियंता यांचे कार्यक्षेत्र हे प्रभागानुनार ठरवून देण्यात आलेले आहे. त्यामुळे एका कनिष्ठ अभियंत्याकडे काही झोन पूर्णपणे तर काही झोनचा काही भाग नियंत्रणासाठी आहे. त्यामुळे टाकींना पुरवठा करण्यात येणारे पाणी आणि वितरणाचे नियोजन करणे अडचणीचे होत आहे. तसेच, एखाद्या भागामध्ये पाणीपुरवठ्याच्या तक्रारीमध्ये वाढ आल्यास संबंधित अभियंत्यावर जबाबदारी निश्चित करणे अडचणीचे होत आहे. यासाठी सध्याच्या प्रभागनिहाय केलेली उपअभियंता यांची केलेली नेमणूक पाणीपुरवठा झोननिहाय करणे आवश्यक आहे.

**नागरिकांच्या जीवाशी आणि आरोग्याशी खेळण्याचे पाप प्रशासनाच्या माध्यमातून सुरु होते, उन्हाळयामध्येच ही परिस्थिती**



**उदभवल्याने त्याचा लाखो नागरिकांना फटका बसला होता. त्यासाठी उपोषणाला बसूनही प्रशासनाने ही बाब फारशी गांभीर्याने घेतली नव्हती. अखेर ‘गाठ माझ्याशी आहे’ असा धमकीवजा इशारा अजितदादांनी दिल्याने प्रशासन वठणीवर आले आहे.**

**-उषाताई कळमकर,** माजी नगरसेविका, पुणे मनपा

## भारताच्या नंदनवनला ‘ग्रहण’...!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पहलगाम येथे दहशतवादी हल्ला झाल्यानंतर पुण्याहून श्रीनगरला जाण्याकडे प्रवाशांनी पाठ फिरविण्यास सुरुवात केली आहे. दोन दिवसांत पुणे स्थानकावरून प्रवास सुरू करणाऱ्या सुमारे ११०० प्रवाशांनी झेलम एक्स्प्रेसचे तिकीट रद्द केले आहे. पुणे वगळता मार्गातील अन्य स्थानकावरूनदेखील प्रवाशांनी आपले तिकीट रद्द केले आहे. काही प्रवाशांनी सहा जूनपर्यंतचे आरक्षित तिकीट रद्द केले आहे. तिकीट रद्दमुळे रेल्वेचे सुमारे २० लाख रुपयांचे नुकसान झाले असल्याचा अंदाज रेल्वे प्रशासनाने व्यक्त केला आहे.

प्रवासी ज्या वेगाने झेलम एक्स्प्रेसचे जून महिन्यातील आरक्षित तिकीट रद्द करीत आहे, हे पाहता यंदाच्या सुट्टीच्या हंगामात पर्यटक काश्मीरकडे पाठ फिरविणार हे जवळपास निश्चित झाले आहे. मंगळवारी दहशतवादी हल्ला झाल्यानंतर त्या दिवसापासूनच पर्यटकांनी काश्मीरला जाण्याचे बेत रद्द करण्यास सुरुवात केली आहे.

केंद्र शासनाने काश्मीरमधू ३७० कलम हटविल्यानंतर भारताचे नंदनवन अशी ख्याती असलेल्या काश्मीरमध्ये फिरण्यासाठी इच्छुक असलेल्या पर्यटकांची संख्या काही पटींनी वाढली आहे; विशेष म्हणजे शहरीसह ग्रामीण भागातील पर्यटकही या ठिकाणाला सर्वाधिक पसंती देत असल्याने येथील पर्यटकांची संख्या वाढली असून तेथील पर्यटनही चांगलेच बहरले आहे.

विशेषत: दिवाळी आणि उन्हाळयाच्या सुट्टीत याठिकाणी फिरायला जात असलेल्या पर्यटकांची संख्या गेल्या काही वर्षांच्या कालावधीत काही पटींनी वाढली आहे, विशेष म्हणजे विमानाच्या प्रवासाचा खर्च परवडत नसल्याने बहुतांशी पर्यटकांची रेल्वे प्रवासाला सर्वाधिक पसंती असते. त्यामुळे रेल्वेचे आरक्षण याकाळात नेहमीच फुल्ल असते, त्यामुळे बहुतांशी प्रवाशांना तिकिट मिळत नाही, त्यामुळे अनेक प्रवाशांना त्यांचा हा प्लॅन रद्द करावा लागतो.

यंदा मात्र त्यामध्ये वेगळी परिस्थिती उदभवली आहे, पहलगाम हल्ला झाल्यानंतर अनेक प्रवाशांनी त्यांचे प्लॅन रद्द केले असून आरक्षणही रद्द केले आहे. त्यासाठी अनेक प्रवासी ऑनलाईन अथवा प्रत्यक्ष रेल्वे स्थानकावर जाऊन आरक्षण रद्द करत आहेत. त्याचा सर्वाधिक फटका रेल्वे प्रशासनाला बसला असून त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

## "हेरिटेज यात्रा" उपक्रमाला शालेय विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**पुणे :** पुणे महानगरपालिका आणि एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ, पुणे (एमआयटी एडीटी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित "हेरिटेज यात्रा-२०२५" या तीन दिवसीय सांस्कृतीक वारसा उत्सवाला दुसऱ्या दिवशी शालेय विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. यात्रेच्या दुसऱ्या दिवशी सिंहगड रस्त्यावरील पु.ल.देशपांडे उद्यानात सकाळपासूनच पुण्यातील विविध शाळांतील विद्यार्थ्यांनी कलाग्रामला भेट देण्यास सुरुवात केली. लोणी काळभोर येथील विश्वशांती गुरुकुल स्कूल, सिंहगड स्प्रिंग डे, आणि बिबवेवाडी येथील विश्वकर्मा ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी सकाळीच हजेरी लावली

गुरुवारी महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त, पृथ्वीराज बी.पी., एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा.डॉ.मंगेश तु. कराड यांच्या हस्ते या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे उद्घाटन झाले. याप्रसंगी 'एमआयटी एडीटी'चे कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., कुलसचिव डॉ.महेश चोपडे, सुप्रसिद्ध गायिका प्रियांका बर्वे, प्राचार्या डॉ. अश्विनी पेठे, सहायक आयुक्त नामदेव बाजबळकर, राजेश कदबाने, गोविंद दांगट, सुनील मोहिते (वारसा विभाग पीएमसी), रोहिदास गव्हाणे (प्रभारी अधीक्षक अभियंता, भवन रचना विभाग पीएमसी), युवराज देशमुख (मुख्य अभियंता, प्रकल्प), राजेश कामठे (प्रशासकीय प्रमुख, सांस्कृतिक विभाग) उपस्थित होते.



# महाराष्ट्राच्या राजकारणाला दीर्घ साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा : अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे साहित्यिक देखील होते. भाषेवरचे प्रभुत्व आणि विचारांची मांडणी याव्दारे त्यांनी समस्त महाराष्ट्राला खिळवून ठेवले होते. वाचनाचा पाया पक्का असल्यास आपली विचारांवरची निष्ठा कायम राहून आपल्या भूमिकेवर ठाम राहता येते. महाराष्ट्राच्या राजकारणाला दीर्घ साहित्यिक सांस्कृतिक वारसा लाभला आहे, असे मत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

लोकसंवाद प्रकाशनातर्फे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या. पुणेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांच्या नर्मविनोदी भाषणांचे संकलन असलेल्या 'ऐकलंत का?' या पुस्तकाचे प्रकाशन आज राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.



**लोकसंवाद प्रकाशनातर्फे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या. पुणेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांच्या नर्मविनोदी भाषणांचे संकलन असलेल्या 'ऐकलंत का?' या पुस्तकाचे आज प्रकाशन करताना राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर मान्यवर.**

बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या या कार्यक्रम प्रसंगी व्यासपीठावर राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, जेष्ठ कवी आणि वात्रटिकाकार रामदास फुटाणे, शंकरभाऊ मांडेकर, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे, लेखक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या. पुणेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे, दिलीप मोहिते-पाटील, रमेश ढमाले, अशोक पवार, सुरेश घुले, विजय कोलते, चंद्रकांत मोकाटे, स्वप्नील ढमढेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे यांनी केले. पुस्तकाचे लेखक आणि पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्या. पुणेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांनी पुस्तक लेखनामागील भूमिका विशद केली.

### मी पुन्हा येईन.. मी पुन्हा येईन.. मी पुन्हा येईन!

● विरोधी पक्षनेते असताना देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्प समजून घेताना असे पुस्तक लिहिले होते. आता पुन्हा सत्तेत आल्यानंतर पुस्तक लेखनाचे महत्त्व ओळखून मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'मी पुन्हा येईन.. मी पुन्हा येईन.. मी पुन्हा येईन!' या विषयावर पुस्तक लिहायला सांगणार आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगताच सभागृहात हास्याचे कारंजे फुलले.

ज्ञान, अनुभव आणि वक्तृत्व असले म्हणजे तुमचे भाषण चांगले होते, असे नाही. तर ज्या व्यक्तीविषयी आपण बोलत असतो, त्या व्यक्तीविषयी आपल्या मनात कणव, तळमळ, प्रेम आणि आपलेपणा असेल, तरच ते भाषण भावस्पर्शी आणि मनाचा ठाव घेणारे होते.

**— अजित पवार,** उपमुख्यमंत्री

### आरोग्य भवनाच्या नवीन इमारतीचे भूमीपूजन: ४०० दिवसांत काम पूर्ण करण्याची ग्वाही

# जिल्हा स्तरावर सुपर स्पेशालिटी सुविधा देणार: अजित पवार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**पुणे :** आरोग्याच्या सगळ्या सुविधा एका छताखाली आणण्याचं काम सुरू आहे. जिल्हा स्तरावर सुपर स्पेशालिटी सेवा देण्याचा आमचा प्रयत्न आहे.शासकीय सेवा मिळाली पाहिजे, आम्ही जी काही सुविधा देतो, त्यामध्ये रुग्णांना मदत करताना गडबड होऊ नये. अन्यथा संबधितांवर कडक कारवाई करण्यात येइल, असा निर्वाणीचा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला.

पुण्यातील आरोग्य भवनाच्या नवीन इमारतीचं भूमिपूजन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडले, त्यावेळी बोलताना त्यांनी हा इशारा दिला. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर ,युवक व क्रिडा कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्याचे आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे व्यवस्थापकीय संचालक अमगोथू श्री रंगा नायक, आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी आदी उपस्थित होते. आदी याप्रसंगी उपस्थित होते.

राज्यातील जनतेला जलद आणि पारदर्शक सेवा उपलब्ध करून देणं हे आमचं मुख्य उद्दिष्ट आहे." "ससून रुग्णालयाला आवश्यक निधी दिला जात आहे. पुण्यात अनेक प्रशासकीय इमारतींचं काम सुरू आहे. पोलिस आयुक्तालयासाठी १९३ कोटी रुपये, एसपी कार्यालयासाठी ६२ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत.

या कार्यक्रमात बोलताना अजित पवार यांनी सरकारच्या २४ तास कार्यरत असलेल्या वेळापत्रकाची माहिती दिली. त्यांनी सांगितलं की, "झोपणारे ठराविक वेळी झोपतात मी पहाटे चारला उठतो, फिरतोय, व्यायाम करतो, मी पहाटे चारला कामाला सुरुवात करतो आणि सायंकाळी दहा अकरा पर्यंत काम करतो, तर सायंकाळी ११ ते २ मुख्यमंत्री काम करतात आणि एकनाथ शिंदे २ ते ४ काम करतात म्हणून आमचे सरकार २४ तास काम करते.

> या इमारतीसाठी ७३ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, ४०० दिवसांत काम पूर्ण करण्याचं उद्दिष्ट आहे. राज्यातील सर्व आरोग्य सुविधा सक्षम करुन गोरगरीब आणि गरजू रुग्णांना अधिकाअधिक दर्जेदार सेवा देण्याचा शासनाचा प्रयत्न असून आरोग्य विभाग त्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे.
> -प्रकाश आबिटकर, आरोग्यमंत्री

## ‘मराठा’ असोसिएशनच्या अध्यक्षपदी विक्रम गायकवाड

**पुणे :** मराठा आंत्रप्रेन्योर असोसिएशन पुणे विभागाच्या अध्यक्षपदी विक्रम गायकवाड यांची निवड झाली आहे. संघटनेचे उपाध्यक्ष म्हणून प्रमोद



साठे, विजय गवारे आणि नितीन बाबा भोसले यांची निवड करण्यात आली आहे. तर, संघटनेचे सचिव म्हणून साई बहिरट पाटील यांची निवड झाली आहे. सन २०२५-२६ व २०२६-२७ या दोन वर्षांच्या कालावधीसाठी ही निवड झाली आहे. मराठा आंत्रप्रेन्योर असोसिएशन ही मराठा उद्योजकांना एकत्र आणणारी आणि त्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारी संघटना आहे. उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम संघटनेच्या माध्यमातून राबविण्यात येतात. संघटनेचे संयुक्त सचिव म्हणून तेजस चरवड आणि किशोर जगताप यांची निवड झाली आहे तर कोषाध्यक्षपद राजेश कुराडे आणि संयुक्त कोषाध्यक्ष म्हणून धनंजय वाळके यांची निवड झाली आहे. मराठा आंत्रप्रेन्योर असोसिएशन ही संघटना उद्योग क्षेत्रातील नव्या संधी शोधणे, प्रशिक्षण कार्यक्रम राबवणे, उद्योजकांना एकत्र आणणे या उद्दिष्टांसाठी कार्यरत आहे.

## पिस्तूल, काडतूस बाळगले: तरुणास अटक

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही, ना कोणाशी भांडणे. पण, आपल्याबरोबरच्यामध्ये आपला रुबाब दाखविण्यासाठी त्याने एका कडून देशी कट्टा व जिवंत काडतुस घेऊन ते मिरवु लागला. पोलिसांच्या कानावर याची कुणकुण लागली आणि हडपसर पोलिसांनी या तरुणाला पकडले. त्याच्याकडून देशी बनावटीचा कट्टा व १ जिवंत काडतुस जप्त केले आहे. चिराग संजय सर्जेराव (वय २३, रा. अभिलाषा हाईटसच्या मागे, डिलाईट प्राईड, म्हसोबा वस्ती, मांजरी) असे त्याचे नाव आहे.

ही कामगिरी अपर पोलीस आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय मोगले, पोलीस निरीक्षक निलेश जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हसन मुलाणी, सत्यवान गेंड, पोलीस अंमलदार अविनाश गोसावी, दीपक कांबळे, अमित साखरे, निलेश किरवे, बापु लोणकर, अमोल दणके, अजित मदने, अभिजित राऊत, तुकाराम झुंजार, महेश चव्हाण, कुंडलिक केसकर, चंद्रकांत रेजितवाड, महावीर लोंढे यांनी केली आहे.



## भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त उद्या शोभायात्रा

**पुणे :** हिंदूंचे आराध्य दैवत आणि भगवान विष्णूंचे सहावे अवतार श्री भगवान परशुराम यांच्या जन्मोत्सवानिमित्त भगवान परशुराम जन्मोत्सव समिती पुणे च्या वतीने मध्य पुण्यात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, दिनांक २७ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता केसरी वाडा येथून यात्रेला प्रारंभ होणार असून शनिवारवाडा येथे समारोप होणार आहे, अशी माहिती समितीचे प्रमुख पदाधिकारी भालचंद्र कुलकर्णी व सूर्यकांत पाठक यांनी पत्रकार परिषदेत दिली. पत्रकार परिषदेला समितीचे प्रमुख पदाधिकारी विश्वजीत देशपांडे, मकरंद माणकीकर यांसह चैतन्य जोशी, मनोज पंचारिया, मयुरेश अरगडे, विश्वनाथ भालेराव, श्रीकांत जोशी, श्यामराव कुलकर्णी आदी उपस्थित होते. सूर्यकांत पाठक म्हणाले, भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त यापूर्वी देखील शोभायात्रा काढण्यात आली होती. यंदा भगवान परशुराम यांच्या मूर्तीसोबत छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्ती देखील शोभायात्रेत असणार आहे. याशिवाय काही लहान मुले क्रान्तिकारक व संतांच्या वेशभूषा करून सहभागी होणार आहेत. सर्व हिंदू समाजाला सोबत घेऊन ही शोभायात्रा काढण्यात येत असून सर्व जाती बांधवांनी सहभागी व्हावे.

# पाट्या टाकाल तर याद राखा

### शासनाचा ‘तिसरा डोळा’ ठेवणार प्रशासनावर वचक: अजितदादांचे स्पष्ट संकेत

> विकासकामांचा दर्जा हा राखलाच गेला पाहिजे; निधी देण्यासाठी शासन कधीही उणीव जाणवू देत नाही. मात्र; अधिकारी दुर्लक्ष करत असल्याने या विकासकामांचा दर्जा ढासळत चालला आहे. अशी सडेतोड टीका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केली. विकासकामांच्या दर्जाच्या संदर्भात कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही; आता या विकासकामांची देखरेख करण्यासाठी सरकारचा ‘तिसरा डोळा’ काम करेल असे स्पष्ट संकेत देत त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्हा नियोजन समितीच्या आज झालेल्या बैठकीत अजित पवार यांनी शहर आणि जिल्ह्यात सुरु असलेल्या विकासकामांचा लेखाजोखा घेतला, त्यावेळी त्यांना बहुतांशी विकासकामांचा दर्जा ढासळत असल्याचा थेट आरोप लोकप्रतिनिधींनी केला होता. त्यासंदर्भात थेट आरोप झाल्याने अजित पवार चांगलेच संतप्त झाले होते; त्यामुळे त्यांनी अधिकाऱ्यांना थेट रडारवर घेत त्यांना या विकासकामांच्या संदर्भात थेट निर्वाणीचा इशारा दिला.

राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, क्रिडा व युवा कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, पिंपरी चिंचवडचे महापालिका आयुक्त शेखर गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांच्यासह शहर आणि जिल्ह्यातील खासदार आणि आमदार याप्रसंगी उपस्थित होते.

विकासकामांसाठी निधी देण्यास शासन कधीही हात आखडता घेत नाही, तरीही अधिकारी या कामांच्या दर्जाबाबत उदासीन असल्याच्या तक्रारी आतापर्यंत आल्या आहेत. हा प्रकार कदापीही खपवून घेतला जाणार नाही असा इशारा देत पवार म्हणाले; यापुढील कालावधीत अशा पाट्या टाकण्याचे काम केल्यास संबधितांवर थेट कारवाई करण्यात येणार आहे. त्यासाठी शासनाचा ‘तिसरा डोळा’ यासाठी कार्यरत असणार आहे.

विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, सार्वजनिक आरोग्य विभागाचे काम समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. आरोग्य विभागाने आतापर्यंत विविध महत्त्वाच्या मोहिमा यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातही आपल्या सेवा पुरविल्या आहेत. या पुढील काळातही आरोग्य विभाग चांगली कामगिरी करून लोकांना दर्जेदार आरोग्य सेवा पुरवेल,असेही त्यांनी स्पष्ट केले.

> **तडजोड खपवून घेणार नाही: अजित पवार**
> ● त्यामध्ये दोषी आढळत असलेल्या अधिकारी आणि कामगार वर्गांवर थेट कारवाई करण्याचे आदेश संबधितांना देण्यात आले आहेत; त्यामुळे यापुढील कालावधीत कोणत्याही परिस्थितीत विकासकामांमध्ये होत असलेली तडजोड खपवून घेतली जाणार नाही. त्यासाठी आवश्यक असलेला निधी संबधित विभागाने मागितल्यास हा निधी देण्याची शासनाची तयारी आहे, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

## लकी डिजिटल ग्राहक योजनेचा ड्रॉ घोषित

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** सलग तीन किंवा किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यांपासून वीजबिल ऑनलाइन भरणाऱ्या लघुदाब वीजग्राहकांसाठी महावितरणने जानेवारी ते मे महिन्याच्या कालावधीसाठी 'लकी डिजिटल ग्राहक योजना' सुरु केली आहे.

यात पहिल्या ड्रॉमध्ये पुणे परिमंडलातील २३० वीजग्राहकांना बक्षिसे जाहीर झाली आहे. गुरुवारी मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांच्याहस्ते प्रातिनिधिक स्वरूपात ५ वीजग्राहकांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच बक्षिसांचे वितरण करण्यात आले.

'लकी डिजिटल ग्राहक योजने'त प्रत्येक उपविभागस्तरावर ५ बक्षिसे असून एकूण तीन लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे. प्रत्येक उपविभागासाठी प्रथम - एक स्मार्ट फोन, द्वितीय - दोन स्मार्ट फोन आणि तृतीय बक्षिस म्हणून दोन स्मार्ट घड्याळ असे प्रत्येकी पाच बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. त्यानुसार पुणे परिमंडलातील ४६ उपविभागांसाठी एकूण २३० बक्षिसांसाठी पहिला लकी ड्रॉ ऑनलाईन पध्दतीने दि. ७ एप्रिलला काढण्यात आला. या योजनेतील प्रातिनिधिक विजेते अनिल माने, मारूती मगर, छगनलाल सोळंकी, विद्या देशपांडे, एनरीच एनर्जी लिमिटेड यांना मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांच्याहस्ते स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच बक्षिसांचे वितरण करण्यात आले. उर्वरित विजेत्यांना विभाग व उपविभागस्तरावर बक्षिस वितरीत करण्यात येत आहे.

ग्राहकांना येत्या दि. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ पर्यंत सलग तीन किंवा त्यापेक्षा अधिक महिन्यांत नेटबँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस आदींद्वारे ऑनलाइन वीजबिल भरून योजनेत सहभागी होता येईल. तसेच मागील महिन्याच्या वीजबिलाची १० रुपयांपेक्षा अधिक थकबाकी नसावी. ऑनलाइन व संगणकीय पद्धतीने लकी ड्रॉ काढण्यात येणार असून योजनेच्या कालावधीत ग्राहक/ ग्राहक क्रमांक फक्त एकाच बक्षिसासाठी पात्र राहील.

या योजनेत यापुढे मे आणि जून महिन्यात संगणकीय पद्धतीने लकी ड्रॉ काढण्यात येणार आहे. त्याचा निकाल संबंधित महिन्यांच्या पहिल्या आठवड्यात महावितरणच्या वेबसाईटवर जाहीर होईल. तसेच संबंधित विजेत्या ग्राहकांच्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर बक्षिस जिंकल्याची माहिती देण्यात येईल. किंवा विजेते ग्राहक देखील तीन दिवसांच्या आत जवळच्या कार्यालयाशी संपर्क साधू शकतात. लकी डिजिटल ग्राहक योजनेबाबत महावितरणच्या www.mahadiscom.in वेबसाईट अधिक माहिती उपलब्ध आहे.

## दीवाना मस्ताना बहारदार कार्यक्रमाचे आयोजन

**पुणे :** भारतीय चित्रपटसृष्टील महान संगीतकार सचिन देव बर्मन आणि राहुल देव बर्मन यांनी रचलेल्या गाण्यांचे एक अद्भुत सादरीकरण तसेच लोकसंगीत, अर्धशास्त्रीय आणि आधुनिक संगीताचे सुंदर मिश्रण केलेल्या दीवाना मस्ताना या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन रविवारी, २७ एप्रिल सायंकाळी ७ वा. गणेश कला क्रीडा मंच, पुणे या ठिकाणी सर्वोत्कर्ष पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, पुणे यांनी आयोजन केले आहे. या प्रसंगी मराठीतील दिग्गज गायक बेला शेंडे, हृषिकेश रानडे, राजेश दातार, मधुरा दातार, जितेंद्र भुरूक, प्रशांत साळवी आणि चित्रपट कलाकारांच्या विशेष उपस्थितीत हा कार्यक्रम मोठ्या दिमाखात पार पडणार आहे. तरी जास्तीजास्त पुणेकरांनी सदरील कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन सर्वोत्कर्ष पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने करण्यात आले होते.

## देहविक्रीसाठी प्रियकराने महिलेला पाच लाखाला विकले

**पुणे :** देहविक्रीसाठी प्रियकराने महिलेला पाच लाख रुपयाला बुधवार पेठेतील कुंटणखान्यात विकले. पीडित महिला मूळची आसाम येथील आहे. त्यामध्ये एका पोलिस कर्मचाऱ्यावर देखील गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुण्यातील फरासखाना पोलिस ठाण्यात याप्रकरणी चौघा जणांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रियकर शफीऊल आबुल नसूर वाहीद आलम, पापा शेख, अधुरा शिवा कामली आणि डिबीवाला (तपास पथकातील पोलिस ) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी २५ वर्षीय पीडित महिलेने फिर्याद दिली आहे.

## वारज्यातील भीम फेस्टिव्हलला उस्फूर्त प्रतिसाद

**पुणे :** वंचित बहुजन माथाडी (पुणे शहर) आणि आदर्श प्रकाशमय सामाजिक सेवा संस्थेच्या वतीने भीम जयंतीनिमित्त आयोजित पाच दिवसीय भीम फेस्टिवलला मोठा प्रतिसाद मिळाला. वारजे महामार्ग पुलाखाली उभारलेल्या मंचावर दि.२० ते २५ एप्रिल २०२५ दरम्यान हा उत्सव पार पडला. मुख्य आयोजक महाराष्ट्र राज्य वंचित बहुजन माथाडी आघाडी पुणे शहराध्यक्ष अजय भालशंकर, उत्सव प्रमुख सचिन गजरमल ,कार्याध्यक्ष दत्ता शेंडगे यांनी संयोजन केले.

प्रबोधनकार अनिरुद्ध वनकर यांच्या यांच्या सलग पाच दिवशीचा भीम गीतांचा कार्यक्रम पार पडला. ज्येष्ठ नेते वसंत साळवे, वंचित बहुजन माथाडी आघाडी राज्य सरचिटणीस सुरेश मोहिते, उद्योजक लक्ष्मी जगदाळे,दलित पँथर महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष बाबासाहेब गायकवाड, वंचित बहुजन आघाडी शहराध्यक्ष एड.अरविंद तायडे, वंचित बहुजन आघाडी पुणे शहर उपाध्यक्ष एड.किरण कदम,वंचित अध्यक्ष बहुजन आघाडी युवक आघाडी अध्यक्ष सागर अल्हाट, राजा कांबळे,नितीन गायकवाड,उद्योजक सुरेखा गायकवाड, विकास भेगडे-पाटील,स्नेहा गायकवाड ,रोहन गायकवाड,माजी जिल्हा परिषद सदस्य प्रभाकर भोरकडे, प्रभाकर सरोदे,सतीश रणवरे,योगेश राजापूरकर, दीपक कदम आणि सर्व क्षेत्रांमधील उपस्थित होते.



# समाजाच्या सभोवताली उद्याच्या पिढीचीच चिंता: दिग्पाल लांजेकर

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** समाजात सभोवताली पाहिले तर उद्याच्या पिढीची काळजी वाटावी असे वातावरण आहे. आई-वडिल नोकरी किंवा उद्योगानिमित्त दिवसभर घराबाहेर असतात. तर एका पिढी पासून दुसऱ्यापिढी पर्यंत संस्कारांची नाळ सांधणारे आजी आजोबा घरातून हद्दपार झाले आहेत. अशा पार्श्वभूमीवर चित्रपटासारख्या प्रभावी माध्यमाद्वारे चार अद्भूत भावंडांची कथा मांडून संस्कारांची श्रृखंला बांधण्याचा एक प्रयत्न केला असल्याचे प्रांजळ मत 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाचे दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांनी व्यक्त केले.

नवचैतन्य हास्ययोग परिवारातर्फे 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटाच्या कलाकारांशी मुक्त संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी दिग्पाल लांजेकर बोलत होते. यावेळी नवचैतन्य हास्ययोग परिवारातील सदस्य मकरंद टिल्लू यांनी कलाकारांशी प्रकट मुलाखतीद्वारे संवाद साधला. या संवादात्मक कार्यक्रमात चित्रपटातील कलावंत तेजस बर्वे, नेहा नाईक, अजय पुरकर, समीर धर्माधिकारी, अवधूत गांधी, स्मिता शेवाळे सहभागी झाले होते. यावेळी नवचैतन्य हास्ययोग परिवाराचे संस्थापक-अध्यक्ष विठ्ठल काटे आणि कुसम काटे उपस्थित होते.



नवचैतन्य हास्ययोग परिवारातर्फे 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटातील कलाकारांशी मुक्त संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मकरंद टिल्लू यांनी प्रकट मुलाखतीद्वारे कलाकारांशी संवाद साधला. याप्रसंगी (डावीकडून) समीर धर्माधिकारी, नेहा नाईक, अवधूत गांधी, टिल्लू, दिग्पाल लांजेकर, अजय पूरकर, तेजस बर्वे आणि स्मिता शेवाळे.

यावेळी बोलताना दिग्पाल लांजेकर म्हणाले की, शिवरायांच्या रूपाने महाराष्ट्रावर "शक्ति" चा संस्कार झाला आहे, तर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या रुपाने "भक्ती" चा संस्कार झाला आहे. समाजात प्रचंड प्रमाणात ताण आहे, हे समाजमन सुदृढ व्हावे म्हणून भक्तीचा संस्कार होणे आवश्यक आहे. तरुणाईला त्यांच्या ताणाचे व्यवस्थापन करता येत नसल्याने तरूण पिढी व्यसनांच्या आहारी जात आहे. आळंदी हे असे ठिकाण आहे की, तिथे अमृतसमाधी अवस्थेत बसलेली माऊली तुमचे सर्व ताण हलके करते.

हा चित्रपट बनविण्यामागे नव्या पिढीपर्यंत माऊली पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. या चित्रपटाद्वारे निर्भीड मुक्ताई मांडण्याचा प्रयत्न केला असून मुक्ताई या पात्रा पासून प्रेरणा घेऊन भविष्यातील मुक्ताई तयार होतील अशी अपेक्षा लांजेकर यांनी यावेळी व्यक्त केली.

यावेळी बोलताना स्मिता शेवाळे म्हणाल्या की, यशोदाची भूमिका निभावणे हे माझ्यासाठी आव्हान होते, परंतू समस्त विश्वाला तारणाऱ्या शक्तीने मलाही तारले आणि आदिशक्ती माऊलीनेच माझ्या कडून यशोदा हे पात्र करून घेतले.

> पाठ्यशाळेतील धड्यांच्या माध्यमातून चांगदेव महाराजांची गुरू माऊली आणि ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण "मुक्ताई" ची तोंड ओळख होतीच. परंतू या चित्रपटाच्या निमित्ताने "मुक्ताई" मला नव्याने उमगली. "मुक्ताई"चा सर्व संतांना धाक होता, मुक्ताई या व्यक्तिरेखेला गवसणी घालणे माझ्यासाठी कठीण होते, परंतू यासाठी देखील मुक्ताईच दोन पाऊले पुढे आली आणि मी हे शिवधनुष्य पेलू शकली.
> — **नेहा नाईक,** मुक्ताईची भूमिका साकारत असलेल्या प्रसिद्ध अभिनेत्री



## सेमी क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेत अद्वैत कुमारची बाजी

**पुणे :** उत्कृष्ट चाली आणि चाणक्ष्य बुद्धिच्या जोरावर नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलचा विद्यार्थी अद्वैत कुमारने १२ वर्षाखालील सेमी क्लासिक बुद्धिबळ स्पर्धेत विजेतेपद पटकावले. त्याच्या यशाबद्दल ध्रुव ग्लोबल स्कूलचे संचालक यशवर्धन मालपाणी व प्रिन्सिपल संगीता राऊत यांनी शुभेच्छा दिल्यात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या वतिने नुकतेच खडकी येथील रेंज हिल्स मध्ये सेमी क्लासिक बुद्धिबळ स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. यामध्ये नांदे येथील ध्रुव ग्लोबल स्कूलचा विद्यार्थी अद्वैत कुमारने आपल्या उत्कृष्ट चालीनी सर्वांना चकित करत विजेतेपद पटकावले. आयोजित स्पर्धेत २६४ स्पर्धकानी भाग घेतला त्यांतून ७७ स्पर्धक हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्पर्धक होते. अद्वैतला प्रशिक्षक गणेश अंताड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

## राजमाता भुयारी मार्गातून तातडीने वाहतूक सुरू करा

**पुणे :** कात्रज चौकात उड्डाणपुलाचे काम सुरू असल्याने चौकातील वाहतूक वळविण्यात आलेली आहे. त्यात आता विकासकामांसाठी राजमाता भुयारी मार्ग बंद केल्यामुळे कात्रज ते नवले पूलदरम्यान वाहतूक कोंडी होत आहे. कात्रज-कोंढवा रस्ता, कात्रज चौक, दत्तनगर-जांभूळवाडी रस्ता, भारती विद्यापीठ मुख्य रस्त्यावर वाहतूक कोंडी होताना दिसत आहे. तासन्तास वाहनचालकांना कोंडीचा सामना करावा लागत आहे. यामुळे कामगार, नोकरदार वर्गाचे मोठे हाल होत असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. महापालिका प्रशासनाने लवकर कामे पूर्ण करून राजमाता भुयारी मार्गातून वाहतूक सुरू करावी. या काळात भारती विद्यापीठ वाहतूक विभागाने वाहतुकीचे व्यवस्थित नियोजन करावे. वाहतूक पोलिस व महापालिका वॉर्डन यांना रात्री नऊपर्यंत चौक व मुख्य रस्त्यावर नियमनाचे आदेश द्यावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.मदक्षिण पुण्यातील आंबेगाव (बुद्रुक) भारती विद्यापीठ, जांभूळवाडी, कोळेवाडी, दत्तनगर आणि इतर भागांतील नागरिक, वाहनचालक राजमाता भुयारी मार्गाचा वापर करतात. परंतु, जलवाहिनी, सांडपाणी वाहिनी, रस्त्याची व इतर कामे सुरू असल्याने सध्या हा भुयारी मार्ग बंद करण्यात आला आहे.यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे दक्षिण पुण्यातील नागरिक त्रस्त झाले आहेत. कात्रज ते नवले पुलापर्यंत ही कोंडी होत असून, वाहनचालकांकडून लवकर कामे पूर्ण करण्याची मागणी होत आहे.



## उष्ण हवामानामुळे शहरात मलेरियाचा 'ताप'

**पुणे :** मलेरिया पसरवणारे अनोफिलीस डास गरम आणि दमट हवामानात सहज वाढतात. त्यामुळे उन्हाळ्यात डासांची संख्या वाढते आहे आणि मलेरियाचे रुग्णही वाढत आहेत. हवामान बदलाचा आणि तापमान वाढीचा परिणाम पुण्यात मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. उष्ण हवामानामुळे मलेरियासारखे आजार वाढत आहेत. सामान्यतः मलेरिया पावसाळ्यात किंवा त्यानंतर जास्त प्रमाणात वाढतो. मात्र, हवामान बदलामुळे वर्षभर कधीही मलेरियाचा धोका असतो. वाढलेली आर्द्रता डास वाढण्यास योग्य ठिकाण तयार करतात. शहरात योग्य निचऱ्याची सोय नसल्यामुळे, उपनगरांमध्ये विशेषतः हडपसर, कात्रज आणि पिंपरी-चिंचवडसारख्या गर्दीच्या भागांमध्ये समस्या वाढते आहे, याकडे रुबी हॉल क्लिनिकचे संसर्गजन्य रोग सल्लागार डॉ. देवाशिष देसाई यांनी लक्ष वेधले आहे. हिवताप, डेंग्यू, चिकुनगुनिया या आजाराच्या रुग्ण व्यवस्थापनासाठी राज्यातील 401 वैद्यकिय अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण पार पडले आहे. यशदा येथे हिवताप या पोर्टलमध्ये हिवतापाची माहिती भरणेसाठी विशेष प्रशिक्षण देण्यात आले. पुणे नॉलेज सेंटरच्या वतीने आरोग्य कर्मचाऱ्यांचे साथरोगाच्या अनुषंगाने प्रशिक्षणही पार पडले.

# धैर्य, साहस आणि बलिदान




**पुणे** कारगील युद्धात भारतीय सेनेने दाखविलेले धैर्य, साहस आणि बलिदान याच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी आयोजित करण्यात येत असलेली आंतरराष्ट्रीय 'सरहद शौर्याथॉन' ही फक्त क्रीडा स्पर्धा नसून भारतातील सर्व धर्मीयांना व संस्कृतींना एकत्र आणण्याचा मोलाचा उपक्रम करीत आहे.

## 'सरहद शौर्याथॉन' स्पर्धेच्या बोधचिन्हाचे, संकेतस्थळाचे अनावरण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** कारगील युद्धात भारतीय सेनेने दाखविलेले धैर्य, साहस आणि बलिदान याच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी आयोजित करण्यात येत असलेली आंतरराष्ट्रीय 'सरहद शौर्याथॉन' ही फक्त क्रीडा स्पर्धा नसून भारतातील सर्व धर्मीयांना व संस्कृतींना एकत्र आणण्याचा मोलाचा उपक्रम करीत आहे. या स्पर्धेद्वारे शांती, एकात्मकता आणि सद्भावनेचा संदेश दिला जात आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

झोजी ला युद्ध विजय अमृत महोत्सव आणि कारगील युद्ध विजय रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने 13 जे. के. रायफल्स आर्मी युनिट, द्रास टाऊन, कारगिल डिस्ट्रिक, लडाख यु. टी. यांचे युनिट, सरहद, पुणे आणि अर्हम् फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 22 जून 2025 रोजी लडाख येथील झोजी ला वॉर मेमोरिअल ते कारगिल वॉर मेमोरिअल दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय 'सरहद शौर्याथॉन' 2025 स्पर्धेच्या बोधचिन्ह आणि संकेतस्थळाचे अनावरण अजित पवार यांच्या हस्ते आज (दि. 25) व्हीव्हीआयपी शासकीय विश्रामगृह येथे झाले. त्या वेळी पवार बोलत होते.

# राजेंद्र पवार महावितरणच्या संचालक (मानव संसाधन) पदी रूजू

## पुणे परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी सुनिल काकडे


महावितरण कंपनीचे संचालक (मानव संसाधन) म्हणून राजेंद्र पवार यांनी कार्यभार स्वीकारला. त्यांची या पदावर थेट भरती प्रक्रियेतून निवड झाली आहे. याआधी ते पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. तर पुणे परिमंडलाच्या मुख्य अभियंतापदी सुनिल काकडे रुजु झाले आहेत.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महावितरणमधील सेवेचा ३६ वर्षांचा अनुभव असणारे नवनियुक्त संचालक (मानव संसाधन) पवार हे मूळचे भऊर (ता. देवळा, जि. नाशिक) येथील रहिवासी आहे. त्यांनी विद्युत अभियांत्रिकी पदवी पुणे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून (सीओईपी) विशेष प्राविण्यासह प्राप्त केली आहे. त्यानंतर १९८९ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळात कनिष्ठ अभियंता म्हणून वाशी (ता. पेण) येथे रूजू झाले. त्यानंतर पदोन्नतीवर त्यांनी सहायक अभियंता, उपकार्यकारी अभियंता पदी काम केले आहे. सन २०११ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या काळात त्यांनी पेण, कळवण, नाशिक, पनवेल, कल्याण येथे काम केले आहे. तसेच अधीक्षक अभियंता म्हणून नागपूर व पुणे येथे काम केले आहे. गेल्या सव्वादोन वर्षांपासून पवार पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते.

संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार यांनी याआधीच्या सेवेत लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुणे परिमंडलामध्ये मुख्य अभियंता म्हणून त्यांनी महसूलवाढ, नवीन वीजजोडण्या, छतावरील सौर ऊर्जा प्रकल्पांमध्ये विक्रमी कामगिरी केली आहे. सोबतच कर्मचारी प्रशिक्षण व कार्यशाळा, कर्मचारी प्रोत्साहनपर विविध उपक्रम, कर्मचारीपाल्यांची अनुकंपा तत्त्वावरील भरती प्रक्रिया आदींना मोठा वेग दिला. त्यांच्या नेतृत्वात प्रशिक्षण व विविध उपक्रमांमुळे पुणे लघु प्रशिक्षण केंद्राला सलग तीन वर्ष राज्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. त्यापूर्वी पवार यांनी स्वतः 'ऑन फिल्ड' राहून मुंबईचा महापूर, पुण्यातील 'तौक्ते', 'निसर्ग' चक्रीवादळे, 'कोरोना' आदी संकटांमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे नेतृत्व केले आहे.

> 'महावितरणच्या सर्व कर्मचाऱ्यांसाठी मानव संसाधनाचे एक आश्वासक व्यवस्थापन सदैव उपलब्ध राहील. कंपनी व कर्मचारी हिताला प्राधान्य देत अंतर्गत प्रशासकीय कामकाज आणखी गतिमान करण्यासह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि प्रशिक्षणातून कर्मचाऱ्यांचे ज्ञान व कौशल्य वाढविण्यावर भर राहणार आहे.
>
> **-राजेंद्र पवार,** संचालक (मानव संसाधन)





महावितरणच्या पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून सुनील काकडे यांनी शुक्रवारी (दि. २५) कार्यभार स्वीकारला.ते मूळचे छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी आहे. विद्युत अभियांत्रिकीचे पदवीधर असलेले काकडे १९९७ मध्ये तत्कालिन म. रा. विद्युत मंडळामध्ये सहायक अभियंता म्हणून रूजू झाले. सन २००६ मध्ये थेट भरती प्रक्रियेमधून त्यांची कार्यकारी अभियंता पदी निवड झाली. या पदावर त्यांनी चाळीसगाव, नाशिक, भुसावळ, छत्रपती संभाजीनगर येथे काम केले. तर २०१७ पासून पदोन्नतीने अधीक्षक अभियंता म्हणून त्यांनी कल्याण, अहिल्यानगर, भांडूप येथे काम केले. काकडे यांची डिसेंबर २०२२ मध्ये मुख्य अभियंता म्हणून पदोन्नती झाली व भांडूप परिमंडलात कार्यरत होते. आता पुणे परिमंडलाचे मुख्य अभियंता म्हणून त्यांची बदली झाली आहे.

पुणे परिमंडलामध्ये 'इझ ऑफ लिव्हिंग'नुसार तत्पर ग्राहकसेवा तसेच सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठ्यासोबतच महावितरणच्या महसूलवाढीला सर्वाधिक प्राधान्य दिले जाईल, असे मुख्य अभियंता काकडे यांनी सांगितले.

## अकरावीं प्रवेश ऑनलाइन पध्दतीने राबविणार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने येत्या १५ मेपर्यंत दहावीचा निकाल जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. त्या पार्श्वभूमीवर यंदा अकरावीची प्रवेश प्रक्रिया देखील लवकर सुरू करण्यात येणार असून, राज्यस्तरावर प्रवेश प्रक्रिया नेमकी कशा पद्धतीने राबवायची याचा शासन निर्णय येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये जाहीर करण्यात येणार असून, त्यानुसार संपूर्ण राज्यात प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यभरात केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येणार आहे. या प्रवेश प्रक्रियेला पुढील आठवड्यात सुरुवात होईल. त्यासाठीचे वेळापत्रक येत्या दोन ते तीन दिवसांमध्ये जाहीर करण्यात येणार आहे.

सॉफ्टवेअरमधील बदलामुळे यंदा विद्यार्थ्यांना फार थोडी माहिती भरावी लागणार असल्याचे शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेली काही वर्षे सहा महापालिका क्षेत्रांमध्ये राबवण्यात येणारी अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून राज्यभरात केंद्रीय ऑनलाइन पद्धतीने राबवण्यात येणार आहे. संबंधित प्रक्रिया १ एप्रिलपासूनच सुरू करण्यासंदर्भात सांगण्यात आले होते. परंतु, संबंधित प्रक्रिया काही तांत्रिक कारणास्तव पुढे ढकलण्यात आली आहे. गेली काही वर्षे मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआरडीए), पुणे, पिंपरी-चिंचवड, अमरावती, नागपूर आणि नाशिक या महानगरपालिका क्षेत्रात ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येत आहे. या प्रवेश प्रक्रियेची उपयोगिता लक्षात घेऊन संबंधित प्रवेश प्रक्रिया राज्यभर राबवण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रियेची अंमलबजावणी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक स्तरावरून करण्यात येईल.

पुणे, अहिल्यानगर, नाशिक या तिन्ही जिल्ह्यांची प्रवेश प्रक्रिया पूणे उपविभागीय संचालक स्तरावर राबविली जाणार आहे. अशाच प्रकारे राज्यातली इतर विभागांमध्ये विभागनिहाय उपसंचालक स्तरावरून प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यासाठीची निविदा प्रक्रिया सुरू करून एजन्सीची नियुक्ती देखील करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे. यंदा सरकारी पातळीवर वापरण्यात येत असलेल्या सर्व सिस्टीमचा डाटा इंटिग्रेड केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाचा अर्ज भरताना जी माहिती द्यावी लागत होती.

## पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ निदर्शने

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पहलगाम येथे झालेल्या दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात निष्पाप पर्यटक हिंदू बंधवांना गोळ्या घालून ठार केले गेले. या निर्दयी भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ अपूर्व सोनटक्के, केतकी देशपांडे, बाळासाहेब गिराम यांच्या पुढाकाराने प्रभात तरुण मित्र मंडळ आणि डेक्कन जिमखाना नागरिक मंच च्या वतीने कमला नेहरू पार्क, प्रभात रस्ता येथे तीव्र निदर्शने करण्यात आली.

काश्मीर, पहलगाम येथिल हिंदु पर्यटकांवरील इस्लामी दहशतवादी हल्ल्याचा तीव्र निषेध करण्यासाठी पाक पंतप्रधान शहाबाज शरीफ आणि पाक लष्कर प्रमुख असिम मुनीर व पाकिस्तानच्या झेंड्याचे दहन करुन त्यांच्या विरोधात जोरदार घोषणा देत निदर्शने करण्यात आले.

या मध्ये महिलांनी उस्फूर्त सहभाग घेतला. आणि स्त्री शक्तीचे संगठन दिसून आले. केतकी देशपांडे, सुवर्णा ऋषि, रंजना नाईक, किमया ढेकणे ,अलका पेशवे ,भक्ती साठे ,माधवी अगरवाल, अपूर्व सोनटक्के, बाळासाहेब गिराम ,विवेक देव,हर्षल मोरे,योगेश जोगळेकर अजिंक्य मेहता, प्रदीप देशपांडे, मिलिंद टकले, पुष्कर लिमये तसेच कामाला नेहरू पार्क मधील नागरिकांचा सहभाग दिसून आला.




# पीएमआरडीए' च्या प्रस्तावित कामांसाठी आमदार लांडगे "ॲक्शन मोड"वर!

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पिंपरी :** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (पीएमआरडीए)च्या प्रस्तावित कामांसाठी भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांनी आयुक्त योगेश म्हसे यांच्या उपस्थितीत मॅरेथॉन बैठक घेतली. शहराच्या अनुषंगाने पीएमआरडीअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या योजना आणि विविध विकास प्रकल्पांचा आढावा यावेळी घेण्यात आला. तसेच, प्रलंबित विकास कामांना तातडीने गती द्यावी, निधीसाठी पुरवठा करावा, अशा सूचनाही दिल्या आहेत.



पुण्यातील 'पीएमआरडीए' प्रशासकीय इमारतीत गुरुवारी (दि 24) बैठक पार पडली. पिंपरी-चिंचवड शहराच्या अनुषंगाने राबवण्यात येणाऱ्या 'पीएमआरडीए'च्या प्रस्तावित योजना व विविध विकास प्रकल्पांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. यावेळी पुणे प्रदेश महानगर विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त योगेश म्हसे, अतिरिक्त आयुक्त दीपक सिंगला, मुख्य अभियंता रीनाज पठाण, उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी हिम्मत खराडे, सह महनगर नियोजनकर श्वेता पाटील, सह आयुक्त दीप्ती सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता प्रभाकर वसईकर, कार्यकारी अभियंता अनिता कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### वाहतूक कोडी सोडवण्याचा प्रयत्न...

● पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रीय महामार्ग आणि अंतर्गत मुख्य रस्त्यांवर चाकण, रांजणगाव, तळेगाव, हिंजवडी अशा औद्योगिक व आयटी पट्ट्यातून सकाळी व संध्याकाळी कामावर ये-जा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना, प्रवाशांना मोठ्याप्रमणात वाहतूक कोंडीचा त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे पुणे-नाशिक महामार्गावर प्रस्तावित एलिव्हेटेड कॉरिडॉर, तळेगाव-शिक्रापूर रस्ता यासह इनर रिंगरोडचे काम गतीमान करणे आवश्यक आहे. त्यासाठी भूसंपादनाची प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करावी. तसेच, अंतर्गत मुख्य रस्ते आणि महामार्ग यांच्या "मिसिंग लिंक" पूर्ण करुन वाहतूक सक्षमीकरण करण्याबाबत 'कृती आराखडा' तयार करावा.

आमदार महेश लांडगे यांनी पीएमआरडीएकडील प्रलंबित कामांविषयी तातडीने अंमलबजावणी करण्याची सूचना केली. औद्योगिक प्रदर्शन केंद्र बाबत कालावधी कृती आराखडा करण्याची गरज आहे. त्या दृष्टीने नियोजन करावे असे सांगितले. या प्रदर्शन केंद्रासाठी राज्य शासनाकडे 200 कोटी रुपयांची निधीची मागणी केलेली आहे. त्या संदर्भात पाठपुरावा सुरू असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी इंद्रायणी व पवना नदी सुधार प्रकल्प बाबत सादरीकरण केले. केंद्र आणि राज्य शासनाकडून इंद्रायणी व पवना नदी सुधार योजनेसाठी निधी बाबत सद्यस्थिती आमदारांनी जाणून घेतली. इंद्रायणी नदी सुधार प्रकल्प नागरिकांच्या भावनांशी जोडलेला असल्याने, तो जलद गतीने (फास्ट ट्रॅक) पूर्ण करण्यासाठी प्राधान्य देणे आवश्यक आहे.

> पिंपरी-चिंचवड शहर मेट्रोसिटीच्या म्हणून प्रगतीशील वाटचाल करीत आहे. पीएमआरडीए अंतर्गत शहर व लगतच्या परिसरामध्ये विविध प्रकल्प तसेच सेवा सुविधांविषयी कामे सुरू आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पीएमआरडीएचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत. त्याच्या 'व्हीजन'ला साजेसा कारभार या अस्थापनेच्या माध्यमातून झाला पाहिजे.
>
> **— महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे



## पिंपरी-चिंचवडचे अडकलेले १४ प्रवासी सुखरूप परत

**चिंचवड :** रहाटणी येथील वर्धमान हाइट्स सोसायटीमधील एकाच कुटुंबातील १४ जण श्रीनगर येथे अडकले होते. स्थानिक परिस्थिती व तिकीट उपलब्धतेच्या अडचणींमुळे ते अत्यंत चिंतेत होते. या संकटात त्यांना आधार मिळाला तो म्हणजे पिंपरी-चिंचवडचे आमदार शंकर जगताप. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे या सर्वांना श्रीनगर ते पुणे या प्रवासासाठी हवाई तिकीट मिळवून दिले गेले.

या प्रवाशांमध्ये गिरीश नायकवडी, विनय आगरखेड, सचिन पवार, प्रमोद पाटील आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा समावेश होता. हे सर्व जण सहलीसाठी श्रीनगरमध्ये गेले होते. मात्र परतीच्या प्रवासासाठी आवश्यक तिकिटे मिळत नसल्याने ते अडचणीत सापडले होते. शंकर जगताप यांनी परिस्थितीची गंभीरता ओळखून लगेचच संपर्क साधून प्रयत्न सुरु केले. दिल्ली व श्रीनगरमधील विमान कंपन्या, नागरी उड्डाण विभाग, तसेच संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधण्यात आला. यामध्ये केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या कार्यालयानेही मोलाचे सहकार्य केले. अखेर २३ एप्रिलच्या रात्री उशिरा या सर्व १४ जणांसाठी श्रीनगरहून पुण्याकडे येणाऱ्या विमानाचे तिकीट मिळाले. २४ एप्रिलच्या पहाटे चार वाजता हे सर्व जण श्रीनगरहून पुण्यास रवाना झाले.



## फँटॅस्टिक १५ संघ वुमेन्स लीगचा विजेता

**चिंचवड :** राहुल कलाटे फाऊंडेशन आयोजित पिंपरी चिंचवड शहरातील भव्य 'पिंपरी चिंचवड वुमेन्स प्रिमियर लीग २०२५' या क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामान्यात "फँटॅस्टिक १५" या संघाने फ्लॅमिंगो संघावर २९ धावांनी दणदणीत विजय मिळवून पिंपरी चिंचवड वुमेन्स प्रिमियर लीग-२०२५ किताबावर आपले नावं कोरले.



## लाडक्या बहिणींनाच नाट्यगृह हवं आहे', असे दादांना सांगा : अनासपुरे

**तळेगाव दाभाडे :** तळेगावकरांची नाट्यगृहाची मागणी पूर्ण होणे अवघड नाही. 'तळेगाव दाभाडेमधील लाडक्या बहिणींनाच नाट्यगृह हवे आहे', असे उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांना सांगा म्हणजे लवकर निधी मिळेल, अशी मिश्किल टिपणी अभिनेते मकरंद अनासपुरे यांनी केली. दरम्यान, जगभरातील दहशतवाद्यांच्या धर्माविषयी कल्पना काढून टाकून त्यांचा ब्रेनवॉश करण्याचे ईश्वराला साकडे घालतो, असेही अनासपुरे म्हणाले. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदे तळेगाव दाभाडे शाखेच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अभिनेते अनासपुरे बोलत होते.

यंदाचा कलागौरव पुरस्कार हास्य जत्रा फेम अभिनेत्री नम्रता संभेराव व प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक व लेखक प्रसाद खांडेकर यांना, प्रसिद्ध सतार वादक विदुर महाजन यांना जीवन गौरव पुरस्काराने, तर प्रा. नितीन फाकटकर यांना विशेष गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी आमदार सुनील शेळके, प्रगतशील शेतकरी सुनील जाधव, नंदकुमार वाळंज, नाट्य परिषद तळेगाव दाभाडे शाखेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश धोत्रे, कार्याध्यक्ष गणेश काकडे आदी उपस्थित होते. अभिनेते अनासपुरे म्हणाले, की पुरस्कार प्रदान केलेल्यांची तपश्चर्या, शिस्त वाखाणण्याजोगी आहे. अभिनेत्री नम्रता संभेराव व अभिनेते प्रसाद खांडेकर यांना धडपडताना जवळून पाहिले आहे. तळेगाव दाभाडे शहर सुसंस्कृत व राहण्यास वातावरण पोषक असल्याने इथे घर घेण्याचा विचार आहे.

## पालिकेच्या ८ कामगारांना 'विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार'



**चिंचवड :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून दिला जाणारा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार कामगार मंत्री अ‍ॅड. आकाश फुंडकर यांनी जाहीर केले आहेत. विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारासाठी राज्यभरातून ५१ कामगारांची निवड करण्यात येते. त्यामधील आठ कामगार पिंपरी-चिंचवडमधील आहेत. `कंपनीमध्ये नोकरी करत असतानाच विविध सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, क्रीडा, साहित्यिक, संघटन क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या कामगारांना हा पुरस्कार देऊन गौरवण्यात येते. पुरस्काराचे स्वरूप पंचवीस हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र असे आहे. येत्या १३ मे रोजी कामगार मंत्री, कामगार कल्याण आयुक्त व मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन, प्रभादेवी, मुंबई येथे होणार आहे.

# 'आमदार आपल्या दारी' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**रहाटणी :** चिंचवड विधानसभा मतदारसंघातील रहिवाशांच्या अडचणी, समस्या आणि स्थानिक प्रश्न थेट जाणून घेण्यासाठी 'आमदार आपल्या दारी' या उपक्रमाचे आयोजन रहाटणी येथील थोपटे लॉन्समध्ये करण्यात आले होते. या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात नागरिकांनी आपल्या परिसरातील विविध समस्या मांडल्या. यामध्ये रस्त्यांची दुर्दशा, अपुरा पाणीपुरवठा, वीजपुरवठ्याची समस्या, स्वच्छतेचा अभाव, ड्रेनेजची अडचण अशा महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश होता. उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांचे म्हणणे गांभीर्याने ऐकले आणि आमदारांकडून तातडीने आवश्यक सूचना देण्यात आल्या.

कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभही देण्यात आला. विशेषतः श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधार योजना यांतून पात्र लाभार्थ्यांना पेन्शन पत्रके वाटप करण्यात आली. यामुळे अपंग, ज्येष्ठ नागरिक, विधवा महिलांना दिलासा मिळाला.

### नागरिकांकडून कृतज्ञता व्यक्त

- 'आमदार आपल्या दारी' उपक्रमामुळे लोकप्रतिनिधींशी थेट संवाद साधता येतो, समस्यांचे निवारण जलद गतीने करता येते, यामुळे नागरिकांमध्ये समाधानाची भावना दिसून आली. जनतेच्या प्रश्नांवर प्रत्यक्ष निर्णय घेण्याचे काम या कार्यक्रमातून झाले, असे मत अनेकांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्या निष्पाप भारतीय नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली. देशासाठी प्राण गमावलेल्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना वातावरण भावनिक झाले.



# ६९७ रक्तदात्यांचे रक्तदान...

## एकत्वाच्या भावनांचा एक आत्मिक संगम

### संतांचा दृढविश्वास

- हा दिवस बाबा गुरबचनसिंहजी... 

- हा दिवस चाचा प्रतापसिंहजी यांच्यासह त्या सर्व समर्पित बलिदानी संतांच्या पुण्य स्मृतिचे प्रतीक आहे, ज्यांनी मानव एकता, निःस्वार्थ सेवा आणि आध्यात्मिक जागृतीच्या मार्गावर चालत असताना आपले संपूर्ण जीवन समर्पित केले. मानव एकता दिवस त्याच संतांचा दृढविश्वास व दृढसंकल्पाची प्रेरणा जिवंत करतो.

- आरोग्य तपासणी, स्वच्छतेची विशेष काळजी आणि रक्तदात्यांसाठी उत्तम जलपान व्यवस्था या बाबींनी या सेवेला आणखी व्यवस्थित व कौतुकास्पद बनवले.
- हे महाअभियान केवळ रक्तदान नसून सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांचा करुणा, सेवा आणि एकत्वाचा संदेश जीवनात उतरविण्याचे सजीव माध्यम आहे.
- यातून मानवता हाच सर्वोच्च धर्म याची शिकवण मिळते.
- याच प्रेरणेने युक्त संत निरंकारी मिशन, सेवा आणि समर्पणाच्या पथावर निरंतर मानवतेचा मार्ग प्रशस्त करत आहे.



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**भोसरी :** प्रेम आणि बंधुभावना जागविणारा 'मानव एकता दिवस', संत निरंकारी मिशन द्वारे दरवर्षी २४ एप्रिल रोजी बाबा गुरबचनसिंहजी यांच्या पावन स्मृतिप्रित्यर्थ श्रद्धा आणि भक्तिभावनेने परिपूर्ण वातावरणात आयोजित केला जातो. हा दिवस केवळ पुण्यस्मरण करण्याचा प्रसंग नसून मानवता, सौहार्द आणि एकत्वाच्या भावनांचा एक आत्मिक संगम आहे.

यावर्षी सुद्धा संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन मार्फत पूर्ण भारतवर्षात सुमारे ५००हून अधिक शाखांमध्ये भव्य रक्तदान शिबिरांची अखंड श्रृंखला आयोजित करण्यात आली. संत निरंकारी सत्संग भवन, दिघी रोड, भोसरी येथे २४ एप्रिल २०२५ रोजी करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ६९७ मिशनच्या अनुयायांनी निस्वार्थ भावनेने रक्तदान केले त्याचबरोबर समाजातील अनेक सज्जनांनी उत्साह आणि समर्पण भावनेने स्वेच्छा रक्तदान करुन मानवकल्याणामध्ये आपला सहयोग दिला. वाय.सी.एम. रुग्णालय रक्तपेढी यांनी २१६ युनिट, ससून रुग्णालय रक्तपेढी यांनी १०१ युनिट, संत निरंकारी रक्तपेढी यांनी ३८० युनिट रक्त संकलन करण्याचे कार्य केले.

मानव एकता दिवसाच्या या प्रसंगी मिशन कडून देशभर रक्तदानाच्या एका प्रेरक श्रृंखलेचा शुभारंभ होतो. नि:स्वार्थ सेवाभावनेच्या सामूहिक जागृतीचे स्वरूप बनून संपूर्ण वर्षभर समाजामध्ये प्रवाहित होत राहते. त्याचबरोबर सत्संग कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रेम, शांती आणि समरसतेचा प्रकाश देखील जनसामान्यांपर्यंत पोहचविला जातो.

## डॉ. अक्षय माने यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**पिंपरी :** महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ट्रस्ट असोसिएशनच्यावतीने राज्यस्तरीय पुरस्काराचे आयोजन केले होते. ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात सोहळा पार पडला. शैक्षणिक सामाजिक व राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पिंपरी-चिंचवड मधील विद्यादीप शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. अक्षय माने यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.


**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ८४/२०२५/२१९**

**अर्जदार**
ऐश्वर्या रेसिडेन्सी (II) सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. ७६/१०, सिटीएस नं. १५०८/५ महादजी शिंदे चौक, वानवडी, जि. पुणे - ४११०४०
तर्फे, अध्यक्षः श्री. लालासाहेब मारुती अडागळे, सचिव : श्री. मुकेश ओघवजी भाटिया
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. कर्नावत असोसिएटस् नोंदणीकृत प्रोप्रायटरी संस्था
तर्फे प्रोप्रायटर, श्री. संजय मोहनलाल कर्नावत
पत्ताः १२३२, भवानी पेठ, पुणे - ४११०४२
अनु क्र.३ ते ५ तर्फे कु.मु. म्हणून जाब देणार नं. १
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. सोपान किसन जगताप, ३. श्री. सुर्यकांत किसन जगताप, ४. सौ. कलावती किसन जगताप
पत्ताः सर्वे नं.७६/१०, सिटीएस नं. १५०८/५, महादजी शिंदे चौक, वानवडी, जि. पुणे - ४११०४०
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये ऐश्वर्या रेसिडेन्सी (II) सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. ७६/१०, सिटीएस नं. १५०८ /५ महादजी शिंदे चौक, वानवडी, जि. पुणे - ४११०४० या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणे **कामीचा अर्ज क्र.८४/२०२५** दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अ‍ॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ४ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ४ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः **सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५** रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/ जमिन मालक क्र.१ ते ४ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २९/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**
**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ५६५ /२०२४/२५४**

**अर्जदार**
पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. सी - २ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः सर्वे नं. ११७/१, वारजे (माळवाडी), मुंबई- बेंगलोर हायवे जवळ, ता. हवेली, जि. पुणे- ४११०५८.
तर्फे, अध्यक्षः श्री. अशोक नामदेव चव्हाण, सचिव : श्री. सतीश पद्मनाथ इंगळे
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक/ जाब देणार नं. १
१. मे. पॉप्युलर कन्स्ट्रक्शन्स नोंदणीकृत प्रोप्रायटरी संस्था, तर्फे प्रोप्रायटर, श्री. मनोज मोहनलाल शर्मा, रा. २६१, रस्ता पेठ, पुणे - ४११०११
२. मे. शर्मा असोसिएट्स नोंदणीकृत भागीदारी संस्था, तर्फे भागीदार
अ. श्री. मोतीलाल गिरधारीलाल शर्मा, ब. श्री. सुरेश मोहनलाल शर्मा ऑफिस पत्ताः १९९२, कॉन्व्हेंट स्ट्रीट, पुणे - ४११००१.
जागा मालक / जाब देणार नं. २
३. सौ. विशाखाबाई पुरुषोत्तम दुबे, ४. श्री. विश्वनाथ पुरुषोत्तम दुबे, ५. श्री. मनोहर पुरुषोत्तम दुबे
६ श्री. विनायक पुरुषोत्तम दुबे, ७. श्री. मोहन पुरुषोत्तम दुबे, ८. सौ. सुमती कमलाकर तिवारी
९. सौ. विमल नरेंद्र दुबे, १०. सौ. मीरा शरद दुबे, अनु क. ३ ते १० रा. ३७१, शुकवार पेठ, पुणे- ४११००२.
जाब देणार नं. ३ / इतर सहकारी गृहरचना संस्था
१. प्रोप्रोसिव्ह एज्युकेशन सोसायटी तर्फे चेअरमन गजानन रमाकांत एकबोटे
सेक्रेटरी दिलीपसिंग गुलाबसिंग परदेशी
२. पुनाकर कंस्ट्रक्शन प्रा. लि. तर्फे मॅनेजिंग डायरेक्टर सुरेश मोहनलाल शर्मा १३. बालाजी गॅस सप्लायर्स, तर्फे भागीदार, शाम मोहनलाल शर्मा
१४. मे. स्टार शारदा अलाईन्स, तर्फे भागीदार, विलास रखमाजी यादव, राकेश मोतीलाल शर्मा
१५. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. ई-२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
१६. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. बी- ८ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित १७. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. डि-२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित १८. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. बी- १० सहकारी गृहरचना संस्था मर्यादित १९. गिरीधरनगर बिल्डिंग नं. डी-१७ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित २०. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. डी-१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित २१. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी- १८ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित २२. गिरीधरनगर बिल्डिंग नं. सी १ बी को. ऑप हौसिंग सोसायटी लिमिटेड २३. गिरीधरनगर आंगण नं. ई-५ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित तर्फे चेअरमन श्री. हुकमाराम स्वरुपाराम भदरेचा, सेक्रेटरी सौ. नयना हितेंद्र मोहरीर २४. गिरीधरनगर आंगण नं. बी-२० सहकारी गृहरचना संस्था मर्यादित तर्फे
चेअरमन श्री. पप्पुराम जी देवासी सेक्रेटरी श्री. संकेत संजय जोशी
२५. गिरीधरनगर आंगण नं. बी-२१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित तर्फे चेअरमन श्री. भाऊसाहेब विठ्ठलराव शितोळे, सेक्रेटरी सौ. शिवानी आर चौधरी २६. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी-१६ को. ओप. हौसिंग सोसायटी, लि. तर्फे, अथोराईज्ड निळकंठ प्रल्हाद शिंदे, ज्ञानदेव प्रभाकर चाबुकस्वार २७. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी- १५ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित २८. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी-३ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित २९. गिरीधरनगर बिल्डिंग नं. C1A को. ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड ३०. गिरीधरनगर बिल्डिंग नं. डी- १६ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३१. पॉप्युलरनगर बिल्डिंग नं. ए-२ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३२. गिरीधरनगर बिल्डिंग नं. अे-१ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३३. गिरीधरनगर बिल्डिंग नं. बी- १९ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित ३४. स्पंदन रेसिडेन्सी को. ऑप. हौ. सोसायटी लि. बिल्डींग डी- ११
अनु क. ११ ते ३४ पत्ताः सर्वे नं. ११७ / १, वारजे (माळवाडी), मुंबई - बेंगलोर हायवे जवळ, ता. हवेली, जि. पुणे ४११०५८.
१. महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ याच्या कलम ११ (३) अन्वये आणि लागू असलेल्या नियमान्वये अर्जदाराने प्रवर्तकांच्या / प्रतिपक्षाच्या विरुध्द वरील अर्ज दाखल केला आहे.
२. प्रवर्तक / वादी यांना त्यांच्या बचावासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकिलामार्फत अथवा त्याच्या अधिकृत प्रतिनिधीमार्फत सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००५ येथे दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. लेखी उत्तर दाखल करण्यासाठी बोलावण्यात येत आहे आणि दाखल केलेले उत्तर कोणतेही असल्यास सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर यांचे कार्यालयामध्ये दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. या वेळेत उत्तर प्राप्त करुन घ्यावे असा सल्ला देण्यात येत आहे.
३.प्राप्त झालेले / न झालेले लेखी उत्तर विचारात घेऊन वरील प्रकरणातील अंतिम सुनावणी, तोंडी युक्तीवाद सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ येथे दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. निश्चित करण्यात येत आहे.
४.आपण व्यक्तीशः किंवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधी मार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास किंवा दिनांकांना उपस्थित राहिला नाही तर प्रकरणाचा गुणवत्तेवर निर्णय देण्यात येईल.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ३०/२०२५/२१८**

**अर्जदार**
पिरॅमिड व्हिला सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः स. नं. ७१/१/२ (पैकी), सिटीएस नं. २३८७ (पैकी), सांगवी, ता. हवेली जि. पुणे - ४११०२७.
तर्फे, अध्यक्ष : श्री. भुषण प्रल्हाद गाजरे, सचिव : श्री. वैभव दिलीप अत्तरदे
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक/जाब देणार नं. १
१.मे. पिरॅमिड वास्तु डेव्हलपर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
ऑफिस पत्ता- श्री हॉईटस, जुनी सांगवी, ता. हवेली जि. पुणे - ४११०२७.
तर्फे भागीदार, अ. श्री. केशवराव मारुतराव शिरोळ, ब. श्री. राहुल केशवराव शिरोळ
जाब देणार नं.१ अ व ब रा. २५९, शिवाजीनगर, पुणे - ४११००५.
क. श्री. संदिप कृष्णा आलम (देशमुख), रा. रो हाऊस नं.2, सदगुरु हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रस्ता, पुणे- ५३.
ड. श्री. हितेंद्र पुंडलिकराव पाटील, रा. जयमाला नगर, सांगवी, ता. हवेली जि. पुणे- २७.
जागा मालक / मान्यता देणार / जाब देणार नं. २
२. अ. श्री. अभिजीत गजेंद्र गुंटाळ, रा. स. नं. २४४/६, माजी सैनिक नगर, येरवडा, पुणे - ४११००६.
ब. सौ. नंदा आजिनाथ सलगर, रा. स.नं.५३, संतकृपा अपार्टमेंट, विनायक नगर,
पिंपळे गुरव, ता.हवेली जि. पुणे - ४११०२७.
जाब देणार नं.२ तर्फे कु. मु. धारक म्हणुन
मे. मिरॅकल एन्टरप्रायजेस, तर्फे भागीदार, १. श्री. हितेंद्र पुंडलिकराव पाटील, रा. जयमालानगर, सांगवी, पुणे- २७.
२. श्री. संदिप कृष्णा आलम (देशमुख), रा. रो हाऊस नं.२, सदगुरु हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रस्ता, पुणे- ५३.
३. श्री. रविंद्र दत्तात्रय पाटे (वाणी), रा. राजवैभव, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८.
४. श्री. महेश बाबुराव देशपांडे, रा. वात्सल्यनगरी, कुंबरे टाऊनशिप, कोथरूड, पुणे- ४११०३८.
यांचेतर्फे कु.मु. धारक म्हणुन जाब देणार नं. १
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये पिरॅमिड व्हिला सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स. नं. ७१/१/२ (पैकी), सिटीएस नं. २३८७ (पैकी), सांगवी, ता. हवेली जि. पुणे - ४११०२७. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र. ३० / २०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १८/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अ‍ॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ( अ ते ड), २(अ.ब) व २(१ ते ४) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१(अ ते ड), २(अ.ब) व २ (१ ते ४) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ (अ ते ड ), २(अ. ब) व २ (१ ते ४) यांनी उपस्थित क्र.१(अ ड), २(१ राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्राआधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत**
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**
**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ७९/२०२५/२१३**

**अर्जदार**
मिकासा सी-१ आणि सी-२ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ताः गट नं. ८७८/१/८७९/३,८७८/१/८७९/४, ८७८/१/८७९/५,८७८/१/८७९/६ व ८७९ (पार्ट), वाघोली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७
तर्फे, अध्यक्षः श्री. आशिष हनुमंत भुजबळ, सचिव : श्री. हर्षल राजेंद्र वाणी
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक/ जाब देणार नं. १
१. मे. गगन ग्लोबल डेव्हलपर्स, पत्ताः ऑफिस नं. ३०८, सिटी पॉइंट बिल्डींग, ढोले पाटील रोड, पुणे - ४११००१
तर्फे भागीदार, अ. श्री. जसप्रीतसिंग आर. राजपाल, ब. श्री. मोहित जगदीश गोयल
अ.क्र.१ अव १ ब हे अ.क्र. २ ते ८ तर्फे कुलमुखत्यार म्हणून
पत्ताः १०२, लापिस लझ्झुली, कोरेगाव पार्क, लेन नं ५, पुणे - ४११००१
जागा मालक / जाब देणार नं. २
२. श्री. बाबूराव बाळासाहेब सातव (स्वतः करिता व हिंदु एकत्र कुटुंब प्रमुख म्हणून)
३. सौ. आशा बाबूराव सातव, ४. सौ. आशा प्रदीप देवकर, 5. श्रीमती भिकाबाई बाळासाहेब सातव अ.क्र. ते ५ रा. गट नं. ८७८ (पै) आणि ८७९ (पै), वाघोली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७
६. श्री. नरेंद जगन्नाथ मित्तल, रा. बी / ४०२, सुजय गार्डन, पुणे - ३७
७. धिमान धिरेन सन्नामथ्, रा. केसनंद फाटा, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७
८. सौ. जनाबाई रंगनाथ कटके, रा. कटकेवाडी, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७
९. मैं गगन ग्लोबल डेव्हलपर्स, पत्ताः ऑफिस नं. ३०८, सिटी पॉइंट बिल्डींग, ढोले पाटील रोड, पुणे - ४११००१ तर्फे भागीदार, अ. श्री. जसप्रीतसिंग आर. राजपाल, ब. श्री. मोहित जगदीश गोयल
पत्ताः १०२, लापिस लझ्झुली, कोरेगाव पार्क, लेन नं ५, पुणे- ४११००१
इतर सहकारी गृहरचना संस्था / इतर इमारत
१०. मिकासा जी विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
पत्ताः गट नं. ८७८/१/८७९/१,८७८/१/८७९/२, ८७८/१/८७९/३, ८७८/१/८७९/४, वाघोली,ता.हवेली, जि.पुणे
११. मिकासा फेज १ सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, (मिकासा डी, इ व एफ इमारत)
१२. मिकासा ए-१ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
१३. मिकासा ए-2 विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
१४. मिकासा बी-१ आणि बी-२ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
15. मिकासा एच-१ आणि एच-२ विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
अ.क्र. ११ ते १५ पत्ताः गट नं. ८७८/१/८७९/१, ८७८/१/८७९/२, ८७८/१/८७९/३, ८७८/१/८७९/४, वाघोली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७
२/-
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये मिकासा सी-1 आणि सी-2 विंग सहकारी गृहरचना संस्था मर्यादित गट नं. ८७८/१/८७९/३,८७८/१/८७९/४, ८७८/१/८७९/५, ८७८/१/८७९/६ व ८७९ (पार्ट), वाघोली, ता. हवेली, जि. पुणे - ४१२२०७ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.७९/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी **दिनांक २५/०३/२०२५** रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने अ‍ॅड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते १५ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते १५ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः **सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५** रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १ ते १५ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे
निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

संपादकीय विशेष

# जलकोंडी कसा परिणाम करेल?

पाकिस्तानची अर्थव्यवस्था आणि शेती मुख्यत्वे सिंधू नदी आणि तिच्या उपनद्यांवर अवलंबून आहे. पाकिस्तानला या नद्यांमधून दर वर्षी सुमारे १३५ दशलक्ष एकर-फूट पाणी मिळते. हे त्याच्या जीडीपीमध्ये २५ टक्के योगदान देते. गहू, भात, ऊस, कापूस ही पिके याच पाण्यावर अवलंबून आहेत. भारताने पाण्याचे प्रमाण थोडे कमी केले, तर पाकिस्तानच्या काही भागात, विशेषतः पंजाब आणि सिंध प्रांतांना शेती आणि पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावू शकते. पाकिस्तानला आधीच पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. लोकसंख्यावाढ, हवामानबदल आणि खराब पाणी व्यवस्थापन यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. पाण्याचा प्रवाह कमी झाल्यास पाकिस्तानसाठी मोठे संकट निर्माण होऊ शकते; परंतु सिंधू नदीचा पाणीपुरवठा पूर्णपणे बंद होणार नाही. कारण नैसर्गिक प्रवाह रोखणे कठीण आहे. भारताने घेतलेला हा निर्णय पाकिस्तानसाठी मोठा संकेत आहे. या कराराला स्थगिती देऊन भारताने पाकिस्तानला दहशतवादाविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. ताज्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर या प्रश्नाच्या काही बाजू समजून घ्यायला हव्यात.



सिंधू नदी जल करार हा गेल्या ६४ वर्षांपासून भारत आणि पाकिस्तान यांच्यातील पाणीवाटपाचा आधार आहे. हा करार १९६५, १९७१ आणि १९९९ ची युद्धे आणि अनेक दहशतवादी हल्ल्यांमध्येही कायम राहिला. हा जगातील सर्वात मजबूत जल करार मानला जातो. हे त्याच्या संरचनेमुळे स्पष्ट दिसते. त्यात पाणीवाटप, माहितीची देवाणघेवाण आणि विवादांचे निराकरण करण्याची पद्धत समाविष्ट आहे. भारताने या कराराला स्थगिती दिली असली, तरी तो पूर्णपणे संपला आहे, असे नाही. सध्या भारताचे हे पाऊल म्हणजे कडक इशारा आहे; मात्र पाण्याचा नैसर्गिक प्रवाह आणि दोन्ही देशांचे परस्पर अवलंबित्व यामुळे पाकिस्तानला कमी प्रमाणात पाणी मिळणे सुरूच राहील. हा करार दोन्ही देशांसाठी किती महत्त्वाचा आहे, हे त्याच्या ६४ वर्षांच्या ताकदीवरून दिसून येते. भारताचे हे पाऊल एक मजबूत संदेश आहे. सिंधू नदीचे पाणी केवळ पाकिस्तानच्या शेतांनाच सिंचन करत नाही, तर लाखो लोकांचे जीवन फुलवते. पाकिस्तानची शेती, पिण्याचे पाणी आणि वीजनिर्मितीचा मोठा भाग याच पाण्यावर अवलंबून आहे. भारताने सिंधू जल कराराला स्थगिती देण्याची ही पहिलीच वेळ आहे.

भारताने सिंधू जल करारावर बंदी घातल्याने पाकिस्तानमध्ये पाण्याचे संकट निर्माण होईल आणि त्याचा परिणाम शेतीवर होईल. १९ सप्टेंबर १९६० रोजी तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष अयुब खान यांनी या करारावर स्वाक्षरी केली होती. सिंधूच्या उपनद्या पूर्व आणि पश्चिम भागात विभागल्या आहेत. सिंधू, चिनाब आणि झेलमचे पाणी पाकिस्तानच्या वाट्याला गेले. भारत रावी, बियास आणि सतलजचे पाणी वापरतो. या करारामध्ये, सिंधू खोऱ्यातून वाहणाऱ्या सहा नद्या पूर्व आणि पश्चिम भागात विभागल्या गेल्या. यापैकी बियास, रावी आणि सतलज या पूर्वेकडील नद्या मानल्या जात होत्या आणि त्यांचे पाणी भारतासाठी राखीव होते. त्याच वेळी, सिंधू, चिनाब आणि झेलम या पश्चिम नद्या मानल्या जात होत्या आणि त्यांचे पाणी पाकिस्तानसाठी राखीव होते. भारत सिंधू, चिनाब आणि झेलम या पश्चिम नद्यांचे २० टक्के पाणी रोखू शकतो. दोन्ही देशांना हा वाद शांततेने सोडवावा लागेल, विवाद परस्परसंवादातून सोडवावे लागतील, असे या करारात नमूद करण्यात आले होते. जर चर्चेने तोडगा निघाला नाही तर हे प्रकरण सिंधूवरील स्थायी आयोगाकडे जाईल. त्यातूनही वाद मिटला नाही, तर हे प्रकरण आंतरराष्ट्रीय न्यायालयात जाईल, असे करारात म्हटले असून न्यायालयाचा निर्णय अंतिम मानावा लागणार आहे.

भारत आणि पाकिस्तानदरम्यान अनेक युद्धे झाली; पण आजपर्यंत कधीही हा करार रद्द किंवा निलंबित करण्यात आलेला नाही. आता भारताने हा करार पुढे ढकलला आहे. पाकिस्तानला या नद्यांमधून ऐंशी टक्के पाणी मिळते. पंजाब आणि सिंध प्रांतांची शेती याच पाण्यावर अवलंबून आहे. यातील ९३ टक्के पाणी सिंचनासाठी वापरले जाते, त्याशिवाय शेती करणे अशक्य आहे. पाकिस्तानच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा २३ टक्के आहे, ६८ टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. कराची, लाहोर आणि मुलतानसारखी पाकिस्तानातील प्रमुख शहरे सिंधू आणि तिच्या उपनद्यांच्या पाण्यावर अवलंबून आहेत. पाकिस्तानचे तरबेला आणि मंगलासारखे ऊर्जा प्रकल्प सिंधूच्या पाण्याचा वापर करून चालवले जात आहेत. पाकिस्तानातील अन्न उत्पादनात घट होऊ शकते, अन्न सुरक्षा धोक्यात येऊ शकते.

सिंधू जल करारावरील शेवटची बैठक ३०-३१ मे २०२२ रोजी नवी दिल्ली येथे झाली. या बैठकीचे दोन्ही देशांनी सौहार्दपूर्ण वर्णन केले. पूर्वेकडील नद्यांवर भारताचा हक्क आहे, तर पश्चिमेकडील नद्या पाकिस्तानला देण्यात आल्या आहेत. हा करार जागतिक बँकेच्या मध्यस्थीने झाला. भारताला सतलज, बियास आणि रावी या तीन पूर्वेकडील नद्यांमधून वाटप केलेल्या एकूण १६८ दशलक्ष एकर फुटांपैकी ३३ दशलक्ष एकर फूट वार्षिक पाणीवाटप करण्यात आले आहे.

या नद्यांचे पाणी भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांसाठी महत्त्वाचे आहे. अशा परिस्थितीत हा करार पुढे ढकलणे पाकिस्तानला महागात पडणार आहे. अनेक तज्ज्ञांनी सिंधू जलकराराला ऐतिहासिक चूक मानले आहे. भारताने ही चूक सुधारून करारात आवश्यक सुधारणा करून सिंधू आणि तिच्या उपनद्यांचे पाणी योग्य प्रमाणात द्यावे, असे ते सांगत आहेत. पाकिस्तान अधूनमधून भारतावर दहशतवादी हल्ले करत आहे. अशा परिस्थितीमध्ये रक्त आणि पाणी एकत्र वाहू शकत नाही. नेहरू यांनी दोन्ही देशांमधील संबंध वाढीस लागतील, या आशेने हा करार केला; मात्र पाकिस्तानने प्रत्येक वेळी ही आशा धुळीस मिळवली आहे. पाण्यासारख्या संवेदनशील मुद्द्यावर कारवाई करण्यासाठी जागतिक समुदाय भारताला प्रश्न विचारू शकतो. यामुळे भारत आणि पाकिस्तानमधील तणाव आणखी वाढू शकतो. तथापि, या निर्णयाचे काही तोटेदेखील असू शकतात. नवीन धरणे किंवा जलाशय बांधण्यासाठी भारताला मोठा खर्च येऊ शकतो. अशा स्थितीत भारत सरकारने घेतलेला सिंधू जल करार स्थगित करण्याचा निर्णय पाकिस्तानला मोठा धक्का देणारा ठरणार आहे.

# मराठी पाऊल पडते पुढे!

**अधिकारी होण्याचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थी पाहतो आणि जेंव्हा हे स्वप्न साकार होते तेंव्हा त्याचा आनंद फक्त त्या विद्यार्थ्याला नसतो तर त्याच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्र मंडळींना आणि समाजालाही असतो. असाच आनंद बिरदेव डोणे या गरीब मेंढपाळ असलेल्या विद्यार्थ्याला मिळालेल्या यशानंतर संपूर्ण महाराष्ट्राला झाला आहे. बिरदेव डोणेने जे यश या परीक्षेत मिळवले आहे ते प्रेरणादायी आहे.**

भरारी

श्याम ठाणेदार, पुणे



केंद्रीय लोकसेवा आयोगाने (युपीएससी) नागरी सेवा परीक्षा - २०२४ चा अंतिम निकाल जाहीर केला. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय प्रतिष्ठेची समजली जाते. दरवर्षी विविध पदांकरिता आयोगाकडून परीक्षा घेतली जाते. दरवर्षी लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात. युपीएससीने २०२४ च्या परीक्षेसाठी आयएएस, आयपीएससह ११३२ पदांसाठी भरती जाहीर केली होती. यामध्ये १००९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात ७२५ पुरुष आणि २८४ महिलांचा समावेश आहे. म्हणजेच ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यात महिलांची संख्याही लक्षणीय आहे. महिलांचे हे यश नक्कीच सुखावणारे आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांत महाराष्ट्रातील ९० हून अधिक विद्यार्थ्यांत समावेश आहे. पहिल्या शंभर यशस्वी विद्यार्थ्यांत ७ मराठी विद्यार्थी आहेत. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. पूर्वी या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांत मराठी विद्यार्थ्यांची संख्या नगण्य होती पण मागील काही वर्षांपासून या परीक्षेतही मराठी मुलांनी बाजी मारून मराठी मुलेही कशात कमी नाही हे दाखवून दिले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय कठीण असते. नागरी सेवेमधील ही सर्वोच्च परीक्षा असून या परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय अधिकारी होतात. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी खूप मेहनत घेतात रात्रीचा दिवस करतात. १२ ते १८ तास विद्यार्थी अभ्यास करतात त्यातून त्यांना हे यश मिळते. या परीक्षेत यश मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थी पाहतो आणि जेंव्हा हे स्वप्न साकार होते तेंव्हा त्याचा आनंद फक्त त्या विद्यार्थ्याला नसतो तर त्याच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्र मंडळींना आणि समाजालाही असतो. असाच आनंद बिरदेव डोणे या गरीब मेंढपाळ असलेल्या विद्यार्थ्याला मिळालेल्या यशानंतर संपूर्ण महाराष्ट्राला झाला आहे. बिरदेव डोणेने जे यश या परीक्षेत मिळवले आहे ते प्रेरणादायी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील मेंढपाळ कुटुंबात जन्मलेल्या बिरदेवचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातीलच मराठी शाळेत झाले. दहावी बारावीत चांगले गुण मिळाल्यानंतर त्याने अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले आणि हे स्वप्न साकार करण्यासाठी त्याने रात्रीचा दिवस केला. पहिल्या दोन प्रयत्नात त्याला यश मिळाले नाही मात्र तिसऱ्या प्रयत्नात मात्र तो यशस्वी झाला आणि देशात ५५१ वी रँक मिळवली. केवळ बिरदेवचीच नव्हे तर या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्वच मराठी मुलांची कहाणी प्रेरणादायी आहे. जिद्द आणि ईच्छाशक्तीला मेहनतीची जोड मिळाली तर या जगात काहीही अशक्य नाही हेच या मुलांनी दाखवून दिले आहे. महाराष्ट्रातील या मुलांचे यश पाहून भविष्यात महाराष्ट्रातून आणखी सनदी अधिकारी निर्माण होतील यात शंका नाही. या परीक्षेत यशस्वी झालेले बहुतेक विद्यार्थी मराठी माध्यमातून शिकलेले आहेत हे विशेष. लाखो रुपये डोनेशन भरून इंग्रजी माध्यमात आपल्या मुलांना दाखल करणाऱ्या आणि इंग्रजी माध्यमातून शिकले तरच करियर होते असा समज असणाऱ्यांसाठी तर ही मोठी चपराक आहे. या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन! सनदी सेवेमध्ये मराठी मुलांचे हे यश पाहून ' मराठी पाऊल पडते पुढे! ' असेच म्हणावे लागेल.





खेचाखेची

## दगडापेक्षा 'इट' मऊ

शाळेत इंग्रजीचा तास सुरू असतो.

**मास्तर** : गण्या "it" केव्हा वापरतात?

.

.

.

**गण्या** : घर बांधताना !!

मास्तरांनी गण्याच्या डोक्यात 'इट' घातली.

वेगळं काही

चॉकलेट्स महाग असू शकतात. पण एका चॉकलेटची किंमत चक्क सहा लाख रूपयांपेक्षाही अधिक असल्याचं बोललं जातं. हे चॉकलेट २३ कॅरेट सोन्यापासून तयार करण्यात आलं आहे. यासोबतच केशर, व्हाईट ट्रफल, मादागास्कारमधून मागवण्यात आलेलं व्हॅनिला आणि सोन्याच्या फ्लेक्सचा वापरही यात करण्यात आला आहे. बॉन बॉन असं या चॉकलेटचं नाव आहे. पोर्तुगालमध्ये आयोजित आंतरराष्ट्रीय चॉकलेट फेस्टिवलदरम्यान ते सादर करण्यात आलं. हे अनोखं चॉकलेट लांबून पाहण्यासाठी खूप गर्दी झाली होती. डॅनियल गोम्स यांनी हे चॉकलेट बनवलं आहे. यासाठी त्यांना एक वर्ष लागलं. या चॉकलेटचं पॅकिंगही मौल्यवान आहे.


फॅशन पॅशन

## कुर्ता इन स्टाईल

कधीकाळी पुरुषांची मक्तेदारी असणारा कुर्ता स्त्रियांच्या पेहराव श्रेणीत कधी सामावला हे समजलंही नाही. आता बाजारात स्टायलिश कुर्त्यांची मोठी रेंज बघायला मिळते. जाणून घेऊ या या ट्रेंडविषयी...

✻ असिमिट्रिक कुर्ता – सगळ्यांमध्ये उठून दिसायचं तर हा कुर्ता मस्ट आहे. बेल्टच्या सहाय्याने या कुर्त्याला खास लूक देता येतो. जीन्स, लेगिंग्ज किंवा जेगिंग्ज यापैकी कशासोबतही हा कुर्ता मॅच होतो. ✻ अंगरखा स्टाईल कुर्ता – सध्या जुन्या काळातले अंगरखे कुर्त्यांच्या स्वरुपात समोर येत आहेत. डेली वेअर, फॉर्मल वेअर किंवा पार्टी वेअर अशा कोणत्याही प्रकारात हा पॅटर्न उपलब्ध आहे. गरजेनुसार उंची कमी–जास्त करता येते. ✻ शर्ट कुर्ता – ऑफिससाठी हा कुर्ता सर्वोत्तम पर्याय आहे. ✻ जॅकेट कुर्ता – आजकाल जॅकेटची क्रेझ आहे. रॉयल लूकसाठी भरजरी जॅकेटचा उपयोग करता येतो. कुर्त्यावर जॅकेटचा उपयोग केल्यास युनिक लूक मिळण्यास मदत होते. कॉटन, क्रेप, जॉर्जेट, लायक्रा आदी फॅब्रिकमध्ये जॅकेट्स उपलब्ध आहेत. ✻ मॅंडेरिन कॉलर – एलिगंट लूक मिळवायचा असेल तर हा कुर्ता सर्वोत्तम पर्याय आहे.






राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या भेटीने दिलासा मिळेल. व्यवसायात सुधारणा होईल. स्थावर प्रश्नातून मार्ग निघेल.
- **वृषभ** : हाती घेतलेली कामं विनासायास होतील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. मुलांची प्रगती होईल.
- **मिथुन** : प्रवासाचा उद्देश सफल होईल. नोकरीचे प्रयत्न सुरू ठेवावे. उपजत कलागुणांचा विकास होईल,
- **कर्क** : कोणताही निर्णय घाईने घेऊ नका. कार्यात एकाग्रता महत्त्वाची ठरेल. प्रवासात काळजी घ्यावी.
- **सिंह** : मोठी खरेदी उत्साहात होईल. विजेच्या उपकरणांपासून सावध रहावं. आर्थिक समस्या संभवतात.
- **कन्या** : स्वकर्तृत्त्वावर पूर्ण विश्वास ठेवा. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **तूळ** : विचारांची दिशा निश्चित ठेवा. विचलित करणाऱ्या घटना संभवतात. पुरेसा संयम बाळगायला हवा.
- **वृश्चिक** : नोकरीत आनंदवाता समजेल. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **धनु** : अपेक्षित फलप्राप्ती होईल. पित्ताचे विकार संभवतात. व्यवसायात नवे करार मार्गी लागतील.
- **मकर** : खऱ्या हितचिंतकांची पारख करा. दुसऱ्यावर विसंबणं हानीकारक ठरेल. विचारपूर्वक पावलं टाका.
- **कुंभ** : छोटा–मोठा प्रवस घडेल. चैनीवर अधिक खर्च होईल. विवाहाच्या प्रश्नात तडजोड करावी लागेल.
- **मीन** : व्यापारवृध्दीस अनुकूलता राहील. घरगुती वाद वेळीच दूर करावे. मानसिक अस्वास्थ्य राहील.

स्टाईल स्टेटमेंट

## स्टायलिश स्लीव्हज

कोणत्याही पेहरावाचा लूक खुलवण्यात स्लीव्हज म्हणजेच बाह्यांची महत्त्वाची भूमिका असते. सध्या बाह्यांच्या वेगवेगळ्या पॅटर्न्सची चलती आहे. या बाह्या स्टायलिश दिसतातच शिवाय चांगला फीलही देतात. बाह्यांच्या पॅटर्न्सवर एक नजर टाकू या... ✻ 'रफल स्लीव्हज' हा प्रकार भारतीय पारंपरिक पेहरावांमध्ये जास्त शोभून दिसतो. सध्या ब्लाऊज, कुर्ते तसंच चोलीमध्ये अशा स्लीव्हजचा वापर केला जात आहे. विशेष प्रसंगी घालायच्या कपड्यांची रंगत रफल स्लीव्हजमुळे अधिक वाढेल. ✻ सध्या 'बेल स्लीव्हज' हा प्रकार बराच लोकप्रिय ठरत आहे. या स्लीव्हज पुढच्या बाजूने ढगळ असतात. पण बारीक हाताच्या मुलींनी बेल स्लीव्हज कॅरी करणं टाळावं. ✻'लाँग केप स्लीव्हज'चा ट्रेंडही जोरात आहे. सुरूवातीला शॉर्ट केप स्लीव्हजची चलती होती. त्याची जागा आता लाँग स्लीव्हजने घेतली आहे. ✻ पूर्ण बाह्यांमध्ये 'बॉक्सी स्लीव्हज'ची लोकप्रियता वाढली आहे. पाश्चिमात्य पेहरावांवर स्लीव्हजचा हा प्रकार खुलून दिसतो. या स्लीव्हज खालच्या बाजूने फुगीर असतात. हात जाड असतील तर अशा स्लीव्हज कॅरी करता येतील.

## २६ एप्रिल

दिनविशेष

- **१९२०** : भारतीय गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा मृत्यू.
- **२०१५** : भूकंपाच्या तीव्र हादऱ्यांमुळे नेपाळ उद्ध्वस्त.
- **२०१७** : राजस्थान विधानसभेत गोंधळ घालणाऱ्या काँग्रेसच्या बारा आमदारांना वर्षभरासाठी निलंबित करण्यात आलं.
- **२०१८** : उत्तर प्रदेशातील कुशीनगर इथे मानवरहित रेल्वेक्रॉसिंगवर पॅसेंजरने स्कूल व्हॅनला उडवलं. १३ विद्यार्थी ठार, आठ जखमी.

महत्त्वपूर्ण काही...

## रंगांच्या राज्यात

छोट्या दोस्तांनो, बऱ्याच जणांच्या परीक्षा झाल्या असतील. त्यामुळे सुट्टीत काय करायचं असा प्रश्न तुम्हाला पडला असेल. बरोबर ना? दुपारच्या वेळक्ष उन्हात न जाता घरातच राहून काय करता येईल बरं? अशा वेळी साईड वॉक चॉक पेंट ही ॲक्टिव्हिटी तुम्ही करू शकता.

**साहित्य** : कॉर्नस्टार्च, पाणी, कप, बाऊल, खाण्याचे रंग, रंगवायचे ब्रश, प्लास्टिकचे छोटे कंटेनर इत्यादी.

**कृती:** साईड वॉक चॉक पेंट बनवण्यासाठी एक कप पाणी आणि एक कप कॉर्नस्टार्च एकत्र करा. कॉर्नस्टार्चच्या गाठी बनणार नाहीत याकडे लक्ष द्या. कॉर्नस्टार्च पाण्यात विरघळेपर्यंत ढवळून घ्या. यानंतर हे मिश्रण प्लास्टिकच्या छोट्या कंटेनरमध्ये भरा. आता या कंटेनरमध्ये रंग घाला. मिश्रण एकजीव करून घ्या. तुमचा रंग तयार झाला आहे. या रंगांच्या मदतीने तुम्ही छान छान कलाकृती तयार करू शकता. खायचे रंग नसतील तर इतर रंगांचा वापरही करता येईल. याच्या साह्याने तुम्ही हवी ती चित्र रंगवू शकता. मग परीक्षा संपली की लागा कामाला...

पंचांग

**शनिवार, २६ एप्रिल २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र कृ, १३/१४
नक्षत्र : उ. भाद्रपदा, रेवती
चंद्रराशी : मीन, योग : वैधृति, विष्कंभ
सूर्योदय : ६.१६, सूर्यास्त : ६.५७

फॉरवर्डस

**किती सुंदर शब्दांमध्ये शायर व्यक्त झाला आहे पहा...**

बदल जाओ वक्त के साथ या फिर वक्त बदलना सिखो।

मजबूरियों को मत कोसो, हर हाल में चलना सिखो।

आरोग्यमंत्र

## डोळे राहतील सतेज

डोळे हा शरीरातला अत्यंत नाजूक आणि महत्त्वपूर्ण अवयव आहे. म्हणूनच त्यांची तंदुरुस्ती जपणं गरजेचं ठरतं. डोळ्यांचं आरोग्य जपण्यासाठी काही व्यायाम अवश्य करा. नियमितपणे दिवसातून दोन–तीन वेळा हे व्यायाम केल्यास डोळ्यांचं आरोग्य उत्तम राहील. सतत संगणकावर काम करणाऱ्यांनी तसंच जास्त वाचन, अभ्यास करणाऱ्या लोकांनी तर डोळ्यांवरील ताण कमी करण्यासाठी हे व्यायाम अवश्य करायला हवेत.

सर्वप्रथम तोंडामध्ये पाणी घ्या. ते तसेच ठेऊन गाल फुगलेल्या अवस्थेत असताना बादलीभर पाण्यात तोंड बुडवा आणि पाण्यात डोळे उघडा. पाण्यात एकदा उजव्या बाजूने गोलाकार तर एकदा डाव्या बाजूने गोलाकार अशापद्धतीने डोळे फिरवा. तसंच एकदा डावीकडे आणि एकदा उजवीकडे असेही फिरवा. त्यानंतर डोळे एकदा वर तर एकदा खाली असेही फिरवा. डोळ्यांसाठी असणारा हा उत्तम व्यायाम आहे. दिवसांतून तीन ते चार वेळा हा व्यायाम अवश्य करा. हा व्यायाम करण्यासाठी बाजारात मिळणारे डोळ्यांचे कपही तुम्ही वापरु शकता. ऑफिस वा बाहेर इतर ठिकाणी असताना ते सोयीचे ठरतात.

डोळ्यांचं आरोग्य जपण्यासाठी आणखी एक व्यायाम करता येईल. तो म्हणजे रोज रात्री स्वच्छ दात घासून तोंड धुऊन झोपा आणि सकाळी उठल्यानंतर तोंडातील लाळ डोळ्यांमध्ये घाला. या उपायानं डोळ्याचा नंबर कमी जाण्यास मदत होते तसंच डोळ्यांभोवती काळी वर्तुळं असतील तर त्यावरही ही लाळ लावणं लाभकारक ठरतं. वर्तुळे नाहीशी होतात.

स्मार्ट लूक

कुर्ता–पायजमा हा समारंभासाठी सुयोग्य पेहराव आहे. पण तो रुबाबदारपणे कसा कॅरी करता येईल यासंबंधीच्या टिप्स तुम्ही सैफअली खानकडून घेऊ शकता. मध्यंतरी एअरपोर्टवर तो या लूकमध्ये दिसला होता. त्याच्याकडून आपण बऱ्याच टिप्स घेऊ शकतो.

✻ कुर्ता फिटिंगचा असायला हवा. पण फिटिंग करून घेतलं तरी ते खूप घट्ट असू नये. कुर्त्यामध्ये तुम्हाला आरामशीर वाटायला हवं. अर्थात तो फार ढिलाही असू नये.

✻ कुर्त्यासोबत चुडीदार असते. पण एखादेवेळी पायजमा घालून बघा. त्या बरोबरची चुडीदार शेरवानी किंवा अन्य पर्यायांसाठी ठेवा. **क्रमश:**

'राष्ट्र संचार' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) हे दैनिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व प्रकाशक अनिरुद्ध बाळासाहेब बडवे यांनी राणे प्रकाशन प्रा. लि. स.नं. १२९, हिस्सा नं. ११/२ व ३, वारजे फ्लायओव्हर जवळ, वारजे, पुणे - ४११०५८ येथे छापून ऑफिस २-ए, गोविंद चेंबर्स, नळस्टॉप, कर्वेरोड, एरंडवणा, पुणे - ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक - अनिरुद्ध बाळासाहेब बडवे.

'Rashtra Sanchar' (RNI Reg. No. MAHMAR/2023/89220) Daily News Paper Owned, Printed & Published by Anirudha Balasaheb Badave, Printed at Rane Prakashan Pvt. Ltd., S. No. 129, Hissa No. 11/2&3, Near Warje Flyover, Warje, Pune - 411058, Published at office 2-A, Govind Chambers, Nalstop, Karve Road, Erandawana, Pune-411004. Editor - Anirudha Balasaheb Badave
Telephone : 9697989088 Email : info@rashtrasanchar.com Website: www.rashtrasanchar.com

पान १ वरून

## हाफिज सईदचा हात

पहलगाम हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांना पाकिस्तानची सेना आणि त्याची गुप्तचर संस्था इंटर-सर्विसेज इंटेलिजेंस (आयएसआय) यांनीही वेळोवेळी मदत केली होती.

हल्ला करणाऱ्या दहशतवाद्यांच्या गटामध्ये भारताबाहेरील दहशतवादी असून त्यांना कश्मीरमधील स्लीपर सेल आणि स्थानिकांनीही मदत केल्याचा संशय आहे. दहशतवाद्यांना आश्रय देणे आणि त्यांच्याबद्दल कोणाला कळू नये याची खात्री बाळगणे हे त्यांचे मुख्य काम असते. पहलगाम हल्ल्यात दहशतवाद्यांनी बैसरन खोऱ्यात तीन वेगवेगळ्या ठिकाणी हल्ला केला. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, दहशवाद्यांनी एकाच वेळी पाच जणांची हत्या केली, दोघांना खुल्या मैदानात गोळ्या घालण्यात आल्या तर इतरांना बैसरनच्या कुंपणाजवळ गोळ्या घालण्यात आल्या. हे लोकं कुंपण ओलांडून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना त्यांना मारण्यात आले. जे कुंपण ओलांडून पळाले त्यांचा जीव वाचला. हल्ल्यातून वाचलेल्या लोकांनी सांगितले की, हल्लेखोरांनी गोळीबार सुरू करण्यापूर्वी त्यांच्याशी बातचीत केली होती.

जम्मू-काश्मीर पोलिसांनी गुरुवारी पहलगाम हल्ल्याशी संबंधित तीन संशयितांची रेखाचित्रे जारी केली आहेत. यापैकी दोन पाकिस्तानी नागरिक आहेत. हाशिम मूसा उर्फ सुलेमान, अली भाई उर्फ तल्हा आणि अब्दुल हुसैन ठोकर अशी या दहशतवाद्यांची नावे आहेत. ठोकर हा काश्मीरमधील अनंतनागचा रहिवासी आहे. पोलिसांनी या दहशतवाद्यांची माहिती देणाऱ्याला आणि त्यांना पकडून देण्यासाठी मदत करणाऱ्यांना २० लाख रुपयांचे रोख बक्षीस जाहीर केले आहे.

## पिरंगुट येथील पूल मे अखेर होणार....

उभारणीसाठीची कामे सुरू केली आहेत. त्यामुळे येत्या १५ ते २० दिवसांत म्हणजे सुमारे दहा मे पर्यंत या पुलाचा स्लॅब होणार आहे. त्यानंतर सुमारे तीन आठवड्यानंतर मे अखेर या पुलाचे काम पूर्ण होईल. त्यामुळे जूनच्या पहिल्या आठवड्यात हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल. नवीन आराखड्यानुसार, पुलाची उंची दीड मीटर, रुंदी सहा मीटर, तर लांबी १३ मीटरने वाढणार आहे. त्यामुळे नवीन पुलाची उंची ११.५ मीटर, रुंदी २१.८०० मीटर, तर लांबी ३९ मीटर होणार आहे.

दरम्यान, पुलाच्या पूर्वेकडील रस्त्यात आलेले वीज खांब बाजूला बसविण्यात येणार आहेत. बीएमसी कंपनीचे अभियंता सिद्धार्थ साठे यांनी सांगितले की, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे अधीक्षक अभियंता राहुल वसेकर आणि कार्यकारी अभियंता शैलजा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली १० मे पर्यंत स्लॅबचे काम पूर्ण होईल. त्यानंतर तीन आठवडे झाले की पुलावरील रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात येईल.

## अवैध बांगलादेशी प्रकरणी कारवाई

असल्याचा आरोप माजी खासदार आणि भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला होता. यानंतर भारत देशातून बांगलादेशी घुसखोरांना तातडीने हाकलून काढा, अशी मागणी कोल्हापुरातील हिंदुत्ववादी संघटनांनी केली आहे.

बांगलादेशी बोगस जन्म दाखला प्रकरणात अटक करण्यात आलेले तव्वाब शेख यांच्या राहत्या घरी अंमलबजावणी संचालनालयाने शुक्रवारी छापेमारी केली. ईडीने मालेगावात एकाच वेळी ९ वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. यावेळी बनावट जन्म आणि मृत्यू दाखले बनवण्याच्या प्रकरणात ईडीने मनी लॉँड्रिंगचा गुन्हा दाखल केला. महाराष्ट्र पोलिसांनी या संदर्भात दाखल केलेल्या १६ वेगवेगळ्या तक्रारींच्या आधारावर ईडीने ही कारवाई केली आहे.

## देशातील २३ राज्यांना अतिवृष्टी...

पाऊस पडू शकतो असा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मिझोरम, नागालँड, या राज्यांमध्ये पुढील सात दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. तसेच या राज्यांमध्ये वादळे देखील होणार असून, या काळात ताशी ६० ते ७० किमी प्रति तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे, या पार्श्वभूमीवर आयएमडीकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. दक्षिण भारताना देखील पाऊस झोडपून काढणार आहे. दक्षिण भारतामध्ये तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आध्र प्रदेश आणि पाँडेचेरी या राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर

पाहता येईल. विद्यार्थ्यांना गुणपडताळणी करुन घ्यावयाची असल्यास संबंधित शाळांच्या लॉगीनमध्ये दि. २५/०४/२०२५ ते ०४/०५/२०२५ या कालावधीत ऑनलाईन अर्ज उपलब्ध करुन देण्यात येत आहे. गुणांच्या पडताळणीसाठी प्रत्येक पेपरकरीता रु. ५०/- याप्रमाणे शुल्काची रक्कम ऑनलाईन पेमेंटद्वारे भरणे आवश्यक आहे.

## सरकारने अधिक गांभीर्याने घेतले ...

पहलगाम हे त्यातल्या त्यात अधिक सुरक्षित आहे. दोन-तीन महिन्यापूर्वीच मी तिथे जाऊन आलो. सातत्याने आपले लोक तिथे



जातात. दहशतवाद्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केले, हा जो निष्कर्ष काढला जातो, तो अधिक सावधान करणारा आहे. आपण काळजी घ्यायला पाहिजे, असे त्यांनी म्हटले. तर पर्यटकांना हिंदू आहेत म्हणून गोळ्या घातल्या यामध्ये काय सत्य आहे? याबाबत मला माहिती नाही. पण तिथं जी लोक होते, त्यातील स्त्रियांना सोडले असे दिसते आहे. मी एका भगिनीच्या घरी गेलो होतो, त्यावेळी त्यांनी सांगितले आम्हा महिलांना हात लावले नाही. त्यांनी फक्त आमच्या पुरुषांना हात लावला, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

## वक्फ विधेयकाला स्थगिती देता येणार नाही

केले आहे, असे केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले.

वक्फ कायद्याच्या वैधतेला आव्हान देणारे याचिकाकर्त्यांचे प्रयत्न न्यायालयीन पुनरावलोकनाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात आहेत. जेव्हा वैधता गृहीत धरली जाते, तेव्हा त्याचे दुष्परिणाम जाणून न घेता सरसकट बंदी घालणे अन्यायकारक आहे, असे केंद्राने सर्वोच्च न्यायालयात सांगितले. वक्फ (दुरुस्ती) कायदा, २०२५ हा कायदेशीर अधिकाराचा वैध, योग्य वापर आहे. कलम ३२ अन्वये वैधानिक क्षमता आणि मूलभूत अधिकारांचे उल्लंघन या आधारावर सर्वोच्च न्यायालय कायद्याचा आढावा घेऊ शकते, असे केंद्राने म्हटले आहे.

# मेधा पाटकर यांना अटक

## मानहानीच्या खटल्यात त्यांना दोषी ठरल्यानंतर कारवाई

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** नर्मदा बचाव आंदोलनाच्या नेत्या आणि सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना निजामुद्दीन याठिकाणावरून अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने मेधा पाटकर यांच्याविरुद्ध अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते. आज दुपारी त्यांना साकेत कोर्टात हजर केले जाणार आहे.

२००१ मध्ये दिल्लीचे उपराज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी त्यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या फौजदारी मानहानीच्या खटल्यात त्यांना दोषी ठरवल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. साकेत न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश विशाल सिंग यांनी मेधा पाटकर न्यायालयात हजर नव्हत्या आणि त्यांनी जाणूनबुजून शिक्षेशी संबंधित आदेशाचे पालन केले नाही, असे म्हटले होते.

न्यायाधीशांनी सांगितले की पाटकर यांचा हेतू स्पष्टपणे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करणे आणि सुनावणी टाळणे हा होता. शिक्षेवर स्थगिती आदेश नसल्याने, पाटकर यांना हजर करण्यासाठी दबाव आणणे आता



आवश्यक झाले आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायालयाने आदेशात म्हटले आहे की, दोषी मेधा पाटकर यांच्याविरुद्ध पुढील तारखेसाठी दिल्ली पोलिस आयुक्त कार्यालयामार्फत अजामीनपात्र वॉरंट जारी करावे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ३ मे रोजी होईल. पुढील सुनावणीत पाटकर यांनी शिक्षेच्या आदेशाचे पालन केले नाही तर न्यायालयाला आधी दिलेल्या 'सौम्य शिक्षे'चा पुनर्विचार करावा लागेल आणि शिक्षा बदलता येईल, असेही न्यायालयाने म्हटले आहे.

मेधा पाटकर यांनी गेल्या वर्षी मॅजिस्ट्रेट कोर्टाने दिलेल्या शिक्षेविरुद्ध अपील केले होते. अपीलात त्याला जामीन मंजूर करण्यात आला आणि त्याची पाच महिने तुरुंगवास आणि १० लाख रुपये दंडाची शिक्षा स्थगित करण्यात आली. भारतीय दंड संहितेच्या कलम ५०० (गुन्हेगारी मानहानी) अंतर्गत हा खटला दाखल करण्यात आला.

विनय कुमार सक्सेना यांनी २००१ मध्ये अहमदाबादस्थित एनजीओ 'नॅशनल कौन्सिल फॉर सिव्हिल लिबर्टीज'चे प्रमुख असताना हा खटला दाखल केला होता. सक्सेना म्हणाले होते की, मेधा पाटकर यांनी २५ नोव्हेंबर २००० रोजी जारी केलेल्या एका प्रेस नोटमध्ये त्यांना भित्रा आणि देशद्रोही म्हटले होते आणि त्यांच्यावर हवाला व्यवहारात सहभागी असल्याचा आरोप केला होता.

या प्रकरणात, न्यायालयाने पाटकर यांना दोषी ठरवले होते आणि म्हटले होते की त्यांची विधाने जाणूनबुजून, दुर्भावनापूर्ण आणि सक्सेनाच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्याच्या उद्देशाने होती. पाटकर यांच्या वतीने वकील अभिमन्यू श्रेष्ठ यांनी बाजू मांडली, तर सक्सेनाच्या वतीने वकील गजिंदर कुमार, किरण जय, चंद्रशेखर आणि सौम्या आर्य यांनी बाजू मांडली.

# एकतेची आवश्यकता

## सरसंघचालक मोहन भागवत यांचे मत

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** ही लढाई धर्म आणि अधर्म यांच्यातील आहे. आपला देश किती शक्तिशाली आहे हे दाखवून देण्याची आता वेळ आली आहे. आपल्या साऱ्यांच्या हृदयात वेदना आहेत. सारे हिंदुस्थानी पेटून उठले आहेत. वाईटाचा अंत करण्यासाठी आपल्याला ताकद दाखवावी लागेल. असे हल्ले रोखण्यासाठी समाजात एकता आवश्यक असल्याचे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी व्यक्त केले.

जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याबाबत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांचे मोठे विधान समोर आले आहे. या घटनेचा निषेध करताना भागवत म्हणाले की, दहशतवाद्यांनी लोकांना त्यांच्या धर्माबद्दल विचारल्यानंतर त्यांची हत्या केली. या गोष्टीला त्यांनी कडाडून विरोध केला. भागवत यांनी मुंबईतील एका कार्यक्रमात बोलतेवेळी, काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी



हल्ल्यावर प्रतिक्रिया देताना त्यांनी या घटनेला धर्म आणि अधर्म यांच्यातील लढाई म्हटले.

भागवत यांनी त्यांच्या भाषणात एक उदाहरण दिले की, रावण हा भगवान शिवाचा भक्त होता पण त्याच्याभोवती अशा काही गोष्टी होत्या ज्या स्पष्ट करून सोडवता येत नव्हत्या. म्हणूनच भगवान रामांना त्याला मारावे लागले. मोहन भागवत पुढे म्हणाले की, असे काही लोक आहेत, ज्यांना समजावून सांगून काहीही प्रश्न सुटणार नाही. त्यांना धडा शिकवावाच लागेल, मला आशा आहे की हे लवकरच साध्य होईल.

संघप्रमुख म्हणाले की जर आपण एकजूट झालो तर कोणीही आपल्याकडे वाईट नजरेने पाहण्याची हिंमत करणार नाही आणि जर कोणी असे केले तर त्याचे डोळे फोडले जातील. ते म्हणाले की, कोणाचाही द्वेष करणे किंवा शत्रुत्व करणे आपल्या स्वभावात नाही, परंतु शांतपणे नुकसान सहन करणे देखील आपल्या स्वभावात नाही. खऱ्या अर्थाने अहिंसक व्यक्तीने बलवान असले पाहिजे. जर ताकद नसेल तर पर्याय नाही, पण जेव्हा ताकद असेल तर ती गरज पडेल तेव्हा दिसली पाहिजे.

# १११ पाकिस्तानी नागरिकांचे सध्या पुण्यामध्ये वास्तव्य

मुस्लिम, सिंधी आणि हिंदू समाजाच्या व्यक्तींचा समावेश आहे.

विशेष शाखेचे पोलीस उपायुक्त मिलिंद मोहिते म्हणाले, 'केंद्र सरकारच्या आदेशानंतर शहरातील सर्व पाकिस्तानी नागरिकांची माहिती संकलित करण्यात येत असून, त्यांच्याकडे असलेल्या व्हिसा आणि इतर कागदपत्रांची पडताळणी केली जात आहे. केंद्र सरकारच्या घोषणेनंतर आतापर्यंत तीन पाकिस्तानी नागरिकांनी पुणे पोलिसांच्या परकीय नागरिक नोंदणी कार्यालयाकडून (एफआरओ) 'एक्झिट' प्रमाणपत्र घेतले असून, लवकरच ते भारत सोडून जाणार आहेत. उर्वरित नागरिकांच्याही परतीच्या प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे.' दरम्यान, कोणत्याही अनुचित प्रकाराला आळा बसावा आणि शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून, परकीय नागरिकांशी संबंधित सर्व घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.



पाकिस्तानी नागरिकांनी ४८ तासांत देश सोडून जावे, असा आदेश केंद्र सरकारने दिला आहे. मात्र, अद्याप स्थानिक पोलिसांना त्या अनुषंगाने कोणताही आदेश प्राप्त झालेला नाही. आदेश प्राप्त होताच त्यानुसार तातडीने कार्यवाही करण्यात येईल."
**— रंजनकुमार शर्मा,** पोलीस सहआयुक्त

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.८५/२०२५/२१६**

**अर्जदार**
वेला इनक्लेव्ह सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्वे नं. २८३/१, पोरवाल रोड, कमलाई डेअरीजवळ, कंदनगर, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे - ४११०४७ तर्फे, अध्यक्ष: श्री. स्वप्निल विलास नारखेडे, सचिव : सौ. शिखा शॉ
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जागा मालक / जाब देणार नं. १
१. मे. नटराज डेव्हलपर्स, तर्फे भागीदार
अ. श्री. काळुराम दुर्गाजी चौधरी, ब. श्री. जगदीश सुजाजी परिहार
ऑफिस पत्ता: पी नं.२३, गीता कॉम्प्लेक्स कस्तुर्बा को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. विश्रांतवाडी, पुणे - ४११०१५ क. श्री. पूनाराम जीताजी चौधरी, ड. सौ. चंदा पुनाराम चौधरी, इ. श्री. हरीष पूनाराम चौधरी
पत्ता: फ्लॅट नं.१०४, जय गणेश प्लाझा, धानोरी लोहगाव रोड, पुणे - ४११०३७
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये वेला इनक्लेव्ह सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. २८३/१, पोरवाल रोड, कमलाई डेअरीजवळ, कंदनगर, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे- ४११०४७ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा **अर्ज क्र.८५/२०२५** दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ अ.क. गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ अ.क. यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः **सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५** रोजी दु.३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ अ.क. यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.८८/२०२५ |२११**

**अर्जदार**
ओकवुडस् सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्वे नं. २०९, हिस्सा नं.२, विमाननगर, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे - ४११०१४
तर्फे, अध्यक्ष : श्री. रोहन आनंद राणे, सचिव : श्री. मोहित अजय नाफडे
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. ए. व्ही. भट डेव्हलपर्स, नोंदणीकृत भागीदारी संस्था
तर्फे भागीदार,अ. श्री. केदार अशोक भट, ब. श्री. तुषार प्रमोद नागरकर, रा. १३४८, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० जागा मालक / जाब देणार नं. २
२. महावीर पार्क को. ऑप. हौ. सोसायटी लि.
ऑफिस पत्ता: सर्वे नं.२०९, हिस्सा नं.२, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे - ४११०१४
तर्फे चेअरमन, अ. श्री. महावीर बी . नाहर, रा. रामवाडी, नगर रोड, पुणे - ४११०१४ तर्फे सेक्रेटरी, ब. श्री. दिलीप बबन परदेशी, रा. सुखसागर नगर, कात्रज, पुणे - ४११०४६
३. सौ. किर्ती मानिकचंद दुगड, रा. २७, वसंतबाग सोसायटी, बिबवेवाडी, पुणे - ४११०३७
२/-
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये ओकवुडस् सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. २०९, हिस्सा नं. २, विमाननगर, लोहगाव, ता. हवेली, जि. पुणे - ४११०१४ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा **अर्ज क्र.०५/२०२५** दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. समृध्दी कोठारी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः **सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५** रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र.८३/२०२५ |२१२**

**अर्जदार**
शाम रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ८३/२०२५ / २११
पत्ता: बुल्क लॅण्ड नं.2, सेक्टर नं. 29, रावेत, ता. हवेली, पुणे - ४१२१०१
तर्फे, अध्यक्ष : श्री. मिलींद पडवळ, सचिव : श्री. मंदार चंद्रकांत निलंगे
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१ . मे. श्याम डेव्हलपर्स नोंदणीकृत भागीदारी संस्था
तर्फे भागीदार, श्री. घनश्याम गोवर्धनभाई गजेरा
पत्ता: प्लॉट नं. २७८ व २८८, सेक्टर २७ए, निगडी प्राधिकरण, पुणे - ४११०४४
जागा मालक / जाब देणार नं. २
२. पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण निगडी, पुणे-४४
तर्फे मुख्य कार्यकारी अधिकारी (पुर्वीचे)
२ अ. पिंपरी चिंचवड महानगरपालिका (सध्याचे)
भाडेपट्टाधारक / जाब देणार नं. ३
३. श्री. वसंत महादु जाधव, ४. सौ. सखुबाई उर्फ ताराबाई विठ्ठल बनसोडे (सरतापे), ५. सौ. कमल दादु डोळस पत्ता: प्लॉट नं. २७८ व २८८, सेक्टर २७ए, निगडी प्राधिकरण, पुणे - ४११०४४
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये शाम रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित बुल्क लॅण्ड नं.२, सेक्टर नं. २९, रावेत, ता. हवेली, पुणे - ४१२१०१ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा **अर्ज क्र.८३ / २०२५** दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी **दिनांक २७/०३/२०२५** रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ५ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ५ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः **सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५** रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ५ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २८/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ४६९/२०२४/२२३**

**अर्जदार**
श्री मणिबंध सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्व्हे नं. २५/६/३/४, हिंगणे खुर्द, ता. हवेली, जि. पुणे तर्फे
अध्यक्ष, सौ. निर्मला संतोष पाठक, सचिव, श्री. मिलिंद दत्तात्रय कुलकर्णी
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
१. मे. श्री. मणिबंध कन्स्ट्रक्शन, भागीदारी संस्था तर्फे भागीदार
अ. श्री. रामचंद्र सोपानराव कार्ले, पत्ता : ७०, सिंहगड अपार्टमेंट, वडगाव बु. ता. हवेली, जि. पुणे ४१ ब. श्री. श्रीरंग एकनाथराव चव्हाण, क. श्री. राणोजी बबनराव पोकळे, ड. श्री. राजेंद्र गोपीचंद पोकळे, इ. श्री. जयवंत विठोबा मानकर, अनु.क्र. ब ते ई रा. स.नं. २५/६/३/४, हिंगणे खुर्द, ता. हवेली, जि. पुणे ५१.
२. जागामालक
अ. श्री. रामचंद्र सोपानराव कार्ले, पत्ता : ७०, सिंहगड अपार्टमेंट, वडगाव बु. ता. हवेली, जि. पुणे ४१ ब. श्री. श्रीरंग एकनाथराव चव्हाण, क. श्री. राणोजी बबनराव पोकळे, ड. श्री. राजेंद्र गोपीचंद पोकळे, इ. श्री. जयवंत विठोबा मानकर, अनु.क्र. ब ते ई रा. स.नं. २५/६/३/४, हिंगणे खुर्द, ता. हवेली, जि. पुणे ५१. ३. अनुजा सहकारी गृहरचना संस्था मर्या. पत्ता: सर्व्हे नं. २५/६/३/४, हिंगणे खुर्द, ता. हवेली, जि. पुणे
२/-
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या श्री मणिबंध सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: सर्व्हे नं. २५/६/३/४, हिंगणे खुर्द, ता. हवेली, जि. पुणे या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.४६९/२०२४ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १६/०४/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ३ गैरहजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ ते ३ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ०६/०५/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ३ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. २४/२०२५ | २१७**

**अर्जदार**
दि पार्क रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: स.नं. १४, हि. नं. १६+१७+१८+२०+२१+२२, प्लॉट नं. १४ व १५, गणेशनगर, धायरी
ता. हवेली जि. पुणे-४११०४१.
तर्फे, अध्यक्ष : श्री. राजेश भगवान उभे, सचिवः श्री चांगदेव सगाजी भवर
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / जागा मालक / जाब देणार नं. १
1. मे. पद्मनाभ डेव्हलपर्स, तर्फे भागीदार.
अ. श्री. किशोर मनोहर बेट्टीगिरी, ब. श्री. सुरेंद्र बाबुराव लायगुडे
पत्ता- मु. पो. धायरी, ता. हवेली जि. पुणे-४११०४१.
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये दि पार्क रेसिडेन्सी सहकारी गृहरचना संस्था मर्यादित स.नं. 14, हि. नं. १६+१७+१८+२०+२१+२२, प्लॉट नं. १४ व १५, गणेशनगर, धायरी ता. हवेली जि. पुणे-४११०४१. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा **अर्ज क्र. २४/२०२५** दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी **दिनांक १८/०३/२०२५** रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड.अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ अ.ब. गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ अ.ब. यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः **सुनावणी दिनांक २९/०४/२०२५** रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ अ.ब. यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ०५/२०२५/२२१**

**अर्जदार**
सनशाईन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्वे नं. ७४, हिस्सा नं. १ अ/२/२, पुरंदर कॉलनी, आदर्शनगर,
किवळे, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१
तर्फे, अध्यक्ष : श्री. विवेक श्रीधर पवार, खजिनदार: श्री. संदिप ज्योतिबा पाटील
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
मे. श्रीराम बिल्डर्स अँन्ड डेव्हलपर्स नोंदणीकृत भागीदारी संस्था,
तर्फे भागीदार, अ. श्री. संपत मारूती दांगट, ब. श्री. संदिप काशिनाथ पाटिल
ऑफिस पत्ता: १६/११, फ्लॅट नं.८, दर्पण ए, छत्रपती बँक जवळ, विशाल नगर, जगताप डेअरी, पिंपळे निलख, पुणे - ४११०२७.
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये सनशाईन सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. ७४, हिस्सा नं. १ अ/२/२, पुरंदर कॉलनी, आदर्शनगर, किवळे, ता. हवेली, जि. पुणे - ४१२१०१ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा **अर्ज क्र. ०५/२०२५** दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक ०८/०४/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ (अ.) (ब) गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ (अ.) (ब) यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च **सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५** रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र. १ (अ.) (ब) यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक२८/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्र. ७८/२०२५/२२२**

**अर्जदार**
गायत्री मंत्र सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: गट नं. ९९१, चिखली, ता. हवेली जि. पुणे - ४११०६२.
तर्फे, अध्यक्ष : श्री. तेजेश अशोक सुतार,
सचिव : श्री. संजय शांताराम सिसोदे, खजिनदार: श्री. प्रशांत विश्वनाथ हराळ
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
विकसक / प्रवर्तक/ जागा मालक / जाब देणार नं. १
१. मे. आयडिअल कन्स्ट्रक्शन, नोंदणीकृत भागीदारी संस्था,
तर्फे भागीदार, अ. श्री. रविंद्रसिंग भुपेंद्रसिंग गुलेर, ब. सविंदरसिंग भुपेंद्रसिंग गुलेर
ऑफिस पत्ता- शरण व्हिला, स.नं. ५७/१, वाल्हेकरवाडी, स्पाईन रोड, रेल विहार जवळ, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे - ४११०३३.
२/-
उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या गायत्री मंत्र सहकारी गृहरचना संस्था मर्यादित पत्ता: गट नं. 991, चिखली, ता. हवेली जि. पुणे - 411062. या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा अर्ज क्र.७८/२०२५ दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक १५/०४/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१अ.ब. गैरहजर. गैरअर्जदार/ जमिन मालक क्र. १ अ.ब. यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्चः सुनावणी दिनांक ०६/०५/२०२५ रोजी दु. ३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ अ.ब. यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदीप्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.

---

### महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत
( त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्याची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत )
अधिनियम १९६३ याच्या कलम ११(३) अन्वये नोटीस.
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, साखर संकुल, तळमजला, शिवाजीनगर, पुणे ४११००५

**जाहीर नोटीस**

**मानीव अभिहस्तांतरण अर्ज क्रमांक ८०/२०२५/२२०**

**अर्जदार**
सुचंद्र कॉर्नर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित
पत्ता: सर्वे नं. ६८/१०अ, सिटीएस नं. ८१२/९, बी. टी. कवडे रोड, घोरपडी,
ता. हवेली, जि. पुणे - ४११००१
तर्फे, अध्यक्षः श्री. गोपालकृष्ण नायर, सचिव : श्री. वरुण त्रिपाठी
**विरुध्द**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
**गैरअर्जदार / जमिनमालक**
प्रवर्तक / जाब देणार नं. १
१. मे. श्रीदत्त डेव्हलपर्स, तर्फे भागीदार, श्री. सुदेश चंद्रकांत कवडे
रा. सर्वे नं. ५२, बी.टी. कवडे रोड, घोरपडी, ता. हवेली, जि. पुणे - ४११००१
अनु क्र. २ ते ७ तर्फे कु. मु. म्हणुन जाब देणार नं. १
जागा मालक / जाब देणार नं. 2
२. श्री. ज्ञानोबा सोनबा कवडे, ३. श्री. चंद्रकांत सोनबा कवडे, ४. श्रीमती चंद्रभागा दत्तोबा चिंचवडे
५. श्री. सुदेश चंद्रकांत कवडे, ६. श्री. महेश चंद्रकांत कवडे, ७. वर्षा चंद्रकांत कवडे
सर्व राः सर्वे नं.५२, बी.टी. कवडे रोड, घोरपडी, ता. हवेली, जि. पुणे - ४११००१
२/- उपरोक्त अर्जदार यांनी वरील उल्लेखिलेल्या कायद्यान्वये सुचंद्र कॉर्नर सहकारी गृहरचना संस्था मर्यादित सर्वे नं. ६८/१०अ, सिटीएस नं. ८१२/९, बी.टी. कवडे रोड, घोरपडी, ता. हवेली, जि. पुणे- ४११००१ या संस्थेचे मानीव अभिहस्तांतरण करणेकामीचा **अर्ज क्र.८०/२०२५** दाखल आहे. सदर अर्जाची सुनावणी दिनांक २७/०३/२०२५ रोजी घेण्यात आली. सदर दिवशी अर्जदार संस्थेच्या वतीने ॲड. अदिती कुलकर्णी हजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र. १ ते ०७ गैरहजर. गैरअर्जदार / जमिन मालक क्र.१ ते ०७ यांना जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सदर अर्जाची पुनश्च **सुनावणी दिनांक ३०/०४/२०२५** रोजी दु.३.०० वा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे यांचे कार्यालय, सुनावणीस गैरअर्जदार/जमिन मालक क्र.१ ते ०७ यांनी उपस्थित राहून म्हणणे मांडावे अन्यथा त्यांना काहीही म्हणावयाचे नाही असे समजून दाखल केलेल्या कागदपत्रा आधारे कायदयातील तरतुदी प्रमाणे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.
सदरची नोटीस आज दिनांक २४/०४/२०२५ रोजी माझे सही व कार्यालयीन मोहोर लावून निर्गमित केली असे.

शिक्का
सही
**( संजय राऊत )**
सक्षम प्राधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे.



## लैंगिक छळ केल्याप्रकरणी कंडक्टरला अटक

**मंगळुरू :** कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (केएसआरटीसी) एका कंत्राटी कंडक्टरला सार्वजनिक बसमध्ये एका महिला प्रवाशाचा "लैंगिक छळ" केल्याबद्दल अटक करण्यात आली आहे, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर व्यापक संताप व्यक्त करण्यात आला. प्रदीप कशप्पा नायकर (३५) असे या आरोपीचे नाव असून तो बागलकोट येथील आहे. त्याला गुरुवारी कोनाजे पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, नायकर एका महिला प्रवासी झोपेत असताना तिच्याशी गैरवर्तन केले.

# माजी इस्रो प्रमुख के. कस्तुरीरंगन यांचे निधन

## पंतप्रधान मोदींचा शोकसंदेश; देशाची झाली मोठी हानी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** इस्रोचे माजी प्रमुख के. कस्तुरीरंगन यांचे शुक्रवारी बेंगळुरू येथे निधन झाले, ते ८४ वर्षांचे होते. काही दिवसांपासून ते आजारी होते. अधिकाऱ्यांनी दिलेल्या वृत्तानुसार, ते त्या दिवशी सकाळी बेंगळुरू येथील त्यांच्या निवासस्थानी "स्वर्गासाठी निघून गेले". त्यांचे पार्थिव २७ एप्रिल रोजी रमण संशोधन संस्थेत (आरआरआय) अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात येणार होते. पंतप्रधान मोदी यांनी दुःख व्यक्त केले आणि सांगितले की, डॉ. कस्तुरीरंगन यांच्या निधनाने त्यांना "खूप दुःख" झाले आहे, ज्यांना त्यांनी "भारताच्या वैज्ञानिक आणि शैक्षणिक प्रवासातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व" म्हणून वर्णन केले.

मोदींनी कस्तुरीरंगन यांचे दूरदर्शी नेतृत्व आणि देशासाठी त्यांचे निस्वार्थी योगदान अधोरेखित केले, जे त्यांच्या मते नेहमीच लक्षात ठेवले जाईल. पंतप्रधानांनी कस्तुरीरंगन यांच्या इस्रोमधील परिश्रमपूर्वक सेवेमुळे भारताच्या अंतराळ कार्यक्रमाला नवीन उंचीवर नेले, जागतिक स्तरावर मान्यता मिळाली आणि त्यांच्या नेतृत्वात महत्त्वाकांक्षी उपग्रह प्रक्षेपण आणि नवोपक्रमावर लक्ष केंद्रित केले गेले हे नमूद केले.

राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) तयार करण्यात डॉ. कस्तुरीरंगन यांच्या भूमिकेबद्दल भारत त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो, तसेच भारतातील शिक्षण अधिक समग्र आणि भविष्यवादी बनवण्याच्या त्यांच्या प्रयत्नांवर भर देतो. त्यांनी कस्तुरीरंगन यांना अनेक तरुण शास्त्रज्ञ आणि संशोधकांसाठी एक उत्कृष्ट मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली आणि कस्तुरीरंगन यांचे कुटुंब, विद्यार्थी, शास्त्रज्ञ आणि असंख्य चाहत्यांपर्यंत त्यांचे विचार पोहोचवले आणि "ओम शांती" असे शब्द उच्चारले.

### के. कस्तुरीरंगन यांचे मोठे योगदान:

● कस्तुरीरंगन यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा मसुदा तयार करणाऱ्या समितीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले होते आणि त्यांनी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे कुलगुरू आणि कर्नाटक ज्ञान आयोगाचे अध्यक्ष अशी महत्त्वाची पदे भूषवली होती. ते २००३ ते २००९ पर्यंत राज्यसभेचे सदस्य होते आणि भारतीय नियोजन आयोगात काम केले. शिवाय, ते एप्रिल २००४ ते २००९ पर्यंत बंगळुरू येथील राष्ट्रीय प्रगत अभ्यास संस्थेचे संचालक होते. नऊ वर्षांहून अधिक काळ त्यांनी भारतीय अंतराळ संशोधन संघटना (इस्रो) आणि अंतराळ आयोगाचे नेतृत्व केले, तसेच भारत सरकारचे सचिव म्हणूनही काम पाहिले. एक कुशल खगोलभौतिकशास्त्रज्ञ म्हणून, कस्तुरीरंगन यांनी उच्च-ऊर्जा क्ष-किरण आणि गॅमा-किरण खगोलशास्त्र तसेच प्रकाशीय खगोलशास्त्रात विशेष प्राविण्य मिळवले, त्यांनी वैश्विक क्ष-किरण स्रोत, खगोलीय गामा किरण आणि खालच्या वातावरणात वैश्विक क्ष-किरणांच्या परिणामांच्या अभ्यासात व्यापक योगदान दिले.



## काश्मिरी विद्यार्थ्यांना धमक्या, सीपीआय(एम)ची चिंता

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर देशाच्या विविध भागांतून येणाऱ्या काश्मिरी विद्यार्थ्यांना धमक्या आणि छळाच्या वृत्तांबद्दल सीपीआय(एम) ने शुक्रवारी चिंता व्यक्त केली आणि म्हटले की यामुळे दहशतवाद्यांच्या अजेंडालाच मदत होईल. येथे जारी केलेल्या निवेदनात, भारतीय कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) ने म्हटले आहे की अधिकाऱ्यांनी अशा कारवायांमध्ये सहभागी असलेल्यांवर कारवाई केली पाहिजे आणि दहशतवादी हल्ल्याविरुद्ध देश एकजूट असल्याचेही म्हटले आहे. "पहलगाममधील भ्याड दहशतवादी हल्ल्याविरुद्ध संपूर्ण देश एकजुटीने बाहेर पडला असताना, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र इत्यादींसह विविध राज्यांमध्ये जम्मू आणि काश्मीरमधील विद्यार्थी आणि व्यापाऱ्यांना धमक्या आणि छळ केल्याच्या बातम्या येत आहेत," असे सीपीआय(एम) ने म्हटले आहे.

# सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना सुनावले

## स्वा. सावरकरांवरील वक्तव्याबद्दल फटकार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** महाराष्ट्रातील एका जाहीर सभेत स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना फटकारले. न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि मनमोहन यांच्या खंडपीठाने भारताच्या स्वातंत्र्यसैनिकांचा आदर करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आपल्या स्वातंत्र्यसैनिकांची थट्टा करू नका, असे खंडपीठाने स्पष्टपणे सांगितले. यंदा सावरकरांबद्दल आहे, पुढच्या वेळी कुणीतरी महात्मा गांधी यांना इंग्रजांचे नोकर म्हणेल. तुम्ही पुढच्या वेळी देखील या पद्धतीनं शेरेबाजी केली तरी न्यायालय त्याची स्वतःहून दखल घेईल, या शब्दात राहुल गांधींना खडे बोल सुनावले.

सुनावणीदरम्यान, गांधीजींच्या वतीने उपस्थित असलेले ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांना खंडपीठाने प्रश्न विचारला की महात्मा गांधींनीही ब्रिटिश अधिकाऱ्यांशी केलेल्या पत्रव्यवहारात "तुमचा विश्वासू सेवक" सारखे वाक्यांश वापरले होते याची त्यांना माहिती होती का, अशी विचारणा न्यायालयाने केली. महात्मा गांधींनी स्वतःला व्हाईसरॉयला 'तुमचा सेवक' असे संबोधले म्हणून त्यांना 'ब्रिटिशांचा सेवक' म्हणता येईल का? अशी विचारणा न्यायालयाने केली. न्यायमूर्ती दत्ता म्हणाले, "तुमच्या अशिलाला माहित आहे का की त्यांच्या आजी (इंदिरा गांधी) जेव्हा त्या पंतप्रधान होत्या तेव्हा त्यांनीही सावरकर यांचे कौतुक करणारे पत्र पाठवले होते?"

न्यायाधीश म्हणाले, स्वातंत्र्यसैनिकांबद्दल बेजबाबदार विधाने करू नका. आमच्या स्वातंत्र्यसैनिकांबद्दल आणखी काही बोलू नका. त्यांनी आम्हाला स्वातंत्र्य दिले आहे आणि आम्ही त्यांच्याशी असे वागतो? हा मार्ग नाही, असा इशारा खंडपीठाने दिला. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने उत्तर प्रदेश सरकार आणि तक्रारदार वकील नृपेंद्र पांडे यांना नोटीस बजावली आणि गांधींविरुद्ध ट्रायल कोर्टाचे समन्स रद्द करण्यास नकार देणाऱ्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती दिली. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये पत्रकार परिषदेत राहुल यांनी सावरकर हे ब्रिटीशांचे सेवक होते आणि त्यांनी ब्रिटीशांकडून पेन्शन घेतल्याचे कथितपणे म्हटले होते, त्याबद्दल न्यायालयाने राहुल यांना आरोपी म्हणून समन्स बजावले होते.

# भारतीय हवाई दलाचा सीमेवर आक्रमण सराव



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर, भारतीय हवाई दलाने मध्यवर्ती क्षेत्रातील मोठ्या भागात "अॅक्रायस अक्रामन" (आक्रमण) सराव केला आहे. राफेल लढाऊ विमानांच्या नेतृत्वाखालील आपल्या ताफ्यातील मुख्य लढाऊ विमानांच्या ताफ्यांचा समावेश आहे. भारतीय हवाई दल पश्चिम बंगालमधील अंबाला आणि हाशिमारा येथे राफेल विमानांचे दोन स्क्वॉड्रन चालवते.

गुरुवारी रात्रभर शक्ती आणि दक्षतेचे प्रदर्शन करताना, केवळ लढाऊ विमानेच नव्हे तर वाहतूक विमाने देखील सक्रिय होती. या विमानांनी सीमावर्ती भागांच्या अगदी जवळून उड्डाण केल्याचे वृत्त आहे. दरम्यान, एअरबोर्न वॉर्निंग अँड कंट्रोल सिस्टम सुसज्ज विमानांनी शत्रूच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले. त्याच वेळी, पाकिस्तानी हवाई दलाची विमाने देखील सीमेपलीकडे उड्डाण करताना दिसली.

पहलगाम हल्ल्यानंतर भारतीय सशस्त्र दलाच्या तिन्ही शाखा - लष्कर, नौदल आणि हवाई दल - आता हाय अलर्टवर आहेत. जम्मू आणि काश्मीरपासून अरबी समुद्रापर्यंत हालचाली वाढल्या आहेत. पाकिस्तानी सीमेवर, भारतीय राफेल विमानांनी हवाई गस्त घालण्यास सुरुवात केली आहे, तर सुरक्षा दल सीमावर्ती गावांमध्ये तपासणी तीव्र करत आहेत आणि ज्ञात दहशतवाद्यांचे अड्डे पद्धतशीरपणे नष्ट करत आहेत.

### लष्करप्रमुखांची श्रीनगरला भेट

● दरम्यान, भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी शुक्रवारी श्रीनगरला पोहोचले. त्यांच्यासोबत १५ कॉर्प्स कमांडर लेफ्टनंट जनरल प्रशांत श्रीवास्तव आणि व्हिक्टर फोर्स कमांडर होते.



## डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण

**मुंबई :** वाढत्या भू-राजकीय तणाव आणि देशांतर्गत बाजारपेठेतील नकारात्मक कल यांच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी रुपया त्याच्या सुरुवातीच्या वाढीपासून कमी झाला आणि अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ७ पैशांनी घसरून ८५.४० वर स्थिरावला. जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भू-राजकीय तणाव वाढल्याचे फॉरेक्स व्यापाऱ्यांनी सांगितले. शिवाय, देशांतर्गत शेअर बाजारातील मंद कल आणि सकारात्मक अमेरिकन डॉलर निर्देशांकामुळे गुंतवणूकदारांच्या भावना आणखी कमी झाल्या.

# उत्तर प्रदेशात हजारांहून अधिक पाकिस्तानी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**नवी दिल्ली :** जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या प्राणघातक दहशतवादी हल्ल्यानंतर, भारत सरकारने पाकिस्तानवर दहशतवादाला प्रोत्साहन देण्याचा आरोप करत त्यांच्याविरुद्ध कारवाई वाढवली आहे. कठोर उपाययोजनांच्या मालिकेचा भाग म्हणून, भारताने पाकिस्तानी नागरिकांना दिलेले सर्व व्हिसा रद्द केले आहेत आणि त्यांना तात्काळ देश सोडण्याचे आदेश दिले आहेत.


या आदेशाचा परिणाम म्हणून, मोठ्या संख्येने पाकिस्तानी नागरिक वाघा सीमेवरून मायदेशी परतू लागले आहेत. दरम्यान, उत्तर प्रदेश राज्यानेही राज्यात राहणाऱ्या पाकिस्तानी नागरिकांना ओळखून त्यांना परत पाठवण्याची तयारी सुरू केली आहे.

उत्तर प्रदेश पोलिसांमधील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मते, सध्या राज्यात १,००० ते १,२०० पाकिस्तानी नागरिक राहत आहेत. केंद्र सरकारचा अधिकृत हद्दपारीचा आदेश अद्याप मिळालेला नसला तरी, निर्देश जारी होताच त्यांना परत पाठवण्याची प्रक्रिया सुरू करण्याची तयारी सुरू आहे.

"राज्यातील पाकिस्तानी नागरिकांची ओळख पटवण्याची प्रक्रिया आधीच सुरू झाली आहे," असे एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने पुष्टी केली. "केंद्राकडून अंतिम सूचना मिळाल्यानंतर, आम्ही त्यांना परत पाठवण्यासाठी त्यानुसार कारवाई करू."

## उधमपूर येथे दहशतवाद्यांसाठी शोध मोहिम

**जम्मू :** तीन पळून गेलेल्या दहशतवाद्यांना शोधण्यासाठी सुरू असलेल्या कोम्बिंग ऑपरेशनचा



शुक्रवारी दुसरा दिवस सुरू झाला, सुरक्षा यंत्रणांनी बहुस्तरीय घेराबंदी मजबूत केली. उधमपूर जिल्ह्यातील जंगली भागात, जिथे दहशतवादी लपले असल्याचे मानले जात होते, तसेच किश्तवार, कठुआ, राजौरी आणि पूंछ येथील भागातही सैन्य शोध घेत आहे. "डुडू-बसंतगडमध्ये लष्कर, पोलिस आणि सीआरपीएफच्या विशेष दलांकडून शोध मोहीम सुरू आहे. फरार दहशतवाद्यांचा शोध सुरू आहे," असे एका सुरक्षा अधिकाऱ्याने सांगितले.

# पाकिस्तान शेअर बाजार कोसळला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**मुंबई :** काश्मीरच्या पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावामुळे पाकिस्तान स्टॉक एक्सचेंज किंवा पीएसएक्सची अधिकृत वेबसाइट सध्या बंद आहे. २६ जणांचा बळी घेणाऱ्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी भारत सरकारने अनेक निर्णय घेतल्यानंतर सत्राची सुरुवात लक्षणीयरीत्या कमी झाल्यानंतर वेबसाइट बंद झाली. वेबसाइट का बंद आहे आणि ती पुन्हा कधी सुरू होईल याबद्दल कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

अहवालांनुसार, कराची निर्देशांक व्यवहाराच्या पहिल्या पाच मिनिटांत २,५०० अंकांनी घसरून १,१४,७४०.२१ वर पोहोचला. दुपारी १२.३० वाजेपर्यंत, तो १,१४,७९६.३३ अंकांवर व्यवहार करत होता. गुरुवारी, पाकिस्तानी बाजारात मोठी घसरण नोंदवण्यात आली. दहशतवादी हल्ल्याशी सीमापार संबंध असल्याने भारताने बुधवारी पाकिस्तानसोबतचे राजनैतिक संबंध कमी केले आणि सिंधू पाणी करार स्थगित केला. तसेच अटारी पोस्ट तात्काळ बंद केला. प्रत्युत्तरादाखल, पाकिस्तानने द्विपक्षीय व्यापार आणि सिमला करारासह करार आणि भारतासोबतचे हवाई मार्ग बंद केला आहे.



**दार एस सलाम** टांझानियातील दार एस सलाम येथील न्यायालयाबाहेर, विरोधी पक्षनेते आणि माजी राष्ट्रपती पदाचे उमेदवार टुंडू लिसू यांच्या समर्थकांना ताब्यात घेण्यात आले. त्यावेळी त्यांची पोलिसांशी झटापट झाली.

## पवन कल्याण यांची हल्ल्यातील बळींना श्रद्धांजली

**अमरावती :** आंध्र प्रदेशचे उपमुख्यमंत्री पवन कल्याण हे नेल्लोर जिल्ह्यात एस मधुसूदन यांना श्रद्धांजली वाहतील, जे काश्मीरच्या फलागाममध्ये दहशतवाद्यांनी गोळ्या घालून ठार मारलेल्या २६ पर्यटकांपैकी एक होते, असे एका उच्च पोलिस अधिकाऱ्याने गुरुवारी सांगितले. "मधुसूदन यांचे पार्थिव सकाळी त्यांच्या मूळ गावी कवली येथे पोहोचले. कवली येथे अंत्यसंस्कार करण्याचे नियोजन आहे. आज उपमुख्यमंत्री त्यांच्या (मधुसूदन) पार्थिवाला आदरांजली वाहण्यासाठी येत आहेत," असे कांत यांनी सांगितले.

# पाकने ताश्कंद करार रद्द केला तर भारताचाच फायदा




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील संबंध पुन्हा एकदा ताणले गेले आहेत. पाकिस्तानविरोधात कठोर कारवाई करत भारताने सिंधू जल करार स्थगित केला असून सीमा सील करण्यासह इतर अनेक पावले उचलली आहेत. यामुळे शेजारच्या देशाला धक्का बसला आहे. पाकिस्तानने सिमला करार स्थगित करण्याचा निर्णय घेतला असून, ताश्कंद करार रद्द करण्याचा ही विचार सुरू आहे. १० जानेवारी १९६६ रोजी उझबेकिस्तानमध्ये ताश्कंद करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. १९६५ च्या युद्धानंतर सोव्हिएत युनियनच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षरी करण्यात आली होती, ज्यात भारताच्या वतीने तत्कालीन पंतप्रधान लालबहादूर शास्त्री आणि पाकिस्तानच्या वतीने तत्कालीन राष्ट्राध्यक्ष अयूब खान यांनी स्वाक्षरी केली होती.

या करारानुसार भारताने हाजी पीर खिंडीवरील आपला ताबा काढून घेतला होता आणि ५ ऑगस्ट १९६५ पूर्वीची स्थिती पूर्ववत करण्याचे मान्य केले होते. ६० वर्षांपूर्वीची भारताची ही मोठी चूक असल्याचे म्हटले जाते. आता पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत पाकिस्तानचा फास घट्ट करण्याचा प्रयत्न करत असताना हाजी पीर पासचे प्रकरण उत्स्फूर्तपणे समोर येत आहे कारण याच खिंड्यावरून पाकिस्तान आपल्या दहशतवाद्यांना भारतात पुरवतो. भारताने ६० वर्षांपूर्वी ही चूक केली नसती तर पाकिस्तान आज काश्मीरमध्ये दहशत पसरवत नसता.

हाजी पीर दर्रा हिमालय पर्वतरांगांच्या पीर पंजाल रांगेत आहे. जम्मू-काश्मीरमधील पुंछ आणि पाकव्याप्त काश्मीरमधील रावलकोट ला जोडणारा हा मार्ग आहे. २,६३७ मीटर (८,६५२ फूट) उंचीवर वसलेला हा सामरिक दर्रा संपूर्ण पाकव्याप्त काश्मीर खोऱ्याकडे तर दुर्लक्ष करतोच, शिवाय काश्मीर खोऱ्यात पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या घुसखोरीचा मुख्य मार्गही आहे. भारताने ६० वर्षांपूर्वी हा पास पाकिस्तानला दिला नसता, तर पाकिस्तानला दहशतवाद्यांना रसद पुरवता आली नसती. याशिवाय पुंछ ते उरी दरम्यानचे अंतरही २८२ किलोमीटरवरून केवळ ५६ किलोमीटरवर येणार आहे. १९६५ च्या भारत-पाक युद्धात भारतीय सैन्याने २८ ऑगस्ट १९६५ रोजी हा मोक्याचा मार्ग काबीज केला होता. १० जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद येथे भारत आणि पाकिस्तान यांच्यात करार झाला तेव्हा भारताने हाजी पीर दर्रेचा ताबा सोडला आणि करारानुसार ५ ऑगस्ट १९६५ च्या स्थितीत परत आला. अशा तऱ्हेने पुन्हा एकदा या सामरिक खिंडीवर पाकिस्तानने कब्जा केला.

# कोंढापुरीतील महिला सुखरूप परतल्या

## राजकीय नेते, जवान व पोलिसांचे मानले आभार

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर केलेल्या हल्ल्यात काही पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली असताना, महाराष्ट्रातील पर्यटकांचे कुटुंबीय चिंतेत होते. शिरुर तालुक्यातील कोंढापुरी येथील सहा महिला पर्यटक तेथे अडकलेल्या होत्या. प्रशासनाच्या सुविधेमुळे सर्व महिला पर्यटक सुखरूपपणे घरी आल्या असून, या महिलांनी त्यांना मदत करणारे राजकीय नेते, जम्मू काश्मीरचे जवान तसेच पोलिसांचे विशेष आभार मानले आहेत.

कोंढापुरी येथील भास्कर गायकवाड यांच्या पत्नी मनीषा गायकवाड, वहिनी तेजल गायकवाड, दिपाली गायकवाड, बहिण ललिता आदक तसेच मामाच्या मुली दिपाली लोखंडे व रुपाली तांबे या १५ एप्रिल रोजी पर्यटनसाठी काश्मीर येथे गेल्या होत्या. त्या २५ एप्रिल रोजी परतणार होत्या. तथापि, २२ एप्रिल रोजी पहलगाम मध्ये दहशतवाद्यांनी पर्यटकांवर दहशतवादी हल्ला केल्याने असुरक्षितेचे वातावरण निर्माण झाले. यावेळी गायकवाड कुटुंबीयांचा महिलांशी संपर्क होत नसल्याने सर्वजण भयभीत झाले. त्यानंतर महिलांचा घरी संपर्क झाल्यानंतर भास्कर गायकवाड यांनी भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष जयेश शिंदे यांना याबाबत माहिती देताच, त्यांनी केंदीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधत, याबाबत मदतीची मागणी केली. त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत सर्व पर्यटकांना स्वतंत्र विमानाने आणण्यात येणार असल्याचे सांगितले. गुरुवारी सायंकाळी सर्व महिला मुंबई विमानतळावर दाखल झाल्या. यासाठी मदत करणाऱ्या सर्व राजकीय व्यक्ती, जम्मू काश्मीर पोलीस, सैनिक व प्रशासनाचे आभार त्यांनी मानले.



## यात्रेतील वादातून इसमाला मारहाण

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी, ता. शिरुर येथील रामदास कुसाळे व अनिल चव्हाण यांचे यात्रेच्या दिवशी गावामध्ये किरकोळ वाद झाले होते, त्यांनतर रामदास हे गावामध्ये असताना अनिल यांनी त्यांना शिवीगाळ, दमदाटी करत यात्रेमध्ये झालेल्या वादातून हाताने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करत जखमी केले, तसेच मारहाण करताना जीवे मारण्याची धमकी दिली, याबाबत रामदास रघुनाथ कुसाळे (६० वर्षे, सध्या रा. मलठण फाटा शिक्रापूर ता. शिरुर) यांनी शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी अनिल संपत चव्हाण याच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## शिक्रापूर विद्युत वितरणकडून लकी ग्राहकांना मोबाईल



**शिक्रापूर :** शिक्रापूर येथील विद्युत वितरण विभाग कार्यालया अंतर्गत असलेल्या गावातील पाच लकी ग्राहकांना मोबाईल व डिजिटल घड्याळ देऊन सन्मानित करण्यात आले असल्याचे विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन यांनी सांगितले. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण विभागाने नियमित व वेळेवर ऑनलाइन लाईट बिल भरणाऱ्या ग्राहकांसाठी लकीड्रो ऑफर काढून त्यामध्ये नियमित आणि वेळेवर बिन भरणाऱ्या ग्राहकांमधून लकी ड्रो पद्धतीने काही ग्राहकांचे नंबर काढलेले असताना शिक्रापूर उपविभागातील ढोकसांगवी येथील चंद्रकांत मलगुंडे, वसुंधरा पाचंगे, सणसवाडी येथील विजय हरगुडे यांना मोबाईल तर शिक्रापूर येथील मोगल यादव व रांजणगाव गणपती येथील मनीषा बवने यांना डिजिटल घड्याळ हे बक्षीस पात्र झाले असून सर्व लकी ग्राहकांना विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन यांच्या हस्ते उपस्थित कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत मोबाईल व डिजिटल घड्याळ देऊन सन्मानित करण्यात आले.विद्युत वितरण विभागाचे उपकार्यकारी अभियंता नितीन महाजन यांनी सर्वांचे आभार मानले.

## प्रतिबिंब व्याख्यानमालेत गणेश शिंदे मांडणार विचार



**बारामती :** येथील एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडियाच्या वतीने शनिवारी सुप्रसिध्द व्याख्याते गणेश शिंदे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. प्रतिबिंब व्याख्यानमालेच्या माध्यमातून नामवंतांचे विचार बारामतीकरांना ऐकता यावेत असा फोरमच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांचा प्रयत्न असतो. विद्यानगरीतील गदिमा सभागृहात संध्याकाळी साडेसहा वाजता जीवन सुंदर आहे या विषयावर गणेश शिंदे बारामतीकरांशी संवाद साधणार आहेत. गेल्या काही दिवसांमध्ये मानसिक ताणतणावामुळे जीवन संपवून घेण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसत आहे. क्षुल्लक गोष्टींसाठीही लोक आत्महत्येचे विचार डोक्यात आणतात. जीवन सुंदर असून ते कशा पध्दतीने व्यतित केले पाहिजे, या बाबतचे मार्गदर्शन गणेश शिंदे करणार आहेत. हे व्याख्यान बारामतीकरांसाठी विनामूल्य खुले आहे.

## अभाविपतर्फे बारामती येथे जाहीर निषेध



**बारामती :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये पाकिस्तानी दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर क्रूरपणे हल्ला केला. या भ्याड आणि क्रूर हल्ल्यामध्ये २७ हून अधिक भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या पाकिस्तानी दहशतवाद्यांनी पर्यटकांचा धर्म विचारून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. तरी या घटनेचा तीव्र निषेध अभाविप बारामती शाखेच्या वतीने गुरुवारी भिगवण चौक बारामती येथे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला व दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्याची मागणी करण्यात आली. यावेळी पश्चिम महाराष्ट्र प्रदेश कार्यसमिती सदस्य अभाविप श्रेयश प्रभुणे ,शहरमंत्री ओंकार तावरे, शहर सहमंत्री स्वप्निल गावडे, शुभम आटोळे अध्यक्ष टीसी कॉलेज बारामती, साईराज सावळकर, प्रतीक रणनवरे, गीतांजली पाटील, राजनंदिनी पांढरमिसे, मोहन पेंदे, साहिल फरांदे,सोमनाथ भापकर, कारण नागवडे,दिग्विजय गायकवाड व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## पोलीस हवालदार गजानन खत्री निलंबित

**शिक्रापूर :** शिक्रापूर ता. शिरुर पोलीस स्टेशन येथे कर्तव्यावर असलेले पोलीस हवालदार गजानन नारायण खत्री हे कर्तव्यावर सतत गैरहजर राहुन त्यांच्याकडे सोपवलेल्या गुन्ह्यांचा तपास प्रलंबित ठेवत असल्याचा तसेच गैरवर्तन करत असल्याचा ठपका ठेवत पोलीस हवलदार गजानन खत्री यांचे पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी निलंबन केले असून त्याबाबतचे पत्र देखील दिले आहे. काही गुन्ह्यांचे तपास त्यांच्याकडे दिलेले असताना वेगवेगळे पंचवीस गुन्हे व तपास अद्याप प्रलंबित असल्याचे दिसले. पोलीस हवालदार गजानन खत्री यांच्यावर बेशिस्त, बेजबाबदार तसेच गैरवर्तन केल्याचे ग्राह्य ठरवत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी त्यांचे निलंबन केले.

# संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी विश्वस्तांचे निवडी जाहीर

## लोंढे कबीर महाराज, पाटील महाराज, ॲड. रोहिणी पवार नूतन विश्वस्त

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क



**आळंदी :** येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमेटी, आळंदी या विश्वस्त संस्थेच्या विश्वस्त मंडळातील ६ पैकी उर्वरित ३ विश्वस्त पदांचे निवडीसाठी ठराविक अर्जदारांच्या मुलाखती नंतर दोन आळंदीतील तर एक पुण्यातील असे तीन विश्वस्तांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या आहेत. यात वारकरी संप्रदायातील कीर्तनकार चैतन्य महाराज कबीर बुवा लोंढे, पुरुषोत्तम महाराज पाटील आळंदीकर आणि पुण्यातून ॲड. रोहीणी पवार या एकमेव पहिल्या महिला विश्वस्त यांचा समावेश आहे.

आळंदीतील कबीर मठाचे प्रमुख म्हणून कार्यरत चैतन्य महाराज कबीरबुवा लोंढे, अमृतनाथ स्वामी महाराज धमर्शाळेचे प्रमुख महंत पुरुषोत्तम महाराज पाटील आळंदीकर तसेच महीला विश्वस्त म्हणून पुण्यातील विधीतज्ञ रोहीणी पवार यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. नवनियुक्त विश्वस्तांचा विविध सेवाभावी संस्था, व्यक्ती, पदाधिकारी यांनी अभिनंदन करून सत्कार करीत शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. निवडीचे आळंदी परिसरातून स्वागत करण्यात येत आहे. १६७ अर्जातून केवळ १५ अर्जदाराचे मुलाखती घेण्यात आल्या. या मुळे मुलाखती बाबत सर्व अर्जदार यांना न बोलविल्याने संधीची समानता या मूलभूत तत्वांचा विसर निवड प्रक्रियेत झाला असून या संदर्भात पुणे जिल्हा प्रमुख व पुणे जिल्हा सत्र न्यायाधीश यांचे स्तरावर दाखल अर्जावर निर्णय प्रलंबित आहेत.

आळंदी देवस्थानच्या सहा विश्वस्तपदांपैकी तीन जागा गेल्या दीड वर्षापासून रिक्त होत्या. नोव्हेंबरमध्ये ॲड. राजेंद्र उमाप, योगी निरंजननाथ आणि डॉ. भावार्थ देखणे यांची जिल्हा न्यायालयाकडून नियुक्ती झाली होती, परंतु उर्वरित तीन जागा भरण्यासाठी विलंब होत होता. या जागांसाठी २ फेब्रुवारी ते १६ फेब्रुवारी या कालावधीत अर्ज मागवण्यात आले होते, ज्यामध्ये १६७ इच्छुकांनी अर्ज भरले. मात्र, प्रक्रिया रखडली होती. या रिक्त जागांमुळे स्थानिक आळंदीकरांमध्ये नाराजी होती. आळंदीकरांना विश्वस्त मंडळात प्रतिनिधित्व न मिळाल्याचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी आंदोलनाचा पवित्रा घेतला होता. स्थानिकांनी रिक्त जागांवर आळंदीतील प्रतिनिधींची नियुक्ती व्हावी, यासाठी आग्रह धरला होता. आता नवीन विश्वस्तांच्या नियुक्तीमुळे स्थानिकांचा हा आग्रह काही प्रमाणात पूर्ण झाला आहे.

# बारामतीत जैन मंदीर पाडल्याच्या निषेधार्थ मोर्चा व बंद



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बारामती :** मुंबईतील विलेपार्ले येथील दिगंबर जैन समाजाचे मंदीर व जिनमूर्तीची मुंबई महानगरपालिकेच्या अधिका-यांनी बुलडोझर चालवून मंदीर जमीनदोस्त करत जिनमूर्ती व जिनशास्त्राची अवहेलना केली गेली. या घटनेच्या निषेधार्थ बारामतीत गुरुवारी निषेध मोर्चाचे आयोजन केले गेले. बारामतीकरांनी उत्स्फूर्तपणे व्यवहार बंद ठेवून या मोर्चाचे समर्थन केले.

गुरुवारी सकाळी महावीर पथ येथील श्री मुनिसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदीरापासून निषेध मोर्चास प्रारंभ झाला. या मध्य सकल जैन समाज तसेच सर्वधर्मिय बांधव मोठया संख्येने सहभागी झाले होते. गांधी चौक, सुभाष चौक, भिगवण चौकातून इंदापूर चौक मार्गे निषेध मोर्चा प्रशासकीय भवन येथे गेला.

बारामतीचे तहसिलदार गणेश शिंदे यांना या प्रसंगी सकल जैन धर्मियांच्या वतीने निवेदन दिले गेले. किशोरकुमार शहा, मनोज मुथा व दिलीप धोका यांच्या या निवेदनावर सहया आहेत. माजी नगराध्यक्ष जवाहर वाघोलीकर, मंगल सराफ, भारती मुथा, माजी उपनगराध्यक्ष संजय संघवी यांच्यासह अँड. संदीप गुजर, सत्यव्रत काळे, सुशील सोमाणी, सुनिल शिंदे, अक्षय देवकाते, रवींद्र चव्हाण, सुरेंद्र जेवरे, काळूराम चौधरी, आसिफ खान, साधू बल्लाळ, शुभम अहिवळे, श्रीकांत जाधव, रमेश मोरे, जगदीश पंजाबी यांच्यासह अनेक जैन बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिंपळे ग्रापंच्या उपसरपंचपदी अमोल पोमण

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**सासवड :** पुरंदर तालुक्यातील पिंपळे ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदाचा शरद शिवरकर यांनी राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर सरपंच गौरी गोफणे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये उपसरपंच पदाच्या साठी एकमेव अमोल सुदामराव पोमण यांचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर बिनविरोध निवड झाली असल्याची घोषणा सरपंच गौरी गोफणे यांनी केली. यावेळी माजी सरपंच उज्वला पोमण, माजी उपसरपंच शरद शिवरकर, शांताराम पोमण, विलास चव्हाण, विलास पोमण, मुरलीधर पोमण, रामदास पोमण, सुभाष पोमण, आप्पासो खेनट, मीनाक्षी पोमण, विद्याताई खेनट, सारिका दाते, विलास चव्हाण, दिगंबर पोमण, वैभव पोमण, संतोष गोफणे, शरद बिनावडे उपस्थित होते.

## काठापूर बुद्रुकमध्ये विजेच्या खांबाचा प्रश्न जनता दरबारात

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**लोणी-धामणी :** काठापूर बुद्रुक (ता.आंबेगाव) गावच्या हद्दीत रस्त्याच्या मध्यभागी उभा असणारा विजेचा खांब काढावा याबाबत ग्रामस्थांची अनेक दिवसांपासूनची मागणी होती. वाहतूकीस अडथळा होणारा खांब काढावा ही ग्रामस्थांची मागणी घोडेगाव येथील जनता दरबारात मांडण्यात आली. याबाबत काय कारवाई होणार.याबाबत काठापूर बुद्रुक ग्रामस्थांमध्ये उत्सुकता लागली आहे.

काठापुर बुद्रुक येथे महावितरण व महापारेषन कंपनीचे स्टेशन आहे.या ठिकाणावरून परिसरातील अनेक सब स्टेशनला विज पुरवठा होतो. हा पुरवठा करत असताना काठापूर बुद्रुक या ठिकाणावरुण पेठ या ठिकाणी जाणाऱ्या वीजवाहक तारांचे खांब काठापूर बुद्रुक गावातील रस्त्याच्या मध्ये अनेक ठिकाणी उभे आहे. याबाबत ग्रामस्थ व ग्रामपंचायतीने अनेक वेळा विजवितरण कंपनीकडे पाठपुरावा केला.परंतु यावर कार्यवाही झाली नाही. त्यानंतर मागील काही दिवसांपूर्वी घोडेगाव या ठिकाणी तालुक्याचे आमदार दिलीप वळसे पाटील यांनी भरवलेल्या जनता दरबारात हा प्रश्न ग्रामपंचायतीने उपस्थित केला. यावेळी संबंधित विभागाने वळसे पाटील यांनी सुचना केल्या आहेत. त्यामुळे वाहतूकीस अडथळा असनारा हा खांब निघणार का याबाबत ग्रामस्थांना उत्सुकता आहे.

या ठिकाणावरून अनेक नागरिक रोजच ये जा करत असतात. परंतु हा विजेचा खांब रस्त्याच्या मध्येच असल्याने नागरिकांच्या जाण्यास अडथळा येत असून अपघाताचा धोका संभवतो. सदर रस्ता पूर्वी आठ ते दहा फुटाचा होता. त्यावेळी हा खांब या छोट्या रस्त्याच्या कडेला होता.परंतु ग्रामपंचायतीने गावातील सर्वच सार्वजनिक रस्त्यांची मोजणी करून अनेक रस्ते मोकळे केली आहे.त्यामुळे या रस्त्याची रुंदी २५ फूट झाली आहे.

त्यामुळे अनेक खांब रस्त्याच्या मध्येच येत आहेत. त्यामुळे अडथळा ठरणारे खांब काढावे हि अनेक वर्षांपासूनची मागणी होती. झालेल्या जनता दरबारात यावर तोडगा निघून हा खांब बाजूला निघणार का याबाबत ग्रामस्थांना उत्सुकता आहे.



लोणी-धामणी काठापूर बुद्रूक (ता.आंबेगाव ) गावच्या हद्दीत रस्त्याला अडथळा ठरणार विजेचा खांब.

# जुन्नर तालुक्यातील वाड्या वस्त्यांमध्ये शासकीय टँकर सुरू




■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नारायणगाव :** यंदाच्या वर्षी उन्हाळा कडक असल्याने जुन्नर तालुक्यामध्ये सात गाव वाड्या वस्त्यांमध्ये 10 शासकीय टँकर सुरू असून दोन गावांमध्ये नव्याने टँकरची मागणी वाढली असल्याची माहिती प्रभावी व्हिडिओ विठ्ठल भोईर यांनी दिली.

ते म्हणाले की,जुन्नर तालुक्यामध्ये सुकाळवेढे, आंबे कोपरे, मांडवे,जांभूळशी,हडसरची कोटमवाडी, पेठेचीवाडी,देवळे आणे येथील दोन वाड्या, शिंदेवाडी, गुळुंजवाडी या ठिकाणी सध्या शासकीय दहा टँकर सुरू आहेत. नळवणे या ठिकाणी टँकरची मागणी सरपंच अर्चना उबाळे यांनी केली आहे. त्या ठिकाणी सुद्धा तसेच नवलेवाडी, सुरकुलवाडी या ठिकाणी पाण्याच्या टँकरची मागणी करण्यात आली आहे. तिथे देखील लवकरच टँकर सुरू करण्यात येणार असल्याचे भोईर यांनी सांगितले.

दरम्यान उन्हाळ्याची तीव्रता अधिक वाढू लागल्याने टँकरच्या खेपा वाढवाव्या लागणार आहेत. तसेच ज्या गावांमध्ये टँकरची मागणी येईल त्या ठिकाणची तात्काळ पाहणी करून टँकर देखील तातडीने सुरू करण्यात येणार आहेत. काही गावांमध्ये जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न जर निर्माण झाला तर त्या ठिकाणी देखील जनावरांच्या पिण्यासाठी टँकर सुरू केले जातील. पिण्याचे पाणी देण्यासाठी शासन कटिबद्ध असून टँकर संदर्भात काही अडचण आल्यास अगर टँकर वेळेवर येत नसल्यास थेट जुन्नर पंचायत समितीशी संपर्क साधावा असे आवाहन प्रभारी गटविकास अधिकारी विठ्ठल भोईर यांनी केले आहे.

दरम्यान जुन्नर तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यात काही खाजगी टँकर सुद्धा सुरू असून अजिंक्य घोलप व देवराम लांडे यांच्या वतीने गेल्या काही दिवसापासून खाजगी टँकर सुरू आहेत.

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील पठार भागावर पाण्याची तीव्रता भासू लागली असून जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा देखील प्रश्न भेडसावू लागला आहे. चोळीच्या बंधाऱ्यातील पाणी कमी झाल्याने दोन दिवसातून एकदाच शेतकरी आपले कृषी पंप चालवीत आहेत. दरम्यान मिळवण्याच्या सुरुकुलवाडी व नवलेवाडी या ठिकाणी तातडीने टँकर सुरू करण्याची मागणी नळावण्याच्या सरपंच अर्चना उबाळे यांनी केली आहे. या भागात टँकर सुरू करावा म्हणून पंधरा दिवसांपूर्वीच मागणीचे निवेदन त्यांनी जुन्नर पंचायत समितीचे प्रभारी गट विकास अधिकारी विठ्ठल भोईर यांच्याकडे दिले आहे.

## गुलमोहर फुलला



**पुरंदर** वैशाखाच्या रखरखत्या उन्हातही आपल्या विलोभनीय रंगाने जेजुरी शहराच्या सौंदर्यात भर घालणारी ही गुलमोहराची झाडे. जेजुरी गडावरून दिसणारे त्यांचे हे मनमोहक रूप. (छायाचित्र - विजयकुमार हरिश्चंद्रे).

# नीरेत सकल जैन समाजाचा मुक मोर्चा

## विलेपार्ले येथील जैन मंदीर पाडल्याचा केला निषेध, पुन्हा मंदीर बांधण्याची मागणी



नीरा येथाल सकल जैन समाजाच्या वतीने विलेपार्ले येथील जैन मंदीर पाडल्याचा मुक मोर्चा कढून निषेध करण्यात आला.

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नीरा :** विलेपार्ले, मुंबई येथील १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदीर मुंबई महानगरपालिकेने बुलडोझर लावून पाडले. या घटनेचा पुरंदर तालुक्यातील नीरा येथील सकल जैन समाजाच्या वतीने गुरूवारी निषेध करून मुक मोर्चा काढण्यात आला. यावेळी नीरा पोलिसांना व ग्रामपंचायतीला निवेदन देण्यात आले.

विलेपार्ले, मुंबई येथील १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदीर मुंबई महानगरपालिकेने बुलडोझर लावून पाडले. त्यामुळे मंदिरातील दिगंबर जैनमुर्ती व जीनशास्त्र यांचा अविनय झाल्यामुळे सर्व जैन समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या. त्यामुळे गुरूवारी सकाळी नऊ वाजता नीरा येथील सकल जैन समाजाने सर्व व्यवहार बंद ठेवून मंदिरापासून ग्रामप्रदिक्षणा करीत मुक मोर्चा काढला. यावेळी जैन बांधवांनी मुक मोर्चात हातात निषेधाचे फलक घेऊन निषेध व्यक्त केला.

यावेळी मुकमोर्चा नीरा पोलिस दुरक्षेत्राजवळ आल्यानंतर सकल जैन बांधवांच्या वतीने नीरा पोलिस दुरक्षेत्राचे फौजदार सर्जेराव पुजारी तसेच नीरेचे सरपंच तेजश्री काकडे यांना निवेदन दिले. तसेच मुंबई महानगरपालिकेने विलेपार्ले येथील १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैनमंदीर बुलडोझरने पाडले. त्याचा निषेध करून ते मंदिर आहे त्या जागी पुन्हा बांधण्यात यावे अशी मागणी नीरा येथील सकल जैन समाज बांधवांच्या वतीने राज्यसरकारकडे करण्यात आली. यावेळी नीरेच्या सरपंच तेजश्री काकडे, उपसरपंच राजेश काकडे, माजी बांधकाम सभापती दत्ताजीराव चव्हाण यांनीही मुक मोर्चात सहभागी होत जैन धर्मियांच्या मुक मोर्चाला पाठिंबा दिला. यावेळी महावीर स्वामी दिगंबर जैन मंदिराचे अध्यक्ष सुरेश शहा, उपाध्यक्ष मनोज शहा, राजेंद्र जैन,पद्मराज कोठडिया , रेणुका कोठाडिया, शैला शहा, शांतीलाल शहा, दिनेश ओसवाल, डॉ.निरंजन शहा, डॉ.श्रेणिक शहा, डॉ.अशिष शहा, जितेंद्र व्होरा यांच्यासह नीरेतील जैन धर्मियांतील लहान मुले,मुली, महिला व पुरूष मोठ्या संख्येने मुक मोर्चात सामील झाले होते.

### पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली

● जम्मु काश्मिर येथील पहलगाम येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा यावेळी नीरा येथील सकल जैन समाजाकडून निषेध करण्यात आला. तसेच या भ्याड दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांची गोळ्या घालून हत्या झाली. त्या मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

## सकल जैन समाजाचा तहसील कार्यालयावर मोर्चा



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**इंदापूर :** मुंबई महानगरपालिका प्रशासनाने मुंबई उच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश असताना देखील मुंबई विले पार्ले येथील श्री १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर बेकायदेशीरपणे पाडल्याच्या निषेधार्थ इंदापूर तालुका सकल जैन समाजाच्या वतीने काळया फिती लावून इंदापूर तहसील कार्यालयावर गुरुवारी मूक मोर्चा काढला.

श्री १००८ शांतीनाथ दिगंबर जैन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. श्रेणिक शहा, भारतीय जैन संघटनेचे इंदापूर शहर अध्यक्ष धरमचंद लोढा यांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा संपन्न झाला. यावेळी तहसीलदार जीवन बनसोडे यांना नरेंद्र गांधी, कर्मयोगी कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा यांच्या हस्ते निवेदन देण्यात आले. संभाजी चौक, नेहरू चौक, मुख्य बाजारपेठ, शिवाजी चौक, बाबा चौक, जुना पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्ग, संविधान चौक ते मोर्चाचा समारोप इंदापूर तालुका प्रशासकीय भवन येथे करण्यात आला. मोर्चात इंदापूर, भिगवण, वालचंदनगर, पळसदेव, जंक्शन, निमगाव केतकी, निमसाखर, अंथुर्णे, लासूर्णे पंचक्रोशीतील हजारो नागरिक सहभागी झाले होते. यावेळी डॉ. श्रेणिक शहा, भारतीय जैन संघटनेचे जिल्हा पदाधिकारी सचिन बोगावत, वालचंदनगर येथील सारिका वैभव गांधी यांची भाषणे झाली. यावेळी पहलगाम येथे पर्यटकांवर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर कडक कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली. तसेच विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. महेंद्र बोगावत, पंकज दोशी, कमलेश गांधी, डॉ. शीतल शहा, प्रकाश बलदोटा, मिलिंद दोशी, महेंद्र गुंदेचा, पारसमल बागरेचा, सागर दोशी, चंद्रशेखर दोशी, पीयूष बोरा, जवाहर बोरा, संदीप शहा, आदिकुमार गांधी, पवन भालेराव, डॉ. आशिष दोभाडा, अभय गांधी, डॉ. सुदर्शन दोशी, स्वरूप दोशी, स्वप्नील दोशी, सचिन गांधी, स्वराज गांधी, मंगेश गांधी, वकील वैभव गांधी, धनंजय गांधी, नंदिनी महावीर दोशी, मंजुषा विनोद दोभाडा उपस्थित होते. सुत्रसंचलन डॉ. संदेश शहा यांनी केले.

## राष्ट्रीय पंचायत राज दिवस साजरा



**इंदापूर :** केंद्र सरकार व महाराष्ट्र शासन यांच्या १७ एप्रिल रोजीच्या निर्देशानुसार तालुक्यातील पंचायत समिती सभागृहात राष्ट्रीय पंचायत राज दिन साजरा करण्यात आला. यामध्ये पंचायत पंचायत समिती परिसर ,पंचायत समिती कर्मचारी निवासस्थान आणि रेकॉर्ड रूम परिसर या ठिकाणी स्वच्छता करून सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी परिसर आरोग्यदायी ठेवण्याकडे सहभाग नोंदवला. यानंतर पंचायत समिती आवारात केंद्र शासनाच्या तसेच राज्य शासनाच्या महत्त्वाच्या योजनांचे वाचन साहित्य पंचायत समितीमध्ये आलेल्या नागरिकांना वाटप करण्यात आले. यानंतर पंचायत समिती सभागृहात आदर्श ग्रामपंचायतीचे सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांचा सन्मान सोहळा पार पडला. या कार्यक्रमाची सुरुवात विस्तार अधिकारी प्रशांत बगाडे यांनी पंचायती राज दिनाचे महत्त्व सांगत मार्गदर्शनात्मक भाषण देऊन केली. त्यानंतर केंद्र व राज्य शासनाच्या विविध विकास योजना गावापर्यंत पोहोचवण्यासाठी आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले. तालुक्यातील आदर्श ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी यांना या वेळी सन्मानित केले गेले. ग्रामपंचायत सरडेवाडी येथील सरपंच जानकर यांचा त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीसाठी गटविकास अधिकारी सचिन खुडे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विस्तार अधिकारी युनूस शेख यांनी केले.

## हा भारताच्या सार्वभौमत्वावरील हल्ला



**पारगांव :** उरी, पठाणकोट, पुलवामा आदी दहशतवादी हल्ल्यांना चोख उत्तर दिल्यानंतरही असे हल्ले थांबायला तयार नाहीत. हे काश्मीरच्या पहलगाममधील भीषण दहशतवादी हल्ल्यावर पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. येथे दहशतवाद्यांनी भारतीय पर्यटकांवर त्यांचा धर्म विचारून २७ जणांची निर्दयीपणे हत्या केली. यात एका नवविवाहितेसमोरच तिच्या पतीला मारण्यात आले. ही घटना दहशतवाद्यांची केवळ क्रूरताच नव्हे, तर भारताच्या सार्वभौमत्वावर आणि हिंदू समाजावर झालेले थेट आक्रमण दर्शवते. हे जिहादी आक्रमण काश्मिरी हिंदूंच्या नरसंहाराचाच पुढचा भाग आहे. याचा केवळ निषेध न करता भारत सरकारने जिहादी अतिरेक्यांना आणि त्यांच्या भारतातील हस्तकांना जन्माची अद्दल घडेल, अशी कठोर सैन्य कारवाई करावी, अशी मागणी हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे पुणे जिल्हा सहसंयोजक डॉ. निलेश लोणकर यांनी गुरुवारी छत्रपती संभाजी महाराज चौक, पारगाव (सा.मा.), दौड, पुणे येथे सकाळी ९ ते ११ या वेळेत झालेल्या आंदोलनातून केली आहे. पारगाव (सा. मा.) चे माजी उपसरपंच श्री. सोमनाथ आबा ताकवणे, केडगाव येथील स्वातंत्र्यवीर सावरकर युवा मंचचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर निलेश लोणकर, केडगाव येथील स्वामी समर्थ पोलीस अकॅडमीचे संदीप टेंगले सर, कडेठाण येथील गणेश दिवेकर, माजी सैनिक दिपक शेळके यांनी मनोगत व्यक्त केले. पारगाव (सा. मा.) चे सरपंच सुभाष बोत्रे, (सा.मा.) , माजी तंटामुक्ती अध्यक्ष . शामराव आबा ताकवणे, हिंदु राष्ट्र समन्वय समितीचे गणेश ताकवणे इत्यादी मान्यवर आंदोलनाला उपस्थित होते.

## दारुला पैसे न दिल्याने मित्राला मारहाण



**शिक्रापूर :** शिरुर शहरातील सिद्धार्थ जेकटे हे गोपाळ वस्ती येथील सरकार मान्य देशी दारुच्या दुकानासमोर बसलेले असताना, त्यांचा मित्र पप्पू चौघुले दारुच्या दुकानासमोर आला त्याने सिद्धार्थकडे दारु पिण्यास पैसे मागितले. मात्र, सिद्धार्थने पैसे देण्यास नकार दिला, यावेळी पप्पू याने चिडून सिद्धार्थला शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण करून दुखापत केली, याबाबत सिद्धार्थ संजय जेकटे (३२ वर्षे, रा. अंबिका माता मंदिर जवळ शिरुर ता. शिरुर) यांनी शिरुर पोलिसांत फिर्याद दिली असून, पोलिसांनी पप्पू लक्कड चौघुले याचे विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## निमगाव म्हाळुंगीत निषेधार्थ कॅण्डल मार्च

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** निमगाव म्हाळुंगी, ता. शिरुर येथे शिवराज्य प्रतिष्ठान आणि ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने सरपंच बापूसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली जम्मू काश्मीरमधील पहलगामच्या भागात पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ कॅण्डल मार्च काढून ग्रामस्थांनी मृत पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

निमगाव म्हाळुंगी येथे शिवराज्य प्रतिष्ठाण आणि ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने सरपंच बापूसाहेब काळे यांच्या नेतृत्वाखाली जम्मू काश्मीरमधील पहलगामच्या भागात पर्यटकांवर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ मृतांना श्रद्धांजली तसेच दहशतवाद्याना कठोर शिक्षा व्हावी यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिलीप चव्हाण, दादासाहेब घोरपडे, तान्हूबाई चव्हाण, आशाताई कुंभार, स्वाती दोरगे, शिवराज पवार, आर्यन चव्हाण, भूषण दौंडकर, आदित्य कुटे, प्रणित कांबळे, संस्कार महाडिक, युवराज चव्हाण, प्रेम लोखंडे, आदर्श गायकवाड, शौर्य दोरगे, शंभू चव्हाण, राजकुमार कांबळे, साक्षी कुंभार, हर्षदा कुंभार, अनुष्का घोरपडे, प्रांजल दोरगे, तनिष्का घोरपडे, स्वरा सूर्यवंशी, श्रेया सूर्यवंशी यांच्यासह अनेक ग्रामस्थ रॅली मध्ये सहभागी झाले होते. यावेळी पर्यटकांवर झालेला हल्ला हा अंत्यत क्रूर पणे झालेला घटना निंदनीय आहे. बरेच पर्यटक या हल्ल्या मध्ये जखमी झाल्याची बाब दुर्दैवी आहे. मात्र सरकारने लवकरात लवकर त्या दहशतवाद्यांना फाशी द्यावी म्हणजे पर्यटकांवर झालेल्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या पर्यटकांच्या आत्म्यास शांती मिळेल आणि मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांना तीच खरी श्रद्धांजली असेल, असे मत निमगाव म्हाळुंगी चे सरपंच तथा अखिल भारतीय सरपंच परिषदेचे पुणे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब काळे यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप चव्हाण यांनी केले तर आशाकुंभार यांनी सहभागी झालेल्या देशभक्तांचे आभार मानले.



# शिक्रापूर ग्रामपंचायत पक्षांच्या दाणापाण्यासाठी सरसावली



■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**शिक्रापूर :** सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरु झालेले असताना पक्षांना अन्न पाण्यासाठी भटकंती करावी लागत असल्याने शिक्रापूर ग्रामपंचायत व भैरवनाथ मोफत वाचनालयच्या वतीने नुकतेच पशु पक्षी वाचवा निसर्ग वाचवा अभियान सुरु करण्यात आले असून या उपक्रमाचे प्राणीमित्र व उद्घाटन पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आले आहे.

शिक्रापूर ता. शिरुर ग्रामपंचायत व भैरवनाथ मोफत वाचनालयच्या वतीने नुकतेच पशु पक्षी वाचवा निसर्ग वाचवा अभियान सुरु करण्यात आले असून, या अभियानाचे उद्घाटन सरपंच रमेशराव गडदे, उपसरपंच वंदनाताई भुजबळ, ग्रामपंचायत अधिकारी शिवाजीराव शिंदे, ग्रंथपाल संतोष काळे, निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख, उद्योजक हरून इनामदार, अक्षय मचे, तुषार आळंदीकर, बबनराव मांढरे, प्रशांत वाबळे, ग्रामपंचायत कर्मचारी अनंता दरवडे यांसह आदी पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना सार्वजनिक व समाजपयोगी उपक्रम राबविण्यासाठी ग्रामपंचायतचे नेहमी सहकार्य व पुढाकार असणार असल्याचे सरपंच रमेश गडदे व उपसरपंच वंदना भुजबळ यांनी सांगितले तर ग्रामपंचायत व ग्रंथालयने राबविलेला उपक्रम कौतुकास्पद असून काळानुसार निसर्गातील बदल लक्षात घेता पशु पक्षांच्या रक्षणासाठी नागरिकांनी पुढे येणे गरजेचे असल्याचे मत निसर्ग वन्यजीव सामाजिक संस्थेचे अध्यक्ष शेरखान शेख यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल संतोष काळे यांनी केले तर यांनी ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले.

# मिक्स भाजीने करा रुचीपालट



दोस्तांनो, त्याच त्या चवीच्या भाज्या खावून कंटाळा आला आहे का? तुम्ही मस्तपैकी मिक्स रस्सा करू शकता. आवडीचे मसाले घालून, वेगवेगळे फंडे लढवून तुमच्यातलं शेफचं कौशल्य पणाला लावा.

**साहित्य:** फ्लॉवरचे तुरे, एक कांदा, गाजर, थोडी फरसबी, मटार, टोमॅटो, दोन चमचे तेल, मोहरी, तिखट, हळद,गरम मसाला, मीठ आणि चिरलेली कोथिंबिर

**झटपट रेसिपी**

**कृती:** सर्व भाज्या चिरून घ्या. कढई गॅसवर ठेऊन त्यात तेल घाला. तेल गरम झाल्यावर मोहरी घाला. त्यानंतर कांदा घालून छान परतून घ्या. त्यात हळद आणि तिखट घालून दोन मिनिटं परता. आता फ्लॉवर, गाजर, फरसबी, मटार घालून शिजू द्या. भाज्या शिजल्यावर बारीक चिरलेला टोमॅटो आणि गरम मसाला घाला. तो शिजल्यावर मीठ घाला. हलवून घ्या. सुकी भाजी नको असेल तर शेवटी थोडं पाणी घालून रस्सा करा.कोथिंबिरीने सजवा. ही भाजी तुम्ही पोळी किंवा पावासोबत खाऊ शकता.

## फंडू एसएमएस

जिंदगी के मजे
लेना सिखो
वक्त तो तुम्हारे
मजे
लेता ही रहेगा।

अपने तो अलग
असूल है। यार
के खातिर,
कांटे भी कबुल
है।

जिंदगी के सारे गम बांट
लेते है दोस्त,
क्यों जिंदगी में साथ देते है दोस्त,
रिश्ता तो सिर्फ उनसे दिल
का होता है, फिर भी हमें क्यों
अपना मान लेते हैं दोस्त।

**बंगळूरूची गणना देशातल्या सुंदर शहरांमध्ये होते. इथलं वातावरणही आल्हाददायक असतं. बंगळूरू हे बागांचं, तलावांचं शहर. मात्र इथे प्रदूषणही प्रचंड आहे. वायू प्रदूषणच नाही तर जल प्रदूषणाची समस्याही बंगळूरूला भेडसावते आहे. कचरा, सांडपाणी, कारखान्यातून बाहेर पडणारं रासायनिक पाणी यामुळे तलाव प्रदूषित झाले आहेत. यामुळे व्यथित झालेला ए. पवन रेड्डी या समस्येवर उपाय शोधण्याच्या प्रयत्नात आहे.**

# जलप्रदूषणावरील नामी उपाय



एअरोनॉटिकल इंजिनिअरींगचं शिक्षण घेतलेला ए.पवन रेड्डी स्वत:पुरता विचार करून थांबला नाही. त्याला बंगळूरूतल्या प्रदूषित तलावांची खूप काळजी वाटते. तलावांचं शहर अशी ओळख असणाऱ्या बंगळूरूवर प्रदूषणाची काळी छाया आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इथल्या तलावांमध्ये कचरा टाकला जात आहे. इतकंच नाही तर कारखान्यांमधलं रासायनिक पाणी बेकायदेशीर पद्धतीने त्यात सोडलं जात आहे. इथला 'बेलांदूर' तलाव सर्वाधिक प्रदूषित झाला आहे. या तलावात सगळीकडे फक्त पांढरा फेस दिसतो. सतत टाकला जाणारा कचरा आणि सांडपाण्यामुळे अत्यंत विषारी असा हा फेस तयार झाला. याबाबत वृत्तपत्रांमध्येही बातम्याही छापून आल्या.

अनेकांप्रमाणे पवनलाही तलावाची अशी अवस्था बघवत नाही. 'बेलांदूर' तलावाची बिघडत जाणारी अवस्था बघतच तो मोठा झाला. वर्तमानपत्रांमध्ये याबाबत बातम्या यायच्या, काळजी व्यक्त केली जायची. पण प्रत्यक्षात काय करता येईल याबद्दल काहीच सांगितलं जात नव्हतं. यासाठी आपणच काहीतरी करायला हवं असं पवनच्या मनात आलं. त्याने प्रयत्न सुरू केले. या समस्येवरचा उपाय त्याला सापडला.फळांच्या सालांचा वापर प्रदूषण कमी करण्यासाठी करता येईल, असा विचार त्याच्या मनात आला.

अशी परिस्थिती हाताळण्यासाठी इतर देश करत असलेल्या उपाययोजनांचा धांडोळा त्याने घेतला. यातून फारसं काही हाती लागलं नाही. परदेशात वापरलं जाणारं प्रगत तंत्र इथे वापरता येणार नव्हतं. मात्र त्याने हार मानली नाही. पवनचं संशोधन सुरूच होतं. याच दरम्यान त्याला फळांच्या सालांच्या शुद्धिकरण क्षमतेची माहिती मिळाली. कलिंगड, अननस, पपई, लिंबू, केळं अशा फळांच्या सालांमध्ये हे गुणधर्म असतात. ठोस काहीतरी मिळेपर्यंत त्याने एकही पाउल मागे घेतलं नाही. सुरूवातीला त्याने ताज्या फळांची सालं घेतली. सालांमधल्या पाण्याच्या प्रमाणामुळे पहिला प्रयोग फसला. मग त्याने उन्हात वाळवलेल्या सालांवर प्रयोग केला. वाळलेल्या सालींची पूड करून घेतली. 'फिल्ट्रेशन मेंब्रेन' तयार केला. त्यात 'हायड्रोक्लोरिक ॲसिड' घातलं. मग तलावातलं पाणी आणून फिल्टरमध्ये ओतलं. त्यात वाळलेल्या सालांची पूड घातली. १०० मिलिलीटर पाण्यात एक ग्रॅम पूड घातली. यानंतर पाणी ९० ते ९२ टक्क्यांपर्यंत शुद्ध झालेलं होतं. हे शुद्ध पाणी पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापरता येईल, असं पवन सांगतो. आपलं हे संशोधन त्याने प्रदूषण नियंत्रण मंडळालाही दाखवलं. इथेही त्याची चाचणी यशस्वी ठरली. यानंतर त्याने या शोधाचा आवाका वाढवायचं ठरवलं आहे. 'बेलांदूर' तलाव स्वच्छ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असं तंत्रज्ञान त्याला वापरायचं आहे. पाण्याचे स्रोत प्रदूषित होत असताना पवनचं संशोधन भविष्यात नक्कीच उपयोगी पडेल.

**अचिव्हर**

# वजन कमी करताय?



वजन कमी करणं सोपं नसतं. जिभेवर नियंत्रण ठेवण्यासोबत व्यायामही करावा लागतो. अर्थात व्यायाम केला आणि वजन कमी झालं असं होत नाही. व्यायामही योग्य पद्धतीने करावा लागतो. चुकीचा तसंच चुकीच्या पद्धतीने केलेला व्यायाम घातक ठरू शकतो. वजन कमी करताना नेमकं काय करावं आणि करू नये याविषयी...

✻ सुरूवातीपासूनच तीव्र स्वरुपाचा व्यायाम करू नका. सोप्या पण प्रभावी व्यायामाने वजन कमी करण्याच्या प्रवासाला सुरूवात करा. सुरूवातीलाच तीव्र व्यायाम केल्यास तुम्ही लवकर दमाल. शिवाय स्नायू दुखवण्याची शक्यता वाढेल. त्यामुळे दमाने घ्या.

✻ प्रत्येकाला वेगवेगळ्या प्रकारचा व्यायाम आवडतो. कोणाला धावायला आवडतं तर कोणाला जॉगिंग बरं वाटतं. तुम्हीही ओढूनताणून व्यायाम करू नका. आवडत्या व्यायाम प्रकारांना प्राधान्य द्या.

✻ एकीकडे व्यायाम करायचा आणि दुसरीकडे जंक फूड खायचं याला काहीच अर्थ नाही. व्यायामासोबतच हेल्दी फूडही खायला हवं. तेलकट, गोड, मैद्याचे पदार्थ टाळा.

✻ खूप दिवसांनी व्यायाम सुरू केल्यानंतर अंगदुखी, स्नायूदुखीसारखे त्रास संभवतात. त्यामुळे शरीराला पुरेशी विश्रांती द्या. उगाचच धावपळ करू नका. विश्रांतीमुळे शरीर पुन्हा ताजंतवानं होईल आणि तुम्हाला बरं वाटेल.

**फिटनेस फंडा**

## स्मार्ट टिप्स

### हे सर्च करू नका...




गूगल सर्चवर काहीही सर्च करता येतं. कोणतीही माहिती हवी असल्यास आपणही पटकन गूगल सर्चवर जातो. गूगलवर सगळं उपलब्ध असलं तरी त्यावर सगळ्या गोष्टी शोधू नयेत. आजारी पडल्यावर गूगलवर औषधाचा शोध घेऊ नका. डॉक्टरांच्या सल्ल्यानेच औषधं घ्या. ऑनलाईन शॉपिंगसाठी डिसकाउंट कूपन्सचा शोध घेत असाल तर सावध व्हा. अशा कूपन्सच्या माध्यमातून तुमचा डाटा चोरीला जाऊ शकतो. गूगलवर कस्टमर केअर नंबरही सर्च करू नका.

## बी अलर्ट

### धोका फेक डिलिव्हरी स्कॅमचा

सध्या फेक डिलिव्हरी किंवा कॅश ऑन डिलिव्हरीचा बहाणा करून युजर्सची फसवणूक होत आहे. हॅकर्स फ्लिपकार्ट किंवा ॲमेझॉनसारख्या ई कॉमर्स साईट्सचे डिलिव्हरी एजंट असल्याची बतावणी करून बँक खात्यातून पैसे गायब करत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी ई कॉमर्स कंपन्यांनी डिलिव्हरीच्या वेळी ओटीपी देऊन वस्तू घेण्याचं आवाहन केलं आहे. मात्र यामुळे डोकेदुखी वाढली आहे. हॅकर्स किंवा स्कॅमर्स डिलिव्हरी एजंट बनून तुमच्या दाराशी येतात. वस्तू देण्याआधी ओटीपी विचारतात. या जाळ्यात अडकून आपण ओटीपी दिला तर स्कॅमर आपल्या फोनचं क्लोन तयार करतात. या माध्यमातून आपल्या बँक खात्याचा ॲक्सेस त्यांना मिळू शकतो. सातत्याने ऑनलाईन शॉपिंग करणाऱ्यांना लक्ष्य केलं जात आहे. त्यामुळे तुम्ही जपून रहायला हवं.

## स्मार्ट टिप्स

### स्मार्टफोन चोरीला गेलाय?

मोबाईल फोन चोरीला गेल्यानंतर चांगलीच पंचाईत होते.



फोनमधला महत्त्वाचा डाटा, फोटो, व्हिडिओ लीक होण्याची भीती वाटत राहते. मात्र तुम्ही हा डाटा घरबसल्या डिलिट करू शकता. यासाठी माय डिव्हायसेस गूगल डॉट कॉमवर जा. स्मार्टफोनमध्ये सेव्ह केलेला जी मेल आयडी ओपन करा. इथे प्ले साउंड, सिक्योर डिव्हाइस आणि इरेझ डिव्हाईस असे पर्याय दिसतील. यापैकी इरेझ डिव्हाइसची निवड करा. यानंतर जीमेल आयडी आणि पासवर्डची नोंद करून पुढे जा. आता तुमच्या जुन्या फोनमधला डाटा डिलिट झाला असेल. अर्थात यासाठी जुन्या फोनचं इंटरनेट कनेक्शन ऑन असायला हवं.

## ॲप वर्ल्ड

### संकटकाळाचा साथी

आज आपण स्मार्टफोनवर अवलंबून आहोत. स्मार्टफोनमधल्या स्मार्ट फीचर्समुळे आपलं आयुष्य सुसह्य झालं आहे. संकटकाळीही स्मार्टफोन आपली मदत करू शकतो. अँड्रॉईडमध्ये इमर्जंसी लोकेशनचीही सोय आहे. स्मार्टफोनमध्ये इमर्जंसी सेवा सेट करता येतील. यासाठी स्मार्टफोनचं पॉवर बटण काही काळासाठी दाबून ठेवा. यानंतर स्क्रीनवर इमर्जंसी एसओएस फीचरवर टॅप करा. यानंतर स्मार्टफोन ११२ क्रमांकाला फोन लावेल. फोन लागल्यावर तो कट करा. यानंतर स्क्रीनवर खालच्या बाजूला मेडिकल इन्फॉर्मेशन हा पर्याय दिसेल. त्यावर क्लिक करा. यात तुमची आरोग्यविषयक माहिती नोंदवता येईल. यानंतर डन हे बटण दाबा. यामुळे संकटकाळी तुम्हाला मदत मिळू शकेल.

# नातं टिकेल का?

मी २९ वर्षांची तरुणी असून गेल्या दोन वर्षांपासून वयाने दोन वर्षांनी मोठ्या असणाऱ्या मुलाच्या प्रेमात आहे. भूतकाळात घडलेल्या काही अप्रिय घटनांमुळे त्याचा खऱ्या प्रेमावरचा विश्वासच उडून गेला आहे. आमचं नातं खूप घट्ट असलं तरी मी त्याला फक्त आवडते. त्याचं माझ्यावर प्रेम नाही. आयुष्यात स्थिरस्थावर व्हायचं की नाही याबाबत त्याच्या मनात बराच गोंधळ आहे. त्याला यावर काही बोलायचंही नाही. माझं त्याच्यावर खूप प्रेम असलं तरी आमच्या भविष्याबद्दल मला खूप काळजी वाटते. मी काय करू?



**मॅच मेकिंग**

**उत्तर:** एखाद्याचा भूतकाळ त्याच्या वर्तमानावर प्रभाव टाकू शकतो. या परिस्थितीतून त्याचं त्यालाच बाहेर यावं लागेल. दुर्दैवाने तू त्याची फारशी मदत करू शकणार नाहीस. तू या नात्याबाबत साशंक असलीस तरी त्याने त्याचं मत तुला सांगितलं आहे. आपण कोणाच्याही भावना किंवा विचार बदलायला भाग पाडू शकत नाही. हा प्रत्येकाचा वैयक्तिक निर्णय असतो. काळानुरुप त्यात बदल होत असला तरी त्याची काहीच शाश्वती देता येत नाही. त्यामुळे तू तुझ्या आयुष्याचे प्राधान्यक्रम ठरव. या नात्याच्या चांगल्या आणि वाईट परिणामांची यादी कर. पूर्ण विचारांती पुढचा निर्णय घे.

# फ्लोरल्सचा ट्रेंड

फ्लोरल म्हणजे फुलाफुलांच्या डिझाईनचे किंवा प्रिंटचे शर्ट आता मुलांच्या वॉर्डरोबचा भाग होऊ लागले आहेत. उन्हाळ्यात फ्लोरल प्रिंटचे हे शर्ट ताजेपणाची अनुभूती देतात. फ्लोरल्स खूप छान दिसतात. मात्र ते योग्य पद्धतीने कॅरी करणं आवश्यक आहे. आयुष्यात थोडे रंग भरण्यासाठी फ्लोरल शर्ट तुमच्या फॅशनचा भाग व्हायला हवेत. फ्लोरल्समुळे तुमचं व्यक्तिमत्त्व खुलू शकतं. ट्रेंडी फ्लोरल्स कशा पद्धतीने कॅरी करता येतील याविषयी...

✻ प्लेन, चेक्स किंवा स्ट्राईप्सवाले शर्ट घालण्याची सवय असणाऱ्या मुलांना फ्लोरल किंवा प्रिंटेड शर्टशी पटकन जुळवून घेता येत नाही. अशा वेळी न्यूट्रल रंगांची निवड करून सेफ गेम खेळता येईल. फ्लोरल प्रिंटवाला बेज रंगाचा कॉटन शर्ट आणि खाकी पँट असं कॉम्बिनेशन करा. यासोबत ड्रेस शूज कॅरी करा. ऑफिसमध्ये कॅज्युअल वेअर म्हणून असा पेहराव करता येईल.



✻ फ्लोरल शर्टवर डेनिम जॅकेट घालता येईल. यामुळे तुमचा लूक फार बटबटीत वाटणार नाही. तसंच तुम्ही ट्रेंडीही दिसाल. फ्लोरल शर्ट, डेनिम जॅकेट, ब्लू डेनिम जीन्स आणि स्नीकर्स घालून तुम्ही चित्रपट बघायला जाऊ शकता.

✻ मोठ्या प्रिंटवाला किंवा गडद रंगाचा फ्लोरल शर्ट आणि फिकट रंगाची पँट हे कॉम्बिनेशन शोभून दिसेल. अशा शर्टसोबत लिननची ऑफ व्हाईट पँट घाला. ग्रीन कॅनव्हास स्नीकर्सनी तुमचा लूक खुलवा. मित्रमंडळींसोबत भटकंती करायला जायचं असेल तर हा पेहराव बेस्ट ठरेल.

✻ जास्त स्टायलिश दिसायचं असेल तर काळ्या टी शर्टवर फ्लोरल प्रिंटचा शर्ट जॅकेटसारखा कॅरी करा. यावेळी ब्राउन ट्राउझर घाला. कॉफी डेटसाठी हा पेहराव अगदी उत्तम आहे.

✻ मोनोक्रोमॅटिक फॅशनही करता येईल. काळ्या फ्लोरल शर्टवर काळी पँट घाला. स्नीकर्सऐवजी काळ्या स्लीप ऑन्सही निवड करा. कॅफे किंवा रेस्टॉरंटमध्ये जाताना हा लूक कॅरी करा.

✻ खास प्रसंगासाठी तयार होतानाही फ्लोरल्स कॅरी करता येतील. फ्लोरल शर्टवर ऑफ व्हाईट ब्लेझर घाला. सोबत ज्यूट कॉटन ट्राउझर असेल तर उत्तमच! फ्लोरल कफलिंक्स, पॉकेट स्क्वेअरने तुमचा लूक खुलवा.

**फॅशन पॅशन**

# तारेल वाचनाची आवड

वाचाल तर वाचात असं म्हटलं जातं. पुस्तकांचं वाचन हा ज्ञान मिळवण्याचा उत्तम मार्ग आहे. वाचनाचा हा छंद विविध प्रकारच्या करिअरमध्ये यश मिळवून देऊ शकतो. वाचनामुळे आपण प्रगल्भ होतो. भाषा समृद्ध होत जाते. मेंदूला तरतरी येते. वाचन करणारे युवक-युवती करीअरचे कोणते मार्ग अवलंबू शकतात याविषयी...



✻ 'मार्केट रिसर्च ॲनालिस्ट' स्पर्धक कंपन्या, बाजारपेठेतली स्थिती आणि ग्राहकांच्या व्यवहाराचा अभ्यास करून संबंधित कंपनीची उत्पादनं तसंच सेवा उपलब्ध करून देतात. यात बरंच वाचन करावं लागतं. 'मार्केटिंग' आणि 'मार्केट रिसर्च'सह 'इंन्फॉर्मेशन सायन्स'चे अभ्यासक्रम या क्षेत्रात उपयोगी पडतील.

✻ 'कंटेंट रायटर' म्हणून काम करता येईल. वेबसाईट्ससाठी लिखाण करता येईल. 'ब्लॉगर' म्हणून सुरूवात केल्यानंतर पुढे मार्ग मिळत जातील.

✻ वाचनाच्या आवडीसह कल्पकता असेल तर 'स्लोगन रायटिंग' आणि आकर्षक हेडिंग्ज तयार करून 'कॉपी रायटिंग'च्या क्षेत्रात हात आजमावता येईल.

**वेगळ्या वाटा**

✻ प्रकाशनाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत.

✻ पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण करून वृत्तपत्रात नोकरी करता येईल. या कामाला सध्या बरंच वलय आहे.

✻ वकिलांनाही भरपूर वाचन करावं लागतं. सतत कायदे अभ्यासाचे लागतात.सर्वोच्च तसंच उच्च न्यायालयाचे निकाल वाचावे लागतात. त्यामुळे वाचनाची आवड इथे तारून नेऊ शकते.

# नितांत सुंदर कोला बीच

गोवा हे प्रसिद्ध टूरिस्ट टेस्टिनेशन. इथल्या समुद्रकिनाऱ्यांवर निवांत भटकंती करता येते. समुद्रात मनसोक्त डुंबता येतं. 'फुल टू धम्माल' करण्यासाठी गोव्यासारखं उत्तम ठिकाण नाही. गोव्यात सगळं काही आहे. इथल्या नागमोडी रस्त्यांवरून बाईक चालवण्याचा आनंद वेगळाच. गोव्यातले शांत आणि रम्य समुद्रकिनारे मन मोहवून टाकतात. इथे काही काळ घालवल्यानंतर मन कसं प्रसन्न होऊन जातं. आपण नव्या उत्साहाने कामाला लागतो. गोव्यातले अनेक समुद्रकिनारे प्रसिद्ध आहे. विविध बीचवर पर्यटकांचा गजबजाट पहायला मिळतो. मात्र याच गोव्याच्या कुशीत दडलेली काही रत्न या गजबजाटापासून, कोलाहलापाहून दूर आहे. असंच एक रत्न म्हणजे कोला बीच. कोलाची गणना गोव्यातला सुंदर आणि आकर्षक बीचमध्ये होते. विशेष म्हणजे इथे शांतता असते.

तुम्हालाही गजबजाटापासून काही काळ लांब रहायचं असेल तर गोव्याला या आणि कोला बीचला भेट द्या. या बीचलगत महागडी रिसॉर्टस किंवा हॉटेल्स नाहीत मात्र तुमच्यासाठी तंबूची सोय होऊ शकते. साधं पण चविष्ट जेवण मिळू शकतं. कोला हा स्वच्छ आणि सुंदर बीच आहे. इथल्या निळ्याशार समुद्रात पोहण्याची हौस भागवता येईल. या बीचवर कयाकिंगची सुविधा आहे. कयाकिंगची गणना धाडसी खेळांमध्ये केली जाते. वेगळा अनुभव म्हणून कयाकिंग करता येईल. या बीचवर सूर्यास्ताचं मनोहारी दर्शन घडतं.

कोला हा गोव्यातला सर्वोत्तम बीच असल्याचं म्हटलं जातं. या समुद्रकिनारा छोटेखानी टेकड्यांनी वेढलेला आहे. भरपूर झाडी असणाऱ्या या टेकड्यांमुळे समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्याला चार चांद लागले आहेत.गोव्यातल्या विविध समुद्रकिनाऱ्यांवरून सूर्यास्ताचं दर्शन घडत असलं तरी कोलाचा सूर्यास्त वेगळाची आहे. निसर्गरम्य वातावरणामुळे इथला सूर्यास्त खास ठरतो. या बीचवरची सोनेरी वाळू आपल्याला आकर्षित करते. या वाळूवर नुसतं बसून राहिलं तरी खूप छान वाटतं. पणजीहून कोला बीचला जायला दोन तास लागतात. या प्रवासादरम्यान वेगळाच निसर्ग तुम्हाला खुणावत असतो.

**भटकंती**









# आरसीबीने घरचा गड राखला!

## राजस्थानला पराभूत करत गुणतालिकेमध्येही झेप, मुंबई इंडियन्सला टाकलं मागे

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**बंगलरू :** इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेच्या ४२ व्या सामन्यात गुरुवारी (२४ एप्रिल) रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने राजस्थान रॉयल्सला ११ धावांनी पराभूत केले. हा बंगळुरूचा यंदाच्या हंगामातील घरचे मैदान एम चिन्नास्वामी स्टेडियमवर पहिला विजय आहे. याआधी या हंगामात या मैदानात झालेल्या तिन्ही सामन्यात त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. तसेच बंगळुरूचा हा ९ सामन्यांतील ६ वा विजय देखील ठरला. त्यामुळे त्यांचे आता १२गुण झाले असून त्यांनी पॉइंट्स टेबलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. त्यांनी १० गुणांवर असलेल्या मुंबई इंडियन्स, पंजाब



किंग् आणि लखनौ सुरर जायंट्सला मागे टाकले आहे. बंगळुरूसह पहिल्या दोन क्रमांकावर असलेल्या गुजरात टायटन्स आणि दिल्ली कॅपिटल्सचेही १२ गुण आहेत, पण त्यांचा नेट रन रेट बंगळुरूपेक्षा चांगला आहे.

गुरुवारी झालेल्या सामन्यात बंगळुरूने राजस्थानसमोर २०६ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानला २० षटकात ९ बाद १९४ धावाच करता आल्या. बंगळुरूकडून जोश हेजलवूडची गोलंदाजी सर्वोत्तम ठरली. बंगळुरूसाठी तो विजयाचा हिरोही ठरला.

राजस्थानकडून यशस्वी जैस्वाल आणि १४ वर्षीय वैभव सूर्यवंशी यांनी सलामीला सुरुवात केली. जैस्वालने डावाच्या पहिल्याच चेंडूवर षटकार ठोकला. त्याच्यात आणि सूर्यवंशीमध्ये चांगली भागीदारी होत होती. त्यांनी अर्धशतकी भागीदारीही केली. पण ५ व्या षटकात सूर्यवंशीला भूवनेश्वर कुमारने बाद केले. सूर्यवंशीने १२ चेंडूत २ षटकारांसह १६ धावा केल्या.


तो बाद झाल्यांनंतर जैस्वाल नितीश राणासह डाव पुढे नेत होता. पण त्याला अर्धशतकासाठी एकाच धावेची गरज असताना जोश हेजलवूडच्या गोलंदाजीवर तो रोमरियो शेफर्डच्या हातून झेलबाद झाला. त्याने तुफानी फलंदाजी करताना ७ चौकार आणि ३ षटकारांसह १९ चेंडूत ४९ धावांची खेळी केली.

तरी राजस्थानचा कर्णधार रियान परागने नंतर चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला येत आक्रमक फटके खेळत संघाची धावगती आणखी वाढवली होती. मात्र त्याला फार काळ कृणाल पांड्याने टीकू दिले नाही.

कृणालने १० व्या षटकात पहिल्याच चेंडूवर रियानला माघारी धाडले. रियानचा झेल जितेश शर्माने घेत बाद केले. रियानने २ चौकार आणि २ षटकारांसह १० चेंडूत २२ धावा केल्या. नंतर नितीश राणाही १४ व्या षटकात बाद झाल्याने सामन्यात रोमांच आला होता. नितीशने २२ चेंडूत ३ चौकार आणि एका षटकारासह २८ धावा केल्या.

## अर्जुन तेंडुलकर पुढचा ख्रिस गेल होऊ शकतो!

**नवी दिल्ली :** इंडियन प्रीमिअर लीग २०२५ मध्ये अभिषेक शर्मा व शुभमन गिल यांनी दमदार कामगिरी करून दाखवली आहे. हे दोघंही



युवा फलंदाज भारताचा माजी अष्टपैलू खेळाडू युवराज सिंग याच्या तालमीत तयार झाले आहेत. महान फलंदाज सचिन तेंडुलकर याचा मुलगा अर्जुन यानेही युवराजकडून प्रशिक्षण घ्यावे आणि तो आगामी ख्रिस गेल बनेल, असा दावा युवीचे वडील योगराज सिंग यांनी केला आहे. भारताचे माजी खेळाडू योगराज हे त्यांच्या विधानाने नेहमीच चर्चेत असतात. आधी त्यांनी अर्जुनला माझ्या हाताखाली शिकायला लावा, त्याला चांगला क्रिकेटपटू बनवतो, असे म्हटले होते. आता त्यांनीच अर्जुलना युवराजच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेण्याचा सल्ला दिला आहे. अर्जुनने मुंबई संघ सोडून गोवा संघाकडून खेळण्याचा निर्णय घेतला आहे आणि गोव्याकडून पदार्पणाच्या सामन्यात त्याने शतकही झळकावले होते. अर्जुनकडे आक्रमक खेळ करण्याची क्षमता आहे, त्याला युवराजचे मार्गदर्शन मिळाल्यास तो पुढचा ख्रिस गेल बनू शकतो. गेलने ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये युनिव्हर्स बॉस म्हणून स्वतःची ओळख तयार केली आहे. युवराजने अर्जुनला प्रशिक्षण दिल्यास तो क्रिकेटचे मैदान गाजवू शकतो, असा विश्वास योगराज यांना आहे. ते म्हणाले, मला विचाराल तर अर्जुनने गोलंदाजीपेक्षा फलंदाजीवर जास्त लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. युवराजने सचिनच्या मुलाला तीन महिन्यांसाठी आपल्या पंखाखाली घेतल्यास, पुढील ख्रिस गेल म्हणून त्याची ओळख तयार होऊ शकते. आयपीएल २०२५ मध्ये अर्जुनला अद्याप खेळण्याची संधी मिळालेली नाही. मागच्या पर्वात तो काही सामने खेळला होता. यंदाच्या लिलावात मुंबईने त्याल ३० लाखांत आपल्या ताफ्यात दाखल करून घेतले होते. अर्जुनने नुकतच विजय हजारे ट्रॉफीत गोव्याकडून खेळताना अरुणाचल प्रदेशविरुद्ध पाच विकेट्स घेतल्या होत्या.

## पाकिस्तानी खेळाडूने पीसीबीला दाखवला आरसा

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** भारत आणि पाकिस्तान हे दोन शत्रू देश समजले जातात. त्यातच गेल्या अनेक वर्षांपासून या दोन देशातील संबंध बिघडले आहेत. नुकताच झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर तर परिस्थिती आणखी चिघळली आहे. अशात भारत-पाकिस्तान यांच्यात कोणत्याच प्रकारचे क्रिकेट खेळले जाऊ नये अशा मागण्याही होत आहेत. जवळपास दशकापासून या दोन देशात द्वीपक्षीय मालिका होत नाहीत, फक्त आयसीसी आणि आशियाई स्पर्धेतच हे दोन संघ आमने - सामने असतात. याशिवाय इंडियन प्रीमियर लगीमध्येही पाकिस्तानच्या खेळाडूंना खेळण्यापासून बीसीसीआयने बंदी घातली आहे.

अशातच आता पाकिस्तानचा वेगवान गोलंदाज मोहम्मद अमीरने आश्चर्यकारक दावा केला आहे. त्याने खुलासा केला आहे की तो



पुढच्यावर्षी आयपीएल खेळण्याच्या जवळ आहे. त्याने म्हटले आहे की जर संधी मिळाली, तर पाकिस्तान सुपर लीगपेक्षा तो आयपीएल खेळण्याला प्राधान्य देईल.

सध्या अमीर पीएसएलमध्ये क्वेट्टा ग्लाडिएटर्स संघाकडून खेळत आहे. पीएसएल आणि आयपीएल या दोन्ही स्पर्धा एकाचवेळी सध्या सुरू आहेत. याचदरम्यान, जिओ न्यूजशी बोलताना अमीरला यापुढेही आयपीएल आणि पीएसएल स्पर्धेचं वेळापत्रक एकावेळी आलं, तर एका स्पर्धेची निवड करण्यास सांगण्यात आले.

## अमृत वत्स, आराध्य म्हसदे, अथर्व शुक्ला, रिशीता पाटील यांचा उपांत्य फेरीत प्रवेश

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** हॉटेल रवाईन यांच्या वतीने आयोजित एमएसएलटीए हॉटेल रवाईन अखिल भारतीय मानांकन राष्ट्रीय सिरीज 16 वर्षाखालील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत मुलांच्या गटात अमृत वत्स, आराध्य म्हसदे, अथर्व शुक्ला यांनी तर, मुलींच्या गटात रिशीता पाटील यांनी मानांकित खेळाडूंचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

पाचगणी येथील हॉटेल रवाईन टेनिस कोर्टवर सुरु असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉ मध्ये एकेरीत उपांत्यपूर्व फेरीत मुलांच्या गटात दहाव्या मानांकित पश्चिम बंगालच्या अमृत वत्सने महाराष्ट्राच्या अव्वल मानांकित वरद पोळचा 6-7(6), 6-1, 6-1 असा पराभव करून आपली अनपेक्षित निकालाची मालिका कायम ठेवली. पाचव्या मानांकित पुण्याच्या आराध्य म्हसदे याने आपला शहर सहकारी चौथ्या



मानांकित नील केळकरचा 6-3, 6-1 असा कडवा प्रतिकार केला. बिगरमानांकित अथर्व शुक्लाने अकराव्या मानांकित वरद उंद्रेचा 7-5, 4-6, 6-4 असा तीन सेटमध्ये पराभव केला. महाराष्ट्राच्या राघव सरोदेने काल मानांकित खेळाडूवर विजय मिळवणाऱ्या एम श्रेयंतचा 6-3, 6-2 असा सरळ सेटमध्ये पराभव केला.

मुलींच्या गटात अव्वल मानांकित पार्थसारथी मुंढे हिने सातव्या मानांकित मेहा पाटीलचा 6-0, 6-1 असा सहज पराभव करून आपली विजयी मालिका कायम ठेवली. सहाव्या मानांकित रिशीता पाटीलने तिसऱ्या मानांकित शिबानी गुप्तेला 6-4, 7-5 असे नमविले. अकराव्या मानांकित व्रण्डिका राजपूतने श्रावी देवरेचा 6-2, 7-6(3) असा तर, दुसऱ्या मानांकित स्वानिका रॉयने आठव्या मानांकित प्रार्थना खेडकरचा 6-2, 6-3 असा पराभव करून उपांत्य फेरी गाठली.

दुहेरीत मुलांच्या गटात महाराष्ट्राच्या श्लोक चौहानने पश्चिम बंगालच्या अमृत वत्सच्या साथीत महाराष्ट्राच्या चौथ्या मानांकित वीरेन सूर्यवंशी व आराध्य म्हसदे यांचा 6-2, 4-6, 10-7 असा पराभव करून आगेकूच केली.

## पाकिस्तानी अर्शद नदीमला का बोलावलं? नीरजचे स्पष्टीकरण



**नवी दिल्ली :** दोन वेळचा ऑलिम्पिक पदक विजेत्या नीरज चोप्राने शुक्रवारी एक निवेदन पोस्ट केले आणि त्यात त्याने पाकिस्तानी भालाफेकपटू अर्शद नदीम याला NC Classis स्पर्धेसाठी आमंत्रण का दिले, यावर स्पष्टिकरण दिले. पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात भारताच्या २८ जणांची दहशतवाद्यांनी गोळ्या झाडून हत्या केली. त्यानंतर अर्शदला दिलेल्या आमंत्रणावरून नीरजवर टीका झाली. पण, नीरजने याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. त्याने ट्विट केले की,"मी शब्दांनी फार काही बोलत नाही, पण याचा अर्थ असा नाही की चुकीविरुद्ध मी आवाज उठवणार नाही. विशेषतः जेव्हा विषय माझ्या देशाच्या प्रेमाचा आणि माझ्या कुटुंबाच्या सन्मानाचा असेल." नीरज चोप्राने क्लासिकमध्ये अर्शद नदीमला आमंत्रण दिल्याबाबत अनेक चर्चा सुरू आहेत. नीरजवर काही लोकांनी टीका केली आणि अपमानीत केले. नीरज लिहितो, 'काही लोक तर माझ्या कुटुंबालाही सोडत नाहीत. मी अर्शदला दिलेलं आमंत्रण एका खेळाडूने दुसऱ्या खेळाडूस दिलेलं होतं. या स्पर्धेचं उद्दिष्ट भारतात सर्वोत्तम खेळाडूंना आणणं आणि भारताला जागतिक दर्जाच्या स्पर्धांचं केंद्र बनवणं होतं. हे सर्व आमंत्रणं सोमवारीच दिली गेली होती. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याच्या दोन दिवस आधी.' 'गेल्या ४८ तासांत जे काही घडलं, त्यानंतर अर्शदचा या स्पर्धेत सहभाग हा अजिबात शक्य नव्हता. माझ्या देशाचं हित आणि सन्मान माझ्यासाठी सर्वात महत्वाचं आहे. ज्या लोकांनी आपल्या प्रियजनांना गमावले, त्यांच्या दुःखात मी सहभागी आहे.

## गेमऑन क्रिकेट अॅकॅडमी संघाने दोन विजयांसह उद्घाटनाचा दिवस गाजवला

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** निकीत मलके स्पोर्टस मॅनेजमेंट आणि पुणे क्रिकेट क्लब यांच्यावतीने 'युथ करंडक' १२ वर्षाखालील मुलांच्या आंतरक्लब (३०-३० षटकांच्या) क्रिकेट स्पर्धेत गेमऑन क्रिकेट अॅकॅडमी संघाने सलग दोन विजय मिळवून उद्घाटनाचा दिवस गाजवला.

वाघोली येथील पुणे क्रिकेट अॅकॅडमीच्या मैदानावर सुरू झालेल्या या स्पर्धेत ओजस मलानी याने केलेल्या अचूक गोलंदाजीच्या जोरावर गेमऑन क्रिकेट अॅकॅडमीने लिडींग स्ट्रोक अॅकॅडमीचा ३ गडी राखून पराभव केला. पहिल्यांदा



फलंदाजी करणाऱ्या लिडींग स्ट्रोक अॅकॅडमीने १५१ धावांचे लक्ष्य उभे केले. ओजस याने १९ धावांमध्ये ३ गडी टिपले. हे लक्ष्य गेमऑन क्रिकेट अॅकॅडमीने २९.२ षटकात व ७ गडी गमावून पूर्ण केले. अभिनव मुंढे (३१ धावा), अर्षदीप सिंग (२१ धावा) आणि शरण्य धुमाळ (१६ धावा) यांनी धावांचे योगदान देत संघाचा विजय साकार केला.

दुसऱ्या सामन्यामध्ये शरण्या लांडगे हिने केलेल्या अष्टपैलु खेळीमुळे गेमऑन क्रिकेट अॅकॅडमीने क्रिकप्लस क्रिकेट अॅकॅडमीचा ७ गडी राखून सहज पराभव केला. शरण्या हिने चार धावांमध्ये २ गडी बाद केले आणि १४ धावांचे योगदान देत अष्टपैलु खेळी केली.

स्पर्धेचे उद्घाटन मा. राहुल गागडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पुणे क्रिकेट क्लबचे शरद पांडे, पुणे स्पोटर्स गॅलरीच्या अनिता चौधरी, पुणे क्रिकेट अॅकॅडमीचे सागर कांबळे आणि आयोजक निकीत मलके आदि मान्यवर उपस्थित होते.




साखळी आणि बाद फेरीमध्ये होणाऱ्या या स्पर्धेत महाराष्ट्रीय मंडळ क्रिकेट अॅकॅडमी, पुणे पोलिस बॉईज, विजय क्रिकेट अॅकॅडमी, एसएआरके अॅकॅडमी, गेम-ऑन क्रिकेट अॅकॅडमी, क्रिकप्लस क्रिकेट अॅकॅडमी, लिडींग स्ट्रोक अॅकॅडमी, स्केलअप क्रिकेट अॅकॅडमी, पुणे बॉईज् अॅकॅडमी आणि पुणे क्रिकेट अॅकॅडमी असे एकूण दहा संघ सहभागी झाले आहेत. विजेत्या आणि उपविजेत्या संघांना करंडक आणि मेड्ल्स् देण्यात येणार आहेत.

## क्यू स्पोर्ट्समधील क्रीडा प्रशासक सलील देशपांडे यांचे निधन

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** बिलियर्ड्स अँड स्नूकर संघटनेचे माजी उपाध्यक्ष व पुणे जिल्हा बिलियर्डस व स्नूकर संघटनेचे माजी सचिव सलील देशपांडे यांचे भुवनेश्वर येथे हृदय विकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले. ते ५९ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज पुण्यात वैकुंठ स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई वडील, पत्नी व दोन कन्या असा परिवार आहे.

पुणे शहर व जिल्हा विशेषकरून पीवायसी हिंदू जिमखाना क्लब या संस्थांना राष्ट्रीय बिलियर्ड्स व स्नूकर क्रीडा नकाशावर महत्वाचे स्थान मिळवून देण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. तसेच, गेल्या दोन दशकांपासून



क्यू स्पोर्ट्स क्रीडा प्रकारांच्या प्रचार व प्रसारासाठी त्यांनी अथक मेहनत घेतली. सलील देशपांडे यांच्या निधनाने क्यू स्पोर्ट्स क्रीडा क्षेत्रात पोकळी निर्माण झाल्याची प्रतिक्रिया क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केली.

## आंतरराष्ट्रीय ओपन ग्रँड मास्टर बुद्धिबळ स्पर्धेत अ गटात नितीश बेलुरकरची आघाडी

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** महाराष्ट्र बुद्धिबळ संघटना(एमसीए) यांच्या वतीने तिसऱ्या महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय ओपन ग्रँड मास्टर बुद्धिबळ स्पर्धेत अ गटात गोव्याच्या नितीश बेलूरकर याने 5.5 गुणांसह आघाडी कायम राखली.

अमनोरा हॉल येथील हॉलमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेत सहाव्या फेरीत अ गटात पहिल्या पटावर गोव्याच्या नितीश बेलूरकर याने मध्यप्रदेशाच्या आयुष शर्माला बरोबरीत रोखले व 5.5 गुणांसह आपली आघाडी कायम ठेवली. नितीशने सिसिलियन पद्धतीने डावास सुरुवात करत आयुषला 34 चालींमध्ये बरोबरीत रोखले. दुसऱ्या



पटावर देखील आरएसपीबीच्या दीपन चक्रवर्ती जे. व अर्मेनियाच्या पेट्रोस्यान मॅन्युएल यांच्यातील लढत बरोबरीत सुटली.

महाराष्ट्राच्या मोहम्मद शेख याने जॉर्जियाच्या पँटसुलिया लेव्हनला बरोबरीत रोखून 4.5गुण प्राप्त केले. तर, रशियाच्या सावचेन्को बोरिसने महाराष्ट्राच्या सुयोग वाघला नमवून 4.5गुण मिळवले. पीएसपीबीच्या दीप सेनगुप्ता याने उझबेकिस्तानच्या झुमाईव्ह मारतचा तर पश्चिम बंगालच्या संदिपन चंदा याने तेलंगणच्या वेलपुला सरयूचा पराभव करून 4.5गुणांची कमाई केली.

### 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धा

## सांगवी, एफसी, स्पोर्टर्स मेनिया, पुना सोशल संघ विजय

■ राष्ट्र संचार न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे जिल्हा फुटबॉल संघटने तर्फे आयोजित 'पीडीएफए लीग २०२५' फुटबॉल स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या सामन्यात सांगवी फुटबॉल क्लब, एफसी बॅक्डीनो, स्पोटर्स मेनिया आणि पुना सोशल स्पोटर्स क्लब या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघांचा एकतर्फी पराभव करून विजयी कामगिरी केली.

कात्रज येथील भारती विद्यापीठ मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेच्या व्दितीय श्रेणी गटाच्या झालेल्या



सामन्यामध्ये सांगवी फुटबॉल क्लब असोसिएशन ब संघाने मॅथ्युज् फुटबॉल अॅकॅडमीचा ५-० असा सहज पराभव केला. सामन्यात शुभम सावंत आणि शनॉन अरलँड यांनी प्रत्येकी दोन गोल केले. सर्वेश्र पुजारे याने एक गोल केला. एफसी बॅक्डीनो अ संघाने इंद्रायणी स्पोटर्स क्लबचा ९-१ असा धुव्वा उडविला. मोहन पाटील याने पाच गोलचा धडाका लावला. रोहीत जेयम याने दोन तर, संजय अक्लोर आणि मोहम्मद शेख यांनी प्रत्येकी एक गोल केला.

स्पोटर्स मेनिया संघानेसुद्धा एकतर्फी विजय नोंदविताना दिएगो ज्युनिअर्स एफसी ब संघाचा ७-२ असा पराभव केला. यामध्ये नील सुदर्शन, पार्थ सी. आणि अथर्व निवडेकर यांनी प्रत्येकी दोन गोल केले. निशित फडके याने एक गोल केला. दिएगो ज्युनिअर्स एफसी संघाकडून मेघेश धोक आणि वंश पुजारी यांनी एकेक गोल केला. पुना सोशल स्पोटर्स क्लब संघाने युनिक वानवडी एफसीचा ७-० असा सहज पराभव केला. यामध्ये वस्तल परदेशी याने दोन गोल केले. अक्षय खडसे, आनंद रणभिसे, स्वप्रिल गायकवाड, राहूल होले आणि मेहराज शेख यांनी प्रत्येकी एक गोल केले.

#रा